खिस्ती - ४ सन - १८८८
मुंबई ट्रॅक्ट अँड बुक सोसायटी
पुस्तकाचे नाव - शास्त्रांत वर्णिलेल्या स्त्रिया

( श्री प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स, ठाणे )

# EN

## OF THE

# OLD TESTAMENT

निरस्तो ४

शासनाने दिलेल्या सेवा




PUBLISHED BY

The Tract and Book Society,

BOMBAY.

# शास्त्रांत वर्णिलेल्या स्त्रिया.

## भाग पहिला.

# Women

OF THE

# Old Testament.

*Adapted from the English, and Prepared for the Bombay Tract and Book Society.*

BY

MRS. L. BISSELL.

मुंबईः

मुंबई ट्राक्ट आणि बुक सोसैटी.

1,000 COPIES.

१८८८.

*Cloth, gilt,* 10 *Annas.* *Cloth, plain,* 8 *Annas.*
*Paper cover,* 4 *Annas.*

# अनुक्रमणिका.


हव्वा ........................ १

सारा ........................ २३

रिबका ........................ ६९

याकोबेद आणि मिर्याम ................ १००

दबोरा ........................ १३४

रूथ ........................ १५६

हान्ना ........................ १८२

अबिगईल ........................ २०६

शूनेमगांवांतील स्त्री ................ २२८

एस्तेर राणी ........................ २५१

# प्रस्तावना.

शास्त्रांत वर्णिलेल्या स्त्रिया ! हे शब्द पाहतांच मनांत अनेक विचार येतात. त्या स्त्रिया कशा असतील, त्यांच्या चाली रीति कशा, फार प्राचीन काळामध्यें त्यांची स्थिति कशी असेल, त्यांस कांहीं प्रकारें आह्मांसारिखा सुखदुःखाचा अनुभव होता कीं काय, अशा कल्पना सहज मनामध्यें घोळूं लागतात. ह्या गोष्टी आह्मांस समजण्यासारख्या नव्हत्या. पण देवानें दया करून कित्येक विश्वासू भक्तांस प्रेरणा देऊन त्यांकडून त्या स्त्रियांचें वृत्त

लिहून ठेविलें तें, आह्मी ज्या ह्या अर्वाचीन काळांतील स्त्रिया त्या आमच्या हिताकरितांच असावें. असें कीं, कित्येकांच्या चुका पाहून आह्मांस बोध व्हावा, व कित्येकांच्या सदाचरणाचा आह्मीं कित्ता घ्यावा. हा देवाचा आह्मांवर मोठा उपकार असें मानिलें पाहिजे.

त्या स्त्रियांचें जें वर्णन शास्त्रांत आहे, तें फार विस्तारानें किंवा अलंकारिक शब्दानें केलें नाहीं, तर थोडक्यांत व अगदीं साध्या रीतीनें केलें आहे; तथापि तेवढ्यावरूनही आम्हांस बरीच माहिती होते. त्यांचें वृत्त लिहिणारा जणू आम्हांस घरांत नेऊन त्यांच्या कुटुंबाची ओळख करून देतो; त्यांचा कामधंदा, रीतिभाती, सुखदुःख हीं जशीं आम्हांसमोर आणितो. यावरून त्या स्त्रिया जरी बहुत शतकांपूर्वीं होऊन गेल्या, तरी त्या आम्हांतीलच असल्यासारख्या वाटतात. त्यांस आम्हांसा-

रख्याच मनोभावना होत असत. त्या आपल्या इष्टमित्रांवर प्रीति करीत, त्यांस संकट आलें ह्मणजे त्या रडत, त्यांस चांगल्या गोष्टींची आशा असे, वाइटाचें त्यांस भय वाटे; म्हणून त्यांचा वृत्तांत वाचतांना आह्मीं त्यांच्या बरोबर समसुखदुःखी होतों. अणखी त्यावरून कळून येतें कीं, मानवी प्राणी कोणत्याही काळांतील किंवा देशांतील असोत, त्यांच्या मनोवृत्ति बहुतांशीं सारख्याच असतात.

# हव्वा.

पवित्र शास्त्रांत जी स्त्री प्रथम वर्णिलेली आहे, ती हव्वा नामें सर्व मानवकुलाची आदि माता होय, व आदाम जो प्रथम पुरुष त्याची ती पत्नी होय. त्या अत्यंत प्राचीन कालाकडे आम्ही जेव्हां पाहातों, तेव्हां सहज असें मनांत येतें कीं, ती बाई हल्लींच्या कालांतील स्त्रियांहून अगदीं भिन्न असावी. पुराणादिग्रंथांत ज्या अमानुष कल्पित प्राण्यांविषयीं आम्ही कधीं कधीं वाचितों, त्यांसारखीच ती असेल असें वाटतें; पण तशी गोष्ट नाहीं. शास्त्रावरून कळतें कीं, ती आम्हांप्रमाणेंच सुखदुःख भोगणारी होती. आदामास देवाच्या प्रतिरूपाप्रमाणें उत्पन्न केलें होतें असें सांगितलें आहे, यावरून तो सर्व प्रकारें

फार श्रेष्ठ प्रतीचा, शुद्ध व पवित्र मनुष्य होता हें निःसंशय आहे. त्यास प्रथम देवानें एदेन नामक एका सुंदर व विस्तीर्ण बागांत राहण्याकरतां ठेविलें. ह्या नवीन केलेल्या मनुष्यास संतुष्ट करण्याकारितां जें कांहीं पाहिजे होतें तें सर्व त्या बागांत सिद्ध केलेलें होतेंच. त्यांतील शोभा पाहून तो आनंद करीत असे, व त्यामुळें नित्य देवाची स्तुति करीत असे. वृक्षांवर पक्षी हर्षानें मधुर गायन गात, जेथें जेथें तो पाही तेथें सुंदर सुंदर फुलें व फळें दृष्टीस पडत. असा तो बाग रमणीय होता, आणि त्या सर्वांवर देवानें त्यालाच अधिकारी करून ठेविलें होतें.

परंतु त्या वेळीं आदामाशिवाय जगांत दुसरा कोणी बुद्धिवंत प्राणी नव्हता, त्यामुळें त्याचा आनंद पूर्ण होत नसे. वारंवार त्याला वाटे कीं आपल्यासारिखा कोणी सोबती असता

तर फार बरें झालें असतें; त्याशीं सर्व गोष्टीं-विषयीं संभाषण करितांना मला फार सुख वाटलें असतें. देवानेंही म्हटलें होतें कीं, मनुष्य एकटा असावा हें बरें नाहीं. त्याप्रमाणें त्यानें हव्वेला उत्पन्न करून ही सर्वांहून उत्तम देणगी आदामाला बायको होण्याकरितां दिली. असली सुंदर व योग्य सोबतीण व साह्यकारीण मला मिळाली हें पाहून आदाम फार हर्षित झाला, आणि त्याबद्दल त्यानें मनोभावें देवाची उपकारस्तुति केली असावी. हव्वेलाही देवानें पवित्र स्वभाव दिला होता, म्हणून त्या उभयतांस परस्परांच्या समागमांत राहून जो आनंद होत असे तो अवर्णनीय होता. तीं एकमेकांचें हित पाहून एकमेकांस संतोषविण्यास झटत असत; कारण, तोंपर्यंत त्यांच्या शुद्ध व निर्लोभ अंतःकरणांत स्वार्थ शिरला नव्हता.

त्या बागांतील नानाप्रकारचे वृक्ष, पशु, पक्षी, व असंख्य इतर जीवजंतु यांची ओळख करीत करीत तीं दोघें किती हौसेनें व आनंदानें फिरलीं असतील! आणि ह्या सर्वांवरून देव जो त्यांचा थोर उत्पन्नकर्ता व पिता त्याचें त्यांनीं स्तवन केलें असेल. दिव्य दूतांनीं त्यांकडे पाहून आश्चर्य केलें असेल, आणि त्यांविषयीं देवाचा मनोदय कसा काय आहे हें समजण्यास ते फार उत्सुक झाले असतील यांत संशय नाहीं.

देव स्वतां त्या बागांत येऊन त्या स्त्रीपुरुषांशीं बोलत असे. त्यांचें मन पवित्र असल्यामुळें त्यांस देवाशीं बोलायास कांहीं भय वाटत नसे. जशीं आज्ञांकित मुलें आपल्या बापाचा हात धरायास व त्याजवळ असायास भीत नाहींत, त्याप्रमाणें त्यांची स्थिति होती. ती तशीच राहिली असती तर फार बरें

ख्रिस्ती



झालें असतें. परंतु देवाच्या सृष्टीमध्यें त्यास एक शत्रु होता. त्याला त्यांचें तें पवित्र सुख सहन होईना, त्यांचा कोणत्या तरी रीतीनें नाश करावा, याविषयीं तो लवकरच योजना करूं लागला. सर्व दुष्ट आत्म्यांपैकीं जो मुख्य व ज्याला सैतान म्हटलें आहे तोच हा शत्रु होय. पूर्वीं तो देवाजवळ राहणाऱ्या दिव्य दूतांच्या मंडळींतील असून फार सुखी होता, पण पुढें गर्विष्ट झाल्यामुळें त्याला देवाच्या सत्तेखालीं राहणें गोड वाटेना. त्यावरून त्याला देवानें त्या पवित्र स्थानांतून बाहेर घालविलें. त्याची सर्व पदवी व महिमा जाऊन तो केवळ भ्रष्ट होऊन पडला, व तेव्हांपासून तो देवाशीं वैर धरून त्याचें कृत्य नष्ट करायास पाहात आहे असें शास्त्रावरून कळून येतें.

सैतानास ठाऊक होतें कीं, जोंपर्यंत हीं स्त्रीपुरुषें देवाच्या आज्ञा पाळतील, तोंपर्यंत

तीं तशींच सुखी राहतील, म्हणून त्यांकडून एक तरी आज्ञा मोडली जावी याविषयीं त्यानें प्रयत्न करण्याचा निश्चय केला. पुरुषापेक्षां स्त्री सहज मोहांत पडेल असें समजून, हव्वा एके समयीं एकटीच फिरत असतां, संधि पाहून तो सर्पाचें रूप धरून तिच्याशीं बोलूं लागला. तोंपर्यंत कोणत्याही प्राण्यानें तिला दुःख दिलें नव्हतें, म्हणून जेव्हां तो सर्प जवळ येऊन तिशीं बोलता झाला, तेव्हां तिला कांहीं भय किंवा आश्चर्य वाटलें नाहीं असें दिसतें. ह्यानें मोठ्या चातुर्यानें गोड गोड बोलून तिला असें दर्शविलें कीं, देवानें एका विशेष गोष्टीविषयीं तुम्हांस जी आज्ञा दिली आहे ती तुमच्या हिताची नाहीं, त्याप्रमाणें चालल्यास फार नुकसान होईल. मी जें सांगतों तें जर तुम्ही ऐकाल, तर खरोखर तुम्ही ज्ञानी होऊन तुमचें मोठें कल्याण होईल.

सैतानाचें ऐकावें असें प्रथम त्या बाईच्या मनांत नव्हतें. देवानें आम्हांस भरपूर सुख दिलें आहे, त्यांत कांहीं कमताई नाहीं, असें समजून तिनें यापेक्षां दुसऱ्या अधिक सुखाची इच्छा धरली नाहीं. पण त्या दुष्टाचे मोहक शब्द ऐकून धिःकार करायाचा होता तसा तिनें केला नाहीं. देवापेक्षां हा आमचा मोठा हित इच्छिणारा कशावरून आहे, असा संशय धरून ही गोष्ट तिनें आपल्या प्रिय भ्रतारास कळविली असती, आणि मग उभयतांनीं देवाकडे जाऊन आपल्या मनाची संशयनिवृत्ति करून घेतली असती, तर फार बरें झालें असतें. परंतु तसें झालें नाहीं. एकटीनेंच त्या सैतानाच्या बोलण्याकडे कान देतां देतां, शेवटीं त्याचें म्हणणें योग्य आहे असें मानून तें मनावर घेतलें असेल. देवानें हें कां मना केलें? आम्हीं ज्ञानी व्हावें, आम्हांस

पुष्कळ गोष्टींची माहिती असावी हें बरें नव्हे काय? असा ती मनांत विचार करूं लागली.

इतकें झाल्यावर तिचें आतां पुढें आज्ञा मोडण्याचें कार्य मात्र राहिलें होतें. तेंही तिजकडून प्रसंगीं सहजच घडून आलें. पण जसें सांप्रतकाळीं देवाची एक आज्ञा मोडल्या-वरून केवढा भयंकर परिणाम होईल हें आमच्या स्वप्नीं देखील नसतें, तशीच त्या अविचारी बाईची गोष्ट होती. मी आपल्या इच्छेप्रमाणें हें एक काम करीन तर माझी बुद्धि भ्रष्ट होईल, मी केवळ वाईट गोष्टींविषयीं अधिक ज्ञानी होईन, आणि माझी संतति मजसारखी पतित होऊन पुष्कळ दुःख भोगून शेवटीं मरेल, हें त्तिला पुरतेपणीं काय ठाऊक होतें? पण सैतानाला माहीत होतें. आपली दुष्ट योजना सिद्धीस गेलीशी पाहून त्याला फार हर्ष झाला; आदामाला ह्याच मोहांत

पाडायास फार प्रयत्न करणें नको हेंही त्याला कळलें; त्याप्रमाणें हव्वेच्या आग्रहावरून तोही लवकरच ती आज्ञा मोडायास मान्य झाला.

मग त्या बिचाऱ्यांची दुरावस्था काय वर्णावी! हरलें त्यांचें तें पवित्र सुख! देवाची आज्ञा मोडल्यामुळें त्याची मैत्री राहिली नाहीं. आतां आम्ही त्याला कसें तोंड दाखवूं, त्याच्या तेजस्वी मुखाकडे कसें पाहूं, अशी त्यांच्या मनाला मोठी भीति व चिंता प्राप्त झाली. पुढें जेव्हां त्यांनीं त्या बागांत देवाचा शब्द ऐकिला, तेव्हां पूर्वींप्रमाणें त्याकडे धांवून जाण्याची त्वरा न करितां, तीं झाडांमध्यें जाऊन लपलीं. तरी त्यांच्यानें लपून राहवेना. देवानें आदामास हांक मारून विचारलें कीं, ज्या झाडावरचें फळ खाण्याची मनाई केली होती तें तूं खाल्लें काय? तेव्हां आदाम भयभीत व कंपायमान होऊन बोलला, जी स्त्री तूं

मला दिली, तिनें तें फळ मला दिलें आणि मीं खाल्लें.

पाहा! ह्या उत्तरावरूनच त्याची भ्रष्ट बुद्धि दिसून आली. मी स्वतः अपराधी आहें असें त्यानें पतकरिलें नाहीं, परंतु तो आपल्या प्रिय पत्नीवर दोष ठेवूं लागला. आणखी त्या उत्तरावरून त्यानें असें दर्शविलें कीं, देवानें मला अशी सोबतीण दिली हें बरें केलें नाहीं. गरीब बिचारी हव्वा!! तिनें ज्याला आपला प्राणसखा मानिलें होतें, त्याचे ते शब्द तिच्या हृदयास भाल्याप्रमाणें टोंचून पार गेले असतील. खचीत मी दोषी आहें अशी तिच्या मनानें साक्ष दिली. तथापि तिनेंही मोकळ्या मनानें कबूल न होतां, जेव्हां देवानें तोच प्रश्न तिला घातला, तेव्हां आदामाप्रमाणेंच ती निमित्त शोधूं लागली. ती म्हणाली, सर्पानें मला भुलविलें म्हणून मीं खाल्लें. याप्रमाणें

उभयतांनींही पाप पदरीं न घेतां आपणांवर अधिकच दोष आणिला. पण आतां त्यांनीं कोठें जावें? तीं देवासमोर केवळ पतित व लज्जित होऊन स्तब्ध उभीं राहिलीं.

आज्ञा देते वेळीं देवानें सांगितलें होतें कीं, जर तुम्ही तें फळ खाल तर मराल. आतां ही भयंकर शिक्षा आपल्यांवर येईल हें जाणून जसा कोणी गुन्हेगार न्यायाधीशासमोर भीत भीत निकालाची वाट पाहत उभा राहतो तशी त्यांची अवस्था झाली. नंतर देवानें या प्रकारें त्यांचा न्याय केलाः—त्यानें हव्वेला सांगितलें कीं, "तूं मोठ्या दुःखानें लेंकरें प्रसवशील, आणि आपल्या नवऱ्याच्या सत्तेखालीं राहशील." आदामाला त्यानें म्हटलें कीं, "तुझ्या दोषामुळें भूमि शापित आहे. आतां ती तुजसाठीं कांटे व कुसळ उपजवील." आणखी तो म्हणाला, "तूं आतांपासून कष्ट करून अन्न

खाशील; तूं माती आहेस, आणि मातींत परत जाशील."

याप्रमाणें आमचीं पहिलीं आईबापें आपल्या सुखस्थितीला मुकून लवकरच दुःखें व संकटें भोगूं लागलीं. देवानें दया करून त्यांस तेव्हांच मरणाची शिक्षा दिली नाहीं, परंतु त्यांच्याठायीं मरणाचें बीज लाविलें गेलें. त्यावरून त्यांची प्रकृति वारंवार बिघडत असे; तीं कधीं अशक्त होत असत व कधीं आजारी पडत असत. तथापि त्या प्रखर दुःखांत त्यांची अगदीं निराशा होऊं नये, म्हणून देवानें त्या बाईला एक फार आनंदाची गोष्ट कळविली. ती अशी कीं, तुझ्या वंशामध्यें कोणी तारणारा येणार आहे; तो सैतानाची सत्ता मोडील, आणि त्याकडून पतित मनुष्यांस उद्धाराचा मार्ग सांपडेल. हें ऐकून त्या कष्टी झालेल्या प्राण्यास आशा लागली. देवाचें वचन

प्रचितीस येईलच येईल असें जाणून व त्या येणाऱ्या तारणाराकडे पाहून त्यांच्या मनास बहुत प्रकारें समाधान वाटलें. त्यांस त्या सुंदर बागाच्या बाहेर जाणें भाग पडलें खरें, आणि ज्या विस्तीर्ण रानामध्यें पुष्कळ कांटे व कुसळें आढळावयाचीं त्यांत जाऊन कसेंही करून वस्ती करावी लागेल; अणखी थकून जाईपर्यंत श्रम करून खाण्यास अन्न मिळ-वावें लागेल हें सर्व त्यांस दिसून आलें. तरी त्या आशेमुळें त्यांनीं धैर्य सोडिलें नाहीं.

माझ्या वचनावर त्यांनीं विश्वास ठेविला असें पाहून देवाचा राग शमला, आणि त्यानें बहुत प्रकारें त्यांस आशीर्वाद देऊन त्यांचे श्रम सफळ केले. त्या अफाट रानांत कष्ट करीत असतांना हव्वेनें वारंवार मनांत आणिलें असेल कीं ह्या सर्व दुःखाचें कारण मीच आहें. जर त्या मोहकाच्या शब्दांकडे

मीं लक्ष दिलें नसतें तर ही कठीण दशा कां प्राप्त झाली असती! आह्मी उभयतां त्या बागांतील झाडांच्या गार सावलींत खुशाल फिरत राहिलों असतों, पाहिजे तेव्हां तीं पक्क झालेलीं गोड फळें तोडून खाल्लीं असतीं, आणि त्या नितळ नदीच्या पाण्यांत स्नानें केलीं असतीं. देवानें सांगितल्याप्रमाणें त्या नाना प्रकारच्या प्राण्यांस व त्या रंगारंगाच्या सुंदर फुलांस नांवें देतां देतां किती करमणूक झाली असती! अणखी, रोज संध्याकाळच्या वेळीं देवाची वाणी ऐकून आह्मी फार त्वरेनें व हर्षानें त्याकडे धांवत जाऊन त्याशीं संभाषण केलें असतें, व त्याच्या प्रेमळ शब्दांकडून मन केवळ रमून गेलें असतें. आतां तो कोठून भेटणार? तो आह्मां पतितांच्या दृष्टीस पडणार नाहीं, अशा विचारांवरून ती बाई दुःखित होऊन फार पश्चात्तापी झाली असेल यांत सं-

शय नाहीं. तरी दयासागर जो परमेश्वर त्यानें तिची क्षमा केली.

आदामानेंही आपला दोष मोकळ्या मनानें कबूल केला असावा असें वाटतें. तेणेंकरून त्यांची ती दुरावस्था त्यांस सहन करण्यासारखी होती. त्यांची परस्परें प्रीति असल्यामुळें तीं उभयतां नवराबायको एकमेकांचें ओझें वाहून व्यर्थ कुरकूर न करितां देवाच्या साह्यानें दिवस कंठीत चाललीं. कांहीं वर्षांनंतर त्या बाईला देवानें प्रथम पुत्र दिला, त्या वेळीं तिला जो आनंद झाला तो वर्णवत नाहीं. घरामध्यें बाळक असणें हा केवळ देवाचा आशीर्वाद आहे असें समजायाचें. तसेंच हव्वेनेंही विशेष प्रकारें मानिलें. स्त्रीच्या वंशामध्यें तारणारा येणार आहे असें देवानें वचन दिलें होतें. तर तो हाच नसावा का? अशी तिनें कदाचित् कल्पना केली असेल असें

दिसतें. म्हणून तिनें त्याचें नांव काइन असें ठेविलें. काइन याचा अर्थ 'मिळविलेला;' कारण ती म्हणाली कीं, "परमेश्वरापासून मला पुरुष प्राप्त झाला आहे." आतां ह्या बाळाकडून आमचेंच नाहीं, तर आमच्या सर्व संतानाचें मोठें हित होणार आहे, असें त्या बाईला वाटलें असेल. परंतु पुढें जेव्हां त्या मुलाचा दुष्ट स्वभाव तिला दिसून आला तेव्हां कष्टी होऊन तिनें ती आशा सोडून दिली.

आम्ही देवाची आज्ञा मोडून भ्रष्ट झालों, त्याप्रमाणें आमच्या मुलाचीही बुद्धि भ्रष्ट होणें हें त्या पापाचें कडू फळ, असें जाणून तिनें किती शोक केला असेल! तिनें आपल्या प्रिय पुत्राला त्या येणाऱ्या तारकाविषयीं सांगितलें असेल, आणि त्यावर भाव ठेवून देवापाशीं चांगली बुद्धि मागण्यास शिकविलें असेलच. तरी काइनानें तिचा बोध ऐकिला नाहीं, व

तो सुधारलाही नाहीं. पुढें कांहीं काळ लोटल्यावर देवाच्या कृपेनें तिला दुसरा पुत्र झाला, व तिनें त्याचें नांव हबेल ठेविलें. हबेल याचा अर्थ 'अन्न देणारा' असा आहे. त्याच्या पूर्वी हव्वेला कित्येक कन्या झाल्या असतील असें दिसतें. परंतु त्यांचें वर्णन शास्त्रांत केलें नाहीं.

हबेल हा काइनाप्रमाणें दुर्गुणी नाहीं, तर तो आईबापांच्या आज्ञेंत राहून देवाकडे चित्त लावितो, असें पाहून हव्वेला फार आनंद झाला, आणि तिनें देवाची अत्यंत उपकारस्तुति केली असेल. आपल्या मुलांलेंकरांत राहून तिला आतां पुरतें काम व करमणूकही झाली. पुढें जो दुःसह अनर्थ आपल्यावर येणार आहे तो तिच्या स्वप्नीं देखील नव्हता. तिला दिसलें असेल कीं, माझा हा काइन अधिकच बिघडत चालला आहे व तो आमच्या बोधाकडे लक्ष पुरवीत नाहीं, आणि देवाची भक्ति करणें त्यास

अगदीं आवडत नाहीं; यावरून हव्वेला त्याच्याविषयीं फार काळजी उत्पन्न झाली असावी.

अणखी विशेष दुःखाची गोष्ट ही होती कीं, काइन हा आपला धाकटा भाऊ हबेल याला बरें पाहात नसे. देवाची भक्ति करण्याची त्याला फार आवड आहे व याबद्दल देव त्यास प्रसन्न होऊन पुष्कळ आशीर्वाद देत आहे हें पाहून काइनाला वाईट वाटलें, आणि तें त्याला सहन होईना. हव्वेनें बहुत वेळ त्याला समजून सांगितलें असेल, व योग्य रीतीनें आचरण केल्यास तुजवरही देवाची कृपा होईल असें उत्तेजन देऊन ती बोलली असेल यांत संशय नाहीं. परंतु तो आपल्या भावाचा हेवा करणें सोडीना. शेवटीं एका दिवशीं तो गरीब बिचारा हबेल शेतामध्यें मारलेला सांपडला. हें कृत्य त्या दुष्ट भावाकडून घडलें, असें लवकरच समजून आलें. तेव्हां त्या आईबापांस

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.



किती दुःख झालें असेल, व तीं किती रडलीं असतील!!!



देवानें त्यांस सांगितलें होतें कीं, जर तुम्ही तें फळ खाल तर मराल. परंतु त्या दिवसापर्यंत त्यांनीं मनुष्याचें मरण पाहिलें नव्हतें. आता जेव्हा हव्वेनें आपल्या प्रिय हेबेलाच्या थंडगार पडलेल्या तोंडास हात लाविला, आणि तो आपले डोळे उघडून मजकडे पाहात नाहीं

व हालतही नाहीं असें पाहिलें, तेव्हां मरण किती भयंकर आहे हें तिच्या लक्षांत येऊं लागलें. या प्रकारें माझ्या पापावरून आम्हां सर्वांची गोष्ट होणार आहे, असें मनांत आणून वारंवार तिनें रडावें. ज्या दिवशीं हेबेल मारिला गेला त्याच दिवशीं देवानें काइनाला बोलावून त्याजवळ त्याच्या भावाविषयीं विचारपूस केली; पण तो कांहीं कबूल होईना. यावरून तो पश्चात्तापी झाला नाहीं असें दिसलें, देवानें त्याला "पृथ्वीवर तूं परागंदा व भटक्या होशील" असा शाप दिला.

याप्रमाणें एका दिवसांत त्या दुःखित आईबापांचे दोन्ही पुत्र गमावले. ही केवळ आमच्या पापाबद्दल योग्य शिक्षा आहे असें जाणून, त्यांनीं ती नम्रतेनें सोसायास मान्य होऊन देवाला दोष लाविला नाहीं, असें दिसतें. तथापि हव्वेनें त्यांच्यासाठीं पुष्कळ शोक केला

असेल, आणि मला आतां अणखी एक तरी पुत्र असावा अशी तिनें इच्छा धरून देवाजवळ मागितलें असेल असें वाटतें. कारण देवानें तिजवर कृपा केली, आणि पुनः तिला पुत्रसंतान दिलें. त्या वेळेस हव्वेला विशेष हर्ष झाला, आणि तिनें त्याचें नांव शेथ ठेविलें. त्याचा अर्थ 'नेमलेला;' कारण ती म्हणाली कीं, माझ्या प्रिय हबेलाच्या ठिकाणीं देवानें ह्याला आम्हांजवळ राहण्यास नेमिलें आहे.

हा मुलगा फार गुणी असून देवाच्या भक्तीमध्यें अंतर पडूं देत नसे, व त्यावर देवाची कृपा होती, हें शास्त्रांतील वर्णनावरून दिसतें. यामुळें तीं आईबापें समाधान पावलीं असतील.

शेथाच्या जन्मानंतर पुढें शास्त्रांत हव्वेविषयीं कांहीं विशेष सांगितलें नाहीं. ती कोठें व केव्हां मरण पावली हें आपणांस ठाऊक नाहीं; पण देवाच्या वचनावर विश्वास ठेवून, त्याची

आज्ञा झाली तेव्हां ती शांतीनें मेली असेल, असें सर्व गोष्टी पाहून समजण्यास आधार आहे. सांप्रतकाळच्या स्त्रियांनीं तिची ही हकीकत वाचून तिला दोष न लावितां बोध घ्यावा. त्यांनीं तिच्या पापापासून दूर राहून तिच्या सद्गुणांस अनुसरावें. ज्या विचारशील आहेत, त्यांस खरोखर तिचा कळवळा येईल. आतां पतितांवर देखील देवाची दया आहे, व तो त्यांच्या पापांची क्षमा करायास सिद्ध आहे असें जाणून, त्यांस आपणाविषयीं आशा उत्पन्न होऊन त्या आनंद करतील यांत संशय नाहीं.





## २.

## सारा.

सर्व मनुष्यमात्राचे मूळ पूर्वज जे आदाम आणि हव्वा त्यांस देवानें प्रथम एदेनबागांत ठेविलें, व त्या बागांतून युफ्रातीस नदी वाहात होती असें सांगितलें आहे, त्यावरून तो बाग एशिया खंडांतील तुर्कस्थानांत असावा असें अनुमान होतें. तेथून त्यांच्या संततीचा प्रसार कांहीं पिढ्यांपर्यंत एशिया खंडांतच झाला असें दिसतें. या प्राचीनकाळांतील लोकांची

स्थिति आह्मांस कांहीं प्रकारें विलक्षण वाटेल. ते एका ठिकाणीं वस्ती करून राहात नसत; पण आपल्याबरोबर राहुट्या, पालें घेऊन रानोरान व मुलखोंमुलखीं फिरत असत. याचें विशेष कारण हें होतें कीं, त्यांची संपत्ति मुख्यत्वें गुरेंढोरें होती, आणि त्यांमध्यें जे कोणी अधिकारी व श्रीमंत होते, त्यांना आपल्या मोठमोठ्या कळपांस कोठें चारापाणी पुरतें मिळेल याचा शोध करीत फिरावें लागत असे.

त्यांपैकीं तेराह नामें त्या काळचा कोणी एक मनुष्य होता. त्यापाशीं पशुधन पुष्कळ असून त्याला नाहोर, आब्राहाम व हारान असे तीन पुत्र होते. त्यांत आब्राहाम सर्वांहून भक्तिशील होता असें दिसतें, कारण, शास्त्रांत त्याला कोठें कोठें 'देवाचा मित्र' असें म्हटलें आहे. सारा ही त्याची बायको होती. त्याचा भाऊ हारान मरण पावल्यानंतर देवानें

आब्राहामाला दर्शन देऊन सांगितलें कीं, "तूं आपला देश व आपलें कूळ सोडून जो देश मी दाखवीन त्यांत जा." सारा आपल्या आईबापांबरोबर नेहमीं फिरत असे, पण जेव्हां तिनें ऐकिलें कीं, आपल्या सर्व नातलगांस सोडून केवळ आपल्या नवऱ्यासहित जो दूरचा देश आपण कधीं पाहिला नाहीं त्यांत जाऊन राहायाचें आहे, तेव्हां तें तिला फार अवघड वाटलें असेल. तरी ती जाण्यास अमान्य झाली नाहीं. त्या वेळेस तिचे आईबाप जीवंत होते कीं नाहीं हें कांहीं सांगितलें नाहीं. पण त्यांनीं आपल्या मुलीस चांगल्या रीतीनें शिक्षण दिलें होतें असें तिच्या वर्तणुकीवरून दिसतें. नवऱ्यासाठीं सर्व सोडावें हें योग्य आहे असें शाहणीं आईबापें आपल्या मुलीस बोलून उत्तेजन देतीलच. सारेनें जाण्याविषयीं कांहीं हरकत घेतली नाहीं, म्हणून

आब्राहामाला देवाच्या त्या आज्ञेप्रमाणें करणें कांहींसें सोपें पडलें. तो लवकरच आपला म्हातारा बाप, आपली बायको, व आपला पुतण्या लोट आणि आपल्या गुरांढोरांचे मोठाले कळप यांस घेऊन चालता झाला.

हारान म्हणून युफ्रातीस नदीच्या जवळचा प्रदेश होता, तेथें आल्यावर तेराह फार दीर्घायु होऊन मरण पावला. हें आब्राहाम व सारा यांस एक मोठें दुःखास कारण झालें. आतां या ठिकाणीं आपल्या बापाची कबर आहे, आणि आपल्या कळपांस चारा व पाणी भरपूर आहे, यामुळें पुढें जाण्यापेक्षां एथेंच राहणें अधिक सोईचें व सुखदायक होईल असें आब्राहामाला वाटलें असेल, म्हणून देव त्याला पुनः त्या पुढच्या दूर देशास जाण्यास सुचवीपर्यंत तो हारानांतच वस्ती करून राहिला. पण देवाची आज्ञा होतांच तो अणखी कांहीं

विलंब न करितां जाण्याची तयारी करून निघाला. देवाच्या वचनावर त्याचा पूर्ण भरंवसा होता, म्हणून त्या परदेशांत आपली सर्व संपत्ति, बायको, व पुतण्या या सर्वांस नेण्याविषयीं त्याला कांहीं भय वाटलें नाहीं. तेथले लोक फार धीट व लढाऊ असून आपल्यासारख्या परक्याला लुटायास किंवा मारायास मागेंपुढें पाहणार नाहींत इतकें आब्राहामानें ऐकिलें असावें. पण ज्या सर्वसमर्थ देवानें आपणांस तेथें पाठविलें आहे, तो आपलें संरक्षण करील अशी त्याची खातरी होती; म्हणून तो धैर्य धरून, ज्या खनानदेशाविषयीं देवानें त्याला वचन दिलें होतें त्यांत शेखेम नामें गांव आहे तेथपर्यंत गेला. तें गांव यरूशलेम शहरापासून उत्तरेस सुमारें सतरा कोसांवर आहे.

नंतर तो तेथून दक्षिणेकडे वळून बेथेल गांवीं राहुट्या देऊन कांहीं कालपर्यंत राहिला. या

वेळेस सारेची स्थिति कशी होती हें लक्षांत आणा. तिच्या बरोबर भाऊ, बहीण, किंवा माहेराकडील दुसरें कोणी नव्हतें. त्या परस्थळीं तिचें एकही कोणी ओळखीचें नव्हतें. घरांत मनाच्या समाधानाकरितां लेंकरूंदेखील नव्हतें. तरी ती अशा उदासपणावरून नवऱ्याला दोष लावीत नसे. पुढें ह्याच ठिकाणीं परमेश्वर माझ्या नातवाला दर्शन देऊन फार महत्त्वाचा आशीर्वाद देणार आहे हें जर तिला कळलें असतें, तर मोठ्या संतोषास कारण झालें असतें. पण तिला तें कळलें नाहीं.

तर मग तिला तेथें कसें करमलें असेल? असें म्हटलें, तर तिचाही देवावर तिच्या नवऱ्याप्रमाणें विश्वास होता यांत संशय नाहीं. अणखी, मी आपल्या नवऱ्याच्या सुखाची केवळ नव्हे, तर दुःखाचीही वांटेकरीण होण्यास मान्य असावें असें तिला वाटलें. हा सर्व देश एका शेवटा-

पासून दुसऱ्या शेवटापर्यंत आपल्या संतानाकडून भरला जाऊन त्याच्याच श्रमानें यांतील शहरें, गावें, शेतें, द्राक्षमळे हीं सर्व फार सुशोभित होतील हें त्या वेळेस तिच्या स्वप्नींदेखील नव्हतें.

बेथेलापासून दक्षिणेकडे फिरतां फिरतां चारा व पाणी यांची बरीच कमताई पडूं लागली. शेवटीं असा दुष्काळ पडला कीं, आब्राहामानें मिसर देशास जाण्याचा निश्चय केला. तो देश फार सुपीक असून, त्या सर्व मनुष्यांस व कळपांस पुरतें अन्न व चारा असल्यामुळें तेथें त्यांचें राहणें फार सुखाचें झालें असतें. पण तेथें गेल्यावर आब्राहामाकडून एक मोठा अपराध घडला, व त्याच्या मसलतीस साराही कबूल झाली. ती रूपानें फार सुंदर, सदाचरणी, व मनमिळाऊ अशी होती; जेथें जेथें ते फिरत, तेथें सर्व लोक तिचे गुण घेत, व स्तुति करीत.

असें असतां मिसर देशाच्या जवळ जवळ आल्यावर आब्राहामास तिजविषयीं फार काळजी उत्पन्न झाली. तेथला राजा स्वेच्छाचारी आहे, आणि जर त्याला कळलें कीं, ही सुंदर स्त्री याची बायको आहे, तर तिच्यासाठीं तो कदाचित् मला मारील असें समजून त्यानें तिला ही युक्ति सांगितली-तो म्हणाला, "तूं फार रूपवान आहेस म्हणून हे दुष्ट मिस्री तुला प्राप्त करून घेण्याकरितां मला जीवें मारतील; यास्तव तूं असें म्हण कीं, मी त्याची बहीण आहें, म्हणजे माझा जीव वांचेल." ही गोष्ट एका प्रकारें खरी होती, कारण ती त्याची सावत्रबहीणच होती. हें वाचकांस विलक्षण दिसेल. पण त्या पुरातनकाळीं पृथ्वीवर थोडकेच लोक असल्यामुळें जवळच्या नातलगांशीं लग्नसंबंध करण्यास हरकत नसे. तरी ही त्याची सूचना रास्त

नव्हती, आणि सारेलाही ती योग्य दिसली नसेल. 'तो माझा नवरा नाहीं' असें मी कसें म्हणूं! त्यानें मला खोटें बोलायास सांगितलें याचा काय परिणाम होईल? असा तिच्या मनांत विचार घोळूं लागला असेल. पण ती बाई फार शिडस्त व आज्ञांकित होती; माझा नवरा हा माझा धनी, जी त्याची इच्छा ती माझी इच्छा असावी असें समजून ती त्याच्या सांगण्यास मान्य झाली. पण हें तिचें वर्त्तन देवाच्या आज्ञेविरुद्ध होतें.

पुढें ते मिसरांत पोहंचल्यावर तेथील रहिवाशांत लवकरच बातमी पसरली कीं, एथें कोणी मोठा श्रीमान् गृहस्थ पुष्कळ चाकर-नौकर व जनावरांचे कळप घेऊन आला आहे. शेवटीं ती बातमी राजाच्या कानावर गेली. तो राजा जरी देवाचें किंवा मनुष्याचें भय धरीत नसे, तरी तो फार दुष्ट किंवा जुलमी होता असें दिसून येत नाहीं.

जेव्हां त्यानें त्या स्त्रीविषयीं ऐकिलें, तेव्हां ती आपल्या जनानखान्यांत असावी असा हेतु धरून त्यानें तिला जबरदस्तीनें नवऱ्यापासून काढून आणिलें नाहीं, तर अगोदर तिजविषयीं विचारपूस केली. तेव्हां त्याला असें कळून आलें कीं, ती त्या मनुष्याची बायको नसून बहीण आहे. मग अर्थातच राजानें तिला आपल्या महालाकडे बोलावून घेतलें. पण त्यानें तेव्हांच तिला आपल्या जनानखान्यांत ठेविलें नाहीं एवढें बरें केलें, नाहीं तर ती जीवंत कधीं बाहेर पडली नसती.



आब्राहाम त्या वेळेस केवळ दुःखसागरांत बुडून गेला असेल. राजासमोर माझा उपाय चालणार नाहीं; माझ्या तर्फे बोलायास तेथें कोणी नाहीं; अणखी मीं अगदीं अविचारीपणानें हें अरिष्ट आपणावर आणिलें आहे, व माझी बायको जी मला डोळ्यांतील बुबळाप्रमाणें प्रिय, ती आतां पुनः दृष्टीस पडणार नाहीं असें मनांत आणून त्यानें फार शोक केला असेल. पण त्यानें देवावरची आशा सोडिली नाहीं. देवाला माझा सर्व अशक्तपणा ठाऊक आहे, आणि तो ह्या माझ्या मोठ्या अपराधाची क्षमा करून मला संकटांतून सोडवील असा त्यानें भरंवसा धरिला.

देवाचें लक्ष्य त्याच्या भक्तांकडे असतेंच, आणि तो हरएक रीतीनें त्यांस संकटांतून मुक्त करितो, असा आब्राहामास पूर्वींच अनुभव आला होता. सारा राजवाड्यांत आ-

त्यावर थोडक्याच वेळानें राजाच्या सर्व कुटुंबांत व जनानखान्यांत एक पीडा होऊं लागली, ती देवापासून आहे असें राजानें जाणून त्या नवीन आणिलेल्या स्त्रीविषयीं बारीक शोध केल्यावर त्याला समजलें कीं, ही त्या गृहस्थाची बायको आहे. तेव्हां राजानें आब्राहामास बोलावून त्याचा ह्या वर्तणुकीबद्दल खडसून निषेध केला. तो त्याला म्हणाला कीं, "त्वां हें काय केलें? ती माझी बायको आहे असें कां सांगितलें नाहीं? ती माझी बहीण आहे असें तूं कां बोललास?" नंतर सारेला तिच्या नवऱ्याच्या स्वाधीन करून त्यांस आपल्या देशांतून रवाना केलें. त्या प्रसंगीं त्या स्त्रीपुरुषांनीं नम्र होऊन देवाची केवढी उपकारस्तुति केली असेल, व किती हर्षानें तीं खनान देशाची वाट धरून चाललीं असतील हें सांगायास नको.



उत्तरेस जातां जातां ज्या बेथेल गांवांत आब्राहामानें पूर्वीं वेदी बांधून होमार्पणें केलीं होतीं, तेथें पोंचून त्यानें विशेष प्रकारें देवाची भक्ति केली. मिसरांत असतांना त्याची संपत्ति फार वाढली असावी असें वाटतें, कारण त्याच्याविषयीं असें म्हटलें आहे कीं, सोनें व रूपें व जनावरांचे कळप यांकडून तो मोठा संपत्तिमान झाला होता. लोटाजव-

ळही पुष्कळ गुरेंढोरें व मेंढरें असून त्याच्या व आब्राहामाच्या गुराख्यांमध्यें चाऱ्यापाण्याविषयीं वारंवार कुरकूर व कधीं कधीं भांडणेंही होऊं लागलीं, यामुळें आब्राहामाला वाईट वाटलें. तो फार उदार मनाचा, म्हणून त्यानें आपली सुखसोय कांहीं न पाहतां लोटाला सांगितलें कीं, या देशाच्या लोकांसमोर आपणांमध्यें तंटे नसावे; तर कोठेंतरी तूं आपल्यास एखादें ठिकाण निवडून तेथें जाऊन राहा, आणि मी दुसरीकडे राहीन; मग भांडणाचें कारण उरणार नाहीं.

लोट अतिशय स्वार्थबुद्धीचा असल्यामुळें त्याला ती मसलत बरी दिसली. माझ्या चुलत्याचे मजवर अत्यंत उपकार आहेत, आणि मीं प्रथम त्याला सोईची जागा निवडूं द्यावी हें योग्य आहे असें त्याला सुचलें नाहीं. तर भरपूर चाऱ्यापाण्याचा शोध

लावून त्यानें सदोमाकडलें हिरवेंगार मैदान आपणाकडे घेतलें. तेव्हां आब्राहामास काय राहिलें? ज्यांत कुरणें, नद्या, व ओढे फारच थोडे होते असा केवळ एक डोंगरवट प्रदेश मात्र राहिला. तरी त्यानें संतुष्ट राहून त्या अनुपकारी लोटास कांहीं दोष लाविला नाहीं, किंवा त्याच्या सुखसोईवर लोभदृष्टि ठेविली नाहीं. ही त्याची निर्लोभ वर्त्तणूक देवानें फार पसंत केली असें दिसतें. कारण त्यानें आब्राहामास दर्शन देऊन असें कळविलें कीं, हा सर्व खनानदेश तुझ्या संतानाकडून भरला जाईल असें केवळ नव्हे, तर त्याची संख्या एवढी मोठी होईल कीं, ती कोणाच्यानें मोजवणार नाहीं.

सारेला तर त्या वेळेपर्यंत कांहीं लेंकरूंबाळ नव्हतें, आणि तें होण्याची आशाही नव्हती. याविषयीं विचार करतां करतां

शेवटीं तिला एक उपाय सुचला, तो असा कीं, तिनें मिसरांतून आपल्याबरोबर एक दासी आणिली होती, तिला आपल्या नवऱ्याची बायको होण्यास सांगावें असें तिनें मनांत आणिलें; मग तिला लेंकरें झालीं तर तीं आपलींच होतील. देवावर जर तिचा पूर्ण विश्वास असता, तर असा उपाय तिनें कधीं योजिला नसता. तिला समजलें असतें कीं, देवाला आपलें वचन सिद्धीस नेण्याकरितां अशा अयोग्य उपायाची गरज नाहीं. आब्राहामाचाही विश्वास त्या वेळेस यथास्थित नव्हता; नाहीं तर सारेच्या ह्या सूचनेला तो मान्य झाला नसता.

या गोष्टीवरून वाचकांस आश्चर्य वाटूं नये. साम्प्रतकाळीं देखील असे प्रकार कधीं कधीं होत नसतात काय? लेंकरांविषयींच्या गोष्टी देवाकडे न सोंपितां किती अविचारी स्त्रिया

भलभलतेच उपाय करून आपल्यावर व आपल्या सर्व घराण्यावर मोठें दुःख आणितात. त्याचप्रमाणें यांच्याही अनुभवास आलें. हागार म्हणून जी सारेची दासी ती आब्राहामाची बायको झाल्यावर जेव्हां तिला समजलें कीं, थोडे दिवसांनीं मी लेंकुरवाळी होणार, आणि तशी झालें म्हणजे मग मी सारेपेक्षां नवऱ्यास विशेष आवडती होईन, तेव्हां ती आपल्या धनिणीला तुच्छ मानूं लागली. अर्थातच सारेला हें अतिशय वाईट वाटलें. मीं आपल्या दासीला आपल्या नवऱ्यापाशीं दिलें, तितक्यावरून मीं तिला आपल्या बरोबरीचें केलें हा अपराध माझाच, असें मनांत न आणितां ती आब्राहामाजवळ गाऱ्हाणें करून त्यालाच दोष लाविती झाली. आब्राहाम फार सौम्य व सहनशील स्वभावाचा होता. त्यानें तिला असें म्हटलें नाहीं कीं, 'हें तूंच

केलेंस. मीं दुसरी बायको मागितली नव्हती, तूंच आग्रह करून ती मला दिलीस. आतां जें होईल तें सोसून घेतलें पाहिजे.' पण त्यानें तिला एवढेंच सांगितलें कीं, ही तुझी दासी आहे, तुझ्या खुशीस वाटेल त्याप्रमाणें कर. या शांत उत्तरावरून सारेला पुष्कळ विचार सुचायाचे होते, पण तसें झालें नाहीं. ती त्या बिचाऱ्या हागारेला फार गांजूं लागली; इतकें कीं, शेवटीं ती तेथून पळून रानांत गेली.

ती रानामध्यें हिंडतां हिंडतां एका पाण्याच्या झऱ्याजवळ येऊन बसली. तिला वाटलें कीं, मी एथें एकटीच आहें. पण तेव्हांच देवाच्या दूतानें तिला हांक मारून म्हटलें, "हागारे, तूं कोणीकडून आलीस, व कोठें चाललीस?" ती म्हणाली, "मी आपली धनीण सारा इच्यापासून पळत आहें." दूतानें तिला सांगितलें, "तसें करूं नको, परत ति-

जकडे जाऊन राहा, व सर्व गोष्टींविषयीं तिचें ऐकत जा. देव तुला संभाळील." शिवाय त्यानें तिला असें आनंदाचें वचन दिलें कीं, तुला पुत्रसंतान होऊन त्याचें नांव इश्माएल ठेवितील. याचा अर्थ " परमेश्वर ऐकेल;" कारण तो म्हणाला, "देवानें तुझें गाऱ्हाणें ऐकिलें आहे." अणखी तो बोलला कीं, तो रानटी माणूस होईल, त्याचा हात सर्वांच्या विरुद्ध आणि सर्वांचा हात त्याच्या विरुद्ध होईल, आणि तो आपल्या सर्व भावांच्या समोर वस्ती करील. इश्माएलाची संतती हेंच आरबलोक होत. ह्या ईश्वरी वचनांत ते लोक रानांत रहाणारे, व लढाऊ असे होतील, तथापि ईश्वर त्यांचा वंश राखून क्षय होऊं देणार नाहीं, असा अर्थ होता.

दूताच्या ह्या दर्शनावरून व बोलण्यावरून हागारेला किती आश्चर्य वाटलें असेल! तिचें

मन अगदीं सद्गदित होऊन गेलें असेल. मी केवळ एक गरीब दासी आहें, माझ्या धनिणीशीं माझी वर्त्तणूक जशी असावी तशी झाली नाहीं. तरी परमेश्वर माझी चिंता करितो, असें मनांत आणून ती म्हणाली, जो देव मला पाहतो, त्याचेंच मला दर्शन झालें काय? तेव्हां तिनें त्याला "मला पाहणारा देव" असें नाम ठेविलें.

हागारेला जो त्या वेळेस अनुभव झाला तो दुसऱ्या बहुतांस झाला नसेल काय? नीट मार्गांतून बहकून गेलेल्या किती स्त्रिया तिच्यासारख्याच उदास व निराश्रित होऊन बसल्या असतांना कोणाच्यातरी प्रीतीच्या शब्दांकडून त्यांस आशा लागून देवाजवळ प्रार्थना करायास प्रेरणा झाली असेल? आणि मग त्यांच्या प्रतितीस आलें असेल कीं, देव तर कांहीं दूर नाहीं, व जी प्रेमभरित वाणी आम्हीं ऐकिली ती त्याचीच आहे.

दूतानें सांगितल्याप्रमाणें हागार लागलीच उठून परत आपल्या धनिणीकडे गेली. ती तिच्या राहुटीजवळ पोहंचल्यावर काय काय गोष्टी घडल्या हें सांगायास नको. आपल्या दासीला पुनः पाहून सारेला आनंद झाला असेलच. हागार नम्र होऊन क्षमा मागूं लागली. तेव्हां सारेला वाटलें असेल कीं, मीं विनाकारण तिला इतकें दुःख दिलें. ती फार दिवसांपासून माझी विश्वासू दासी आहे. जो मीं तिला जाच केला तो योग्य नव्हता. मग प्रीतीनें तिजशीं बोलून तिनें पुनः तिला आपल्या जवळ ठेविलें, आणि पहिल्याप्रमाणें सर्व गोष्टी सुरळीतपणें चालू लागल्या असें दिसतें.

इश्माएल जन्मला तेव्हां आब्राहाम हेब्रोनामध्यें राहत होता. ज्याविषयीं देवानें वचन दिलें कीं त्यापासून इतकें मोठें संतान होईल कीं, तें मोजतां येणार नाहीं तोच हा माझा

वारीस पुत्र असें आब्राहाम समजला. पण तो तेरा वर्षांचा झाल्यावर देवानें आब्राहामास पुनः दर्शन देऊन पूर्वींप्रमाणेंच विशेष महत्त्वाचा आशीर्वाद दिला, आणि असेंही सांगितलें कीं, हा दासीपुत्र तुझा वारीस होणार नाहीं. तर जो पुत्र तुझी बायको सारा इला होणार आहे तोच वारीस समजावयाचा, व हा आशीर्वाद त्याच्याच संतानास प्राप्त होईल. त्या समयीं देवानें आब्राहामास असें अभिवचन दिलें कीं, मी तुझा व तुझ्या संतानाचा देव असा होईन, आणि हा सर्व देश त्यास वतन करून देईन; मात्र त्यानें विश्वासूपणानें वागून माझ्या आज्ञा पाळीत जाव्या. त्या वेळेस देवानें आब्राहामाचें नांव बदललें, म्हणजे पूर्वीं त्याला आब्राम म्हणत असत, पण पुढें आब्राहाम असें नांव ठेविलें. याचा अर्थ "राष्ट्रांचा बाप" असा आहे. सारेलाही पूर्वीं साराय असें म्ह-

णत, पण पुढें सारा म्हणजे राजकन्या असें देवानें म्हटलें.

आब्राहामास या गोष्टीवरून फार आश्चर्य वाटलें. तो म्हणाला, काय! मी शंभर वर्षांचा आणि माझी बायको नव्वद वर्षांची असतां आम्हां वृद्धांस संतान होईल काय? त्याला तें खरें वाटेना. कारण इश्माएलाविषयीं त्यानें विनंतीपूर्वक प्रार्थना केली कीं, देवा, अगत्येंकरून इश्माएलास जगूं दे. तेव्हां देवानें त्याला इश्माएलाबद्दल कृपेचीं वचनें दिलीं. पण त्यास पुनः निश्चयेंकरून सांगितलें कीं, माझें आशीर्वादाचें अभिवचन सारेच्या पुत्राविषयीं आहे. यावरून आब्राहाम व सारा यांनीं पुष्कळ विचार केले असतील, आणि त्या वचनाचा अर्थ काय असेल हें समजायास तीं फार उत्सुक झालीं असतील. कारण तें पूर्णतेस येईलच असा त्यांचा विश्वास नव्हता.

पुढें फार चमत्कारिक रीतीनें देवानें त्यांचे सर्व संशय दूर केले. उष्णकालांतील एका दिवशीं दुपारीं आब्राहाम आपल्या राहुटीच्या दारीं बसून हेब्रोनासभोंवतालच्या प्रदेशाचा सुंदर देखावा पाहात होता. जेथें तेथें पिकास आलेलीं गव्हाचीं व सातूचीं सोनेरी रंगाचीं शेतें दृष्टीस पडत आहेत, कोठें कोठें मैदानावर व डोंगरांमधील खोऱ्यांत असंख्य मेंढरें व गुरें चरत आहेत, गुराखी इकडे तिकडे आपले कळप राखीत फिरत आहेत; हा सर्व रमणीय देखावा पाहून आब्राहामाचें मन देवाच्या स्तुतीनें भरून गेलें असेल यांत संशय नाहीं. हा सुंदर देश देवानें माझ्या संतानास देऊं केला आहे, असें जाणून व धीर धरून त्याचें वचन पूर्ण होण्याची तो वाट पाहात होता.

याप्रमाणें आब्राहाम विचार करीत व सृष्टींतील सौंदर्य पाहात बसला असतां समोर-

च्या मैदानावरून तिघे प्रवासी आपणाकडे येत आहेत असें त्याच्या दृष्टीस पडलें. तो फार आदरातिथ्य करणारा असल्यामुळें लागलीच उठून त्यांस भेटायास पुढें गेला व मोठ्या आदरानें त्यांस नमन करून ह्मणाला, “महाराज, तुमची मजवर कृपा असली तर तसेंच जाऊं नये. थोडें पाणी आणूंद्या, आणि पाय धुऊन या झाडाखालीं थोडा विसांवा घ्या. थोडीशी भाजीभाकर आणितों ती खाऊन जीवास आधार करा, मग पुढें जा. कारण याकरितांच तुह्मी या दासाच्या राहुटीकडे आलां कीं नाहीं ?”

आपली विनंती यांनीं मान्य केली असें पाहून आब्राहामानें एका चाकरास एक वांसरूं कापण्याची आज्ञा देऊन सारेला जेवणाची तयारी करावयास सांगितलें. सर्व सिद्धता झाल्यावर त्यानें स्वतः तें बाहेर झाडा-

खालीं आणून त्या पाहुण्यांस वाढिलें. जेवण झाल्यावर त्यांतून एकानें विचारलें कीं, तुझी बायको सारा कोठें आहे? आपल्या बायकोचें नांव यांनीं घेतलें, यावरून आब्राहामास फार नवल वाटलें. कारण त्या देशाच्या रूढीप्रमाणें ती आपल्या राहुटींत होती, आणि तिचें नांव या मनुष्यांसमोर कोणींही उच्चारिलें नव्हतें. आब्राहामानें उत्तर दिलें कीं, ती आपल्या राहुटीमध्यें आहे. मग त्यांतील एकजण ह्मणाला, "मी खचीत तुह्मांवर कृपा करीन, आणि तुझी बायको सारा इला पुत्रसंतान देईन." तेव्हां आब्राहामाला कळलें कीं, हा प्रभु आहे. सारेला तर ते शब्द पडद्यांतून ऐकूं आले, आणि तिच्या मनांत संशय असतांना तिला असा आनंद झाला कीं, ती हंसून म्हणाली, मी म्हातारी असतां मला खचीत लेंकरूं होईल काय? तितक्यांत तिनें प्रभूचें हें बोलणें ऐकिलें

कीं, "सारा असें कां हंसून म्हणते कीं, मला खचीत लेंकरूं होईल काय? परमेश्वराला कोणतीही गोष्ट असाध्य आहे काय? तर आतां हें जाणा कीं, मुदतीप्रमाणें सारेला पुत्र होईलच." तेव्हां सारा भिऊन आपणाशीं म्हणाली, मी हंसलें नाहीं. तो बोलला, "असें नाहीं, तीं हंसलीच." यावरून ज्यानें माझें पडद्यांतील गुप्त बोलणें व करणें जाणिलें तो सर्वज्ञ परमेश्वर असावा अशी तिची खातरी झाली.

नंतर ते तिघेजण तेथून उठून जाऊं लागले, व आब्राहाम त्यांस वाटे लावायास गेला. चालतां चालतां जसा कोणी आपल्या मित्राशीं बोलतो तसें प्रभूनें आब्राहामाशीं बोलून त्यास आपला मनोदय कळविला. तो मनोदय सदोम व गमोरा या शहरांविषयीं होता. त्यांतील लोक फार दुष्ट झाल्यामुळें त्यांचा अग्नीकडून अगदीं विनाश करावा असें देवानें योजिलें होतें. पण

आब्राहामाचा पुतण्या लोट तो तेथें राहात होता, म्हणून ती गोष्ट ऐकून आब्राहामानें देवाजवळ फार आग्रहानें विनंती केली कीं, "कृपा करून आतांच या शहरांचा नाश करूं नये. कोण जाणे कदाचित् त्यांत कोणी कोणी नीतिमान मनुष्यें असतील, तर त्यांच्यासाठीं दया करणार नाहींस काय?" पण तेथें त्या लोकांपैकीं तसा एकही नव्हता. म्हणून देवानें त्याची विनंती मान्य केली नाहीं. दुसऱ्या दिवशीं आब्राहाम उठून त्या शहरांच्या दिशेकडे पाहूं लागला, तों त्यांच्यावरतीं ढगांसारिखा धुराचा लोळ उठला आहे असें दृष्टीस पडलें. लोट आणि त्याच्या दोन कन्या यांस मात्र देवानें दया करून वांचविलें. पुढें तो धूर नाहींसा झाल्यावर सदोम व गमोरा यांच्या ठिकाणीं सर्व जलमय होऊन गेलें. तुर्कस्थानांत ज्याला आजपर्यंत मृतसमुद्र म्हणत आले तो हाच होय.

या सर्व गोष्टी झाल्यानंतर कांहीं दिवसांनीं चाऱ्यापाण्याच्या अडचणीमुळें किंवा दुसऱ्या कांहीं कारणामुळें आब्राहाम हेब्रोन सोडून दक्षिणेकडे फिरत फिरत पलिष्टी लोकांच्या एका नगरांत जाऊन राहिला. तेथेंही मिसर देशांतल्याप्रमाणेंच गोष्ट घडली. आबीमलेख जो तेथला राजा होता त्यानेंही सारेच्या स्वरू-पाचें वर्णन ऐकिलें, आणि शोध केल्यावर ती आब्राहामाची बहीण आहे असें त्याला सम-जलें. यावरून दिसतें कीं, पहिल्याप्रमाणेंच आब्राहामानें तिला म्हणायास सांगितलें होतें. कोणासही वाटेल कीं, मिसर देशांतल्या अनु-भवावरून तो सावध होऊन पुनः त्याच पाशांत पडणार नाहीं. पण ह्या एका गोष्टीविषयीं त्याचा फार अल्प विश्वास दिसून येतो. सा-रेचें वय नव्वद वर्षांचें झालें असतांना ती इतकी रूपवान दिसत होती कीं, आब्राहाम

तिजविषयीं फार काळजी करी, हें आम्हांस या काळांत विलक्षण दिसतें. पण त्या पुरातनकाळीं मनुष्यें फार दीर्घायुषी असत हें मनांत आणिलें पाहिजे. शिवाय देवानें आब्राहामास संतानाविषयीं जें वचन दिलें होतें त्यावरून सारेविषयीं काळजी वाहण्यास विशेष कारण झालें.

तो राजा सारेला बोलावून आणून लागलीच आपली बायको करणार, इतक्यांत देवानें त्याला स्वप्नद्वारें कळविलें कीं, जी स्त्री तूं आणिली आहेस, ती आब्राहामाची बायको आहे. तिला आपल्याजवळ ठेवूं नको, नाहीं तर तुजवर कांहीं तरी मोठें अरिष्ट येईल. राजा फार भिऊन म्हणाला कीं, हें मला अगदीं ठाऊक नव्हतें, ती त्याची बहीण आहे असें समजून मीं तिला आणिलें. मग त्यानें आब्राहामास बोलावून विचारिलें कीं, हें तूं असें

कां केलेंस? ती माझी वायको आहे असें कां सांगितलें नाहींस? आब्राहामानें त्याला समजावून सांगितलें, ती माझी सावत्र वहीण आहे खरी, आणि मीं तिला असें म्हटलें होतें कीं, जेथें कोठें आपण जाऊं तेथें ‘मी त्याची वहीण आहें’ असें सांगत जा. म्हणजे माझा जीव वांचेल; नाहीं तर कोणी कदाचित् तुझ्यामुळें मला मारील.

राजानें त्याचा योग्य रीतीनें निषेध केला, परंतु त्याची दुसरी वर्त्तणूक पाहून हा देवाचा खरा भक्त आहे असें त्यानें जाणिलें व त्याला कांहीं मोलवान देणगी दिली, आणि सारेला तो म्हणाला, “पाहा, म्यां तुझ्या भावाला रुप्याच्या हजार मुद्रा दिल्या आहेत; पाहा, जे अवघे तुझ्या संगतीं त्यांसमोर व सर्वांसमोर तें तुला डोळ्यांचें आच्छादन असो.” अशा प्रकारें त्यानें तिचाही निषेध केला. हें त्यांचें

दुसऱ्या वेळचें मूर्खपण व पाप यांबद्दल तीं दोघें बरींच दुःखी व पश्चात्तापी झालीं असतील यांत संशय नाहीं.

पुढें देवानें सांगितल्या मुदतीप्रमाणें सारेला पुत्र झाला, तेव्हां त्या घरांत जो आनंद झाला तसा पूर्वी कधीं झाला नव्हता. हें खरोखर माझेंच बाळ आहे असें तिला वाटेना. तरी देवानें आपल्या वचनाप्रमाणें खरोखरच तिला बाळ दिलें, त्यावरून तिच्या मनांत हर्ष मावेना. किती वेळां तिनें तें गोजीरवाणें तोंड कुरवाळितांना आनंदाश्रु गाळिले असतील! देवानें मला धन्य केलें आहे; मी त्यावर विश्वास ठेवण्यास किती संशय धरिला होता! देवाला आपलें वचन पूर्ण करण्याकरितां मज दुबळीची मदत पाहिजे असें जें मला वाटत होतें तें किती अयोग्य होतें! अतःपर अशी कल्पना माझ्या मनांत न येवो. असे विचार करून तिनें

प्रार्थना केल्या असतील. आब्राहामानेंही आपल्या अल्प विश्वासाचा पुष्कळ खेद केला असेल, आणि त्या पुत्ररत्नामुळें देवाची स्तुति अंतःकरणापासून गायली असेलच. हा पुत्र आमच्या वृद्धापकाळांत आह्मांस आनंद देणारा आहे इतकेंच नव्हे, पण जो मोठा आशीर्वाद देवानें देऊं केला त्याचा वारीस होणार आहे, असें जाणून तीं आईबापें विशेष प्रकारें हर्षित झालीं. सारा ह्मणाली कीं, देवानें मला हंसविलें आहे; यावरून तिनें त्याचें नांव इझाक ठेविलें. याचा अर्थ हंसणें असा आहे.

परंतु ह्या सर्व आनंदामध्यें एकजणास मात्र दुःख वाटलें, तो कोण ह्मणाल तर दासीपुत्र इश्माएल हा होय. पूर्वी तो समजत असे कीं, मीच आपल्या बापाच्या सर्व संपत्तीचा वारीस आहें. पण आतां त्या बाळाकडे पाहून, मला नाहीं, तर त्याला हें मोठें वतन प्राप्त हो-

णार आहे असें मनांत आणून तो त्याचा फार हेवा करूं लागला. तें नव्हतें तेव्हां सर्वांचें लक्ष मजकडे असे, आतां मला कोणी पुसत नाहीं, आणि या घरांत आतां माझी कोणाला गरजही नाहीं, असें तो आपल्या मनांत ह्मणत असेल. याप्रमाणें त्याची ही असंतुष्ट वृत्ति दिवसेंदिवस वाढत गेली.

इझाक सुमारें तीन वर्षांचा झाल्यावर आब्राहामानें त्याच्या अन्नप्राशनाचा संस्कार करून त्या प्रसंगीं एक मोठी जेवणावळ केली. असा समारंभ इश्माएलाकरितां केला नव्हता, ह्मणून त्यानें तो पाहून त्या बाळकाचा उपहास व निंदा केली; त्याच्या अगोदरही तो त्याची थट्टा करीत असेल असें दिसतें. तें सर्व सारेनें ऐकिलें. तिनें त्या दासीची व तिच्या पुत्राची पुष्कळ अमर्यादेची वर्त्तणूक सोसली होती. पण जीवाहून प्रिय जें आपलें बाळ त्या-

ची निंदा तिला सोसवेनाशी होऊन तिनें आ-ब्राहामाजवळ विनंती केली कीं, या दोन्ही मा-यलेकांस तावडतोब घरांतून काढून द्या. हें ए-कून आब्राहाम मोठ्या पंचाईतींत पडला. इ-श्माएल हा त्याचा प्रथम पुत्र असून त्यावर त्याचा लोभ होता, आणि हागार त्याची आई असल्यामुळें तिला आश्रय देऊन संभाळावें हें त्याला नीट दिसलें. पण आतां काय करावें हें त्याला सुचेना. त्या समयीं देवानें आपल्या सेवकाच्या मदतीस येऊन त्यानें काय करावें हें सांगितलें. तो ह्मणाला, "इश्माएल तुझा पुत्र आहे खरा, व मी त्याला आशीर्वाद दे-ऊन त्यापासून राष्ट्रं उत्पन्न करीन. पण इझा-कापासून जे उत्पन्न होतील ते तुझें संतान ह्म-टले जातील. म्हणून हागारेविषयीं सारा जें तुला सांगते तें ऐक." देवाची ही इच्छा क-ळतांच आब्राहाम जरी दुःखित होता तरी तसें

करण्यास मान्य झाला. त्यानें पहांटेस उठून कांहीं भाकरी व पाण्याची मसक घेऊन हागारेजवळ दिली, व तिची इश्माएलासुद्धां रवानगी केली.

ज्या घरांत ती इतकीं वर्षें राहिली होती तें सोडून जाते वेळीं बिचाऱ्या हागारेनें किती शोक केला असेल! यहूदा व मिसर देश यांच्यामध्यें एक ओसाड रान आहे, त्यांतून त्या मायलेकरांस जावें लागलें. चालतां चालतां वाटेनें मसकेंतलें पाणी सरलें, व कोठेंही पाणी दिसेना. मुलगा तहानेनें व्याकूळ झालासें पाहून तिनें त्याला एका झुडपाखालीं निजायास सांगितलें, व आपण अमळ दूर जाऊन बसली. ती म्हणाली, आतां ह्या मुलाचें मरण आपण पाहूं नये. इश्माएलाच्या जन्मापूर्वी ती ह्याच रानांत फिरत असतांना देवानें आपला दूत तिजकडे पाठविला होता त्याची तिला

आठवण राहिली नसेल असें वाटतें. नाहीं तर ती इतकी निराश झाली नसती. पण या वेळे-सही देवाचें लक्ष तिजकडे होतेंच. अशा मो-ठ्या संकटांत असतांना तिला एक गोड वाणी ऐकूं आली. तेव्हां तिला स्मरण झालें कीं, पूर्वीं मीं जी वाणी ऐकिली ती हीच असावी. ती अशी—"अगे हागारे, तुला काय झालें? भिऊं नको. देवानें तुझ्या मुलाचा शब्द ऐकिला आहे. ऊठ, त्याला उचलून हातीं धर, कां तर मी त्याचें मोठें राष्ट्र करीन."

असें दूत बोलत आहे इतक्यांत हागारेच्या दृष्टीस एक पाण्याचा झरा पडला. तेव्हां केव-ढ्या उत्कंठेनें तिनें आपली मसक घेऊन तींत तें जीवन देणारें पाणी भरून मुलास पाजिलें व आपणही प्याली असेल. हागारेनें ह्या दयेबद्दल देवाची फार उपकारस्तुति केली असावी. पुढें त्यास राहण्याजोगें एक ठिकाणही सांपडलें.



तेथें इश्माएल मोठा होऊन प्रख्यात धनुर्धर झाला. त्याच्या आईनें त्याच्यासाठीं मिसर देशांतून बायको पाहून आणिली, आणि तिजपासून त्याला बारा पुत्र झाले. जे आरब लोक आजपर्यंत अर्बस्थानांत रानोरान फिरत आहेत, व प्रसंगानुसार निराश्रित

वाटसरांस लुटतातही, ते त्यांचेच वंशज आहेत. यावरून जी भविष्य गोष्ट इश्माएलाच्या संतानाविषयीं सांगितली होती ती पूर्ण झाली असें दिसतें.

इकडे आब्राहामाच्या घरीं इझाक सतरा वर्षांचा झाल्यावर एक फार आश्चर्यकारक गोष्ट घडली. जो दयासागर देव आब्राहामास आपला मित्र म्हणवून त्याला वारंवार दर्शन देत असे, त्यानें त्याची अशा प्रकारें भेट घेतली कीं, आब्राहामाच्या विश्वासाची मोठी परीक्षा झाली. देवानें त्याला एकाएकीं आज्ञापिलें कीं, "आब्राहामा, तूं आपला पुत्र इझाक ज्यावर तूं प्रीति करितोस त्याला घेऊन मोरया देशास जा, व तेथें जो डोंगर मी दाखवीन त्यावर त्याचें होमरूपें अर्पण कर." ही गोष्ट आब्राहामास केवढी कठीण वाटली असेल! इश्माएल तर गेलाच, आणि हा माझा एकु-

लता पुत्र असून सारेपासून जन्मलेला असा आहे. तिला तो जीवाहून प्रिय, त्याला दुखणें-बाहणें आलें कीं ती मोठ्या काळजींत पडते. आतां जर मी तिला देवाची ही आज्ञा कळवीन तर ती मुलाला माझ्याबरोबर कधीं येऊं देणार नाहीं; किंवा तिला जर न कळवितां त्यास नेईन व सर्व झाल्यावर तिला सांगेन तर त्या दुःखानें ती व्याकूळ होऊन प्राण सोडील. असा विचार करतां करतां त्याचे हातपाय गळून गेले असतील. पण आतां त्यानें काय करावें! ज्या देवानें संतानाविषयीं अभिवचन दिलें आहे तोच हें करायास सांगतो. तो तर सत्य व अढळ आहे असें मनांत आणून आब्राहामाचा विश्वास स्थिर होऊं लागला. त्यानें निश्चय व तयारी करण्यास विलंब लाविला नाहीं. तो आपलें दुःख तसेंच पोटांत ठेवून मोठ्या पहाटीं मुलास घेऊन निघाला.

आब्राहाम फार भक्तिशील होता, व होम अर्पणें वगैरे करायास नेहमीं कोठें कोठें जात असे, म्हणून त्याकडे कोणीं फारसें लक्ष दिलें नाहीं. वाटेच्या मदतीकरितां त्यानें फक्त दोन चाकर बरोबर घेतले होते, व होमाकरितां गाढवावर लांकडें घालून व हातांत विस्तव व सुरी घेऊन तो चालता झाला. सारेनें आपल्या प्रिय मुलास नित्याप्रमाणें क्षेमालिंगन देऊन वाटेस लाविलें. आब्राहाम त्याला अशा हेतूनें घेऊन जात आहे, हें तिला काय ठाऊक! त्या भाविक सेवकाची तर सर्व भिष्ठा देवावर होती, नाहीं तर ती मायलेकरांची ममता पाहून त्याचें हृदय फुटून गेलें असतें. इझाक बापाबरोबर जाण्यास फार आनंदित झाला असेल.

ते दोन दिवसांच्या वाटेवर गेल्यानंतर मोरिया डोंगर त्यांच्या दृष्टीस पडला. ते जवळ

आले, तेव्हां आब्राहामानें त्या चाकरास तेथेंच गाढवापाशीं राहायास सांगून लांकडें इझाकाच्या खांद्यावर दिलीं, आणि आपण विस्तव व सुरी घेऊन दोघे वर चढूं लागले. तेव्हां इझाक म्हणाला, "बाबा, आपण लांकडें व विस्तव घेतला आहे खरा, पण होम करायास कोंकरूं कोठें आहे?" ह्या प्रश्नाला उत्तर देणें आब्राहामाला किती कठीण गेलें असेल? तरी त्याचा विश्वास ढळला नाहीं. तो म्हणाला, "बाळा, देव आपणास कोंकरूं मिळवून देईल." पुढें ते डोंगराच्या माथ्यावर पोहंचले, तेव्हां आब्राहामानें वेदी रचून तयार केली. मग आपला जिवलग पुत्र इझाक याला धरून त्याचे हातपाय बांधूं लागला. आतां कोंकरूं कोण हें त्या मुलास समजलें. पण त्यानें बांधूं दिलें असेल काय? तो तरुण, बळकट, व चपळ असतांना कोंकराप्रमाणें गरीब होऊन त्या

अशक्त म्हाताऱ्या बापाच्या स्वाधीन झाला असेल काय? बापाच्या हातांत दोरी असून ते थरथर कांपत आहेत असें त्याला दिसलें. त्याच्या हातून सहज सुटून घराकडे पळून जातां आलें असतें, पण तो गेला नाहीं. बापाच्या चेहऱ्यावरून त्याला समजून आलें कीं, त्याचें अंतःकरण अगदीं फाटून गेलें आहे. आतां आपण त्याला अमान्य होऊन अधिक कष्टी करावें काय? माझा बाप देवाच्या आज्ञेप्रमाणें हें करीत आहे तर मीं त्याच्या करण्यास मान्य होऊं नये काय? असे विचार त्या आज्ञांकित मुलाच्या मनांत उद्भवले असतील. त्यावरूनच देवाकडे पाहून तो तेथें निरुपाय असल्यासारखा बांधून घेण्यास व त्या वेदीवर अर्पिला जाण्यास मान्य झाला. केवढा हा त्या पित्यापुत्रांचा विश्वास!!!

पण त्या वेळेस परमेश्वर आपलें वचन वि-

सरला काय? ज्या इझाकापासून एवढें मोठें संतान होणार आहे म्हणून त्यानें अभिवचन दिलें होतें त्याचा प्राण त्यानें राखिला नसेल काय? होय, राखिला. आब्राहाम माझ्या आज्ञेवरून आपला एकुलता पुत्र वधायास तयार झाला एवढें पाहून देव संतुष्ट झाला. बापानें हातीं सुरी घेतांच अशी आकाशवाणी झाली कीं, "तूं मुलावर हात टाकूं नको व त्याला कांहींच करूं नको."






त्या समयाचा आनंद कोण वर्णूं शकेल! मला असें वाटतें कीं, त्या मुलाचीं बंधनें सोडते वेळीं त्या वृद्ध बापाचे हात केवळ हर्षानें ल-

टलटां कांपले असतील. नंतर त्यांस होम करायास जवळच झुडपांत एक मेंढरूं सांपडल्यावर तो विधि आटोपून देवाची स्तुति गात ते बापलेक डोंगरावरून खालीं उतरले.

अशा विलक्षण अणीबाणीच्या प्रसंगांतून निभावून ते आले आहेत हें त्यांच्या खालीं राहिलेल्या चाकरांस काय ठाऊक होतें? ते सर्व तेथून घराकडे निघाल्यावर कदाचित् आब्राहामानें वाटेनें त्यांस ती हकीकत सांगितली असेल. किंवा घरीं गेल्यावर आपली बायको व चाकरमाणसें एकत्र बोलावून त्यांस ती सविस्तर कळवून देवाच्या महत्कृपेचें वर्णन केलें असेल, आणि त्यावरून सर्वांनीं हर्षित होऊन देवाची उपकारस्तुति गायली असेल यांत संशय नाहीं. त्या दिवसापासून हा मुलगा देवाची विशेषप्रकारची देणगी आहे असें त्या आईबापांनीं मानिलें असावें.

इझाकाचें वय सदतीस वर्षांचें होईपर्यंत सारा जगली. नंतर ती मोठ्या शांतीनें मरण पावली. त्या वेळेस तिचें वय एकशें सत्तावीस वर्षांचें होतें. आब्राहामानें तिच्यासाठीं फार शोक केला. त्या लोकांच्या रूढीप्रमाणें तिच्या कबरेकरितां त्यानें एक मोठी गुहा विकत घेतली, व तींत तिचें प्रेत ठेविलें. त्याच गुहेंत त्या सर्व घराण्यास एकामागून एक अशी जागा मिळत गेली. जगाच्या समाप्तीस पुनः उठण्याच्या दिवशीं ते तेथूनच जीवंत होऊन उठतील व सर्व भक्तजनांबरोबर प्रभुसंगतीं राहण्यास सदेह आकाशांत चढतील.





## ३.

# रिब्का.

आब्राहामाची प्रिय पत्नी सारा इच्या मरणानें त्या हेब्रोनांतील सुखी कुटुंबाची फार निराळी स्थिति झाली. घरीं-दारीं सर्व कांहीं उदास दिसूं लागलें. त्या सुंदर प्रदेशाच्या भव्य देखाव्याकडे पाहून हे-

खील आब्राहामाचें मन रमेना. सारेप्रमाणें सद्गुणी व सुज्ञ सोबतीण मला पुनः मिळणार नाहीं हें त्याला ठाऊक होतें. आणि हें जसजसें तो मनांत आणूं लागला तसतसा तो इझाकाच्या सोयरिकीविषयीं काळजी करूं लागला. तो म्हणे कीं, त्याच्या आईच्या गुणांची जर त्याला बायको मिळेल तर खचीत त्याचें कल्याण होईल. नाहीं तर या देशांतील विधर्म्यांच्या मुलीशीं त्याचें लग्न केलें तर कदाचित तिजकडून तो बहकून त्या अमोल्य आशीर्वादास मुकेल.

आब्राहाम जेव्हां आपली जन्मभूमि मसपटेम्या ही देवाच्या आज्ञेवरून सोडून तो खनान देशास गेला तेव्हां त्याचा भाऊ नाहोर तेथेंच राहिला असें सारेच्या वृत्तांतांत दर्शविलें आहे. पुढें आब्राहामाच्या मनांत असें आलें कीं, त्या भावाच्या मुलीविषयीं विचारपूस करायास

कोणाला तरी पाठवावें. त्या कामाकरितां त्यानें आपल्या सर्व चाकरांमध्यें एलियेजर नामक जो विश्वासू चाकर होता त्यास बोलावून त्याच्या जवळ ती गोष्ट काढिली, आणि त्यापासून मी शक्तीप्रमाणें आपल्या धन्याचा हेतु सिद्धीस नेण्यास प्रयत्न करीन, असें वचन घेतलें.

नंतर एलियेजरानें आपल्या धन्याच्या योग्यतेप्रमाणें भेटीच्या वस्तु दाहा उंटांवर लादून निघाला. ईशान्येकडे प्रवास करतां करतां तो मसपटेम्या देशांत नाहोराच्या गांवास येऊन पोहंचला. परंतु लागलींच आंत शिरला नाहीं. बाहेरच्या एका विहिरीवर उतरून तेथें त्यानें अंतःकरणपूर्वक अशी प्रार्थना केली कीं, देवानें माझें काम सफळ करावें, आणि कोणती मुलगी माझ्या धन्याच्या पुत्रासाठीं योजून ठेविली आहे ती मला दाखवावी. आणखी त्यानें असें सांगितलें कीं, जी त्वां निवडली

आहे तिनें या विहिरीवर येऊन मला व माझ्या उंटांला पाणी पाजावें असें कृपा करून घडूं दे. इतकें बोलून तो वाट पाहात बसला.

थोड्या वेळानें एक फार सुंदर उपवर मुलगी हातीं घागर घेऊन येत आहे असें त्यानें पाहिलें. तिजकडे न्याहाळून पाहून त्याला असें दिसून आलें कीं ती मोठी देखणी आहे इतकेंच नव्हे, पण मर्यादशील व कुलीनही आहे. तिची परीक्षा पाहण्याकरितां जेव्हां त्यानें तिजपाशीं पाणी प्यायास मागितलें, तेव्हां तिनें फार खुशीनें आपली घागर भरून आणून म्हटलें, हें घ्या, प्या, मी तुमच्या उंटांलाही पाजितें. असें बोलून तिनें आणखी पाणी शेंदून काढून त्या दाहाही उंटांस पाजिलें. हा चमत्कार पाहून आब्राहामाचा कारभारी फार थक्क होऊन गेला, व मनांत देवाची स्तुति करूं लागला. नंतर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.



त्यानें तूं कोणाची कन्या आहेस म्हणून विचारिलें, तेव्हां ती म्हणाली, नाहोराचा पुत्र बथुवेल याची मी कन्या आहें. हें ऐकून त्याची खातरी झाली कीं, हीच मुलगी माझ्या धन्याच्या पुत्रास देवानें नेमिली आहे.

मग त्यानें आपल्या थैलींतून सोन्याची नथ व दोन सोन्याच्या बांगड्या काढून तिला दिल्या. तें पाहून मुलीला फार आश्चर्य वाटलें असेल. पण जशी कोणी सुस्वभावी व आज्ञांकित मुलगी करिते त्याप्रमाणें तिनें धांवत जाऊन आपल्या आईला तें सर्व सांगितलें. आईलाही नवल वाटलें. मग त्या मनुष्यास बोलावून घेतल्यावर त्याला आब्राहामानें कशाकरितां पाठविलें आणि त्यानें एथें आल्यावर कशी प्रार्थना केली व देवानें कोणत्या रीतीनें त्याला उत्तर दिलें हें सर्व त्याच्या मुखानें ऐकिल्यावर त्या कुटुंबास

मोठा आचंबा वाटला, व ते म्हणाले, ही देवाचीच योजना आहे याकरितां आमच्यानें नाहीं म्हणवत नाहीं. परंतु त्या सुज्ञ आईबापांनीं मुलीचें मत घेतल्याशिवाय त्यास पक्कें वचन दिलें नाहीं.

मग त्यांनीं तिला विचारिलें कीं, तूं या मनुष्याबरोबर त्या दूर देशास जातेस काय? तेव्हां ती आज्ञांकित व विचारशील मुलगी म्हणाली, जातें. तिला ठाऊक होतें कीं, माझे आईबाप माझें हितच पाहतात. कधीं अनहित पाहणार नाहींत. आणखी, त्या चाकरानें आपला जो धनी इझाक त्याचें जें वर्णन केलें त्यावरून तिला दिसून आलें कीं, तो देवाचा खरा भक्त आहे, आणि असल्याच्या सहवासांत आपणास सुखच होईल. तिनें साराबाईचीही गोष्ट ऐकिली असेल कीं, ती आपल्या पतीबरोबर कशी दूर देशास गेली,

आणि तेथें देवाच्या आशीर्वादाकडून कशी भाग्यवान झाली; हें सर्व मनांत आणून ती जाण्यास मान्य झाली.

तिचें उत्तर ऐकून त्या मनुष्यास इतका आनंद झाला कीं, त्यानें देवाची स्तुति केली. आब्राहामानें ज्या नाना प्रकारच्या मोलवान भेटी त्या चाकराबरोबर पाठविल्या होत्या त्या सर्व त्यानें काढून तिकडील सांप्रदायाप्रमाणें त्या कुटुंबांतील मनुष्यांस वांटून दिल्या. नंतर तो परत जाण्याची तयारी करूं लागला. तो म्हणाला कीं, देवानें माझें काम सफळ केलें आहे, आणि मी आतां एथून लवकर आपल्या धन्याकडे जावें हें ठीक आहे. रिबकेच्या आईबापांनीं त्याचा विनाकारण खोळंबा न करितां तिची सर्व तयारी करून व तिजबरोबर एक दासी देऊन आशीर्वादासहित तिची रवानगी केली.



मला असें वाटतें कीं उं-टावर बसून निघाल्यावर रिबका वहुत वेळां मागें तोंड फिरवून आपल्या माहेराकडे पाहून रडली असेल. पण देवाकडे पाहून तिनें धैर्य धरिलें, आणि आपणास जी नवीन स्थिति प्राप्त हो-णार तिजविषयीं ती मनांत विचार करूं लागली. तोंपर्यंत तर तिनें आपल्या होणा-

त्या पतीचें तोंड पाहिलेंच नव्हतें. तें कसें असेल, त्याची राहणी कशी व तो मुलूखही कसा इत्यादि पुष्कळ गोष्टी तिच्या मनांत घोळूं लागल्या असतील यांत संशय नाहीं. त्या चाकराकडून तिला दोन गोष्टी कळून आल्या होत्या. एक ही कीं, इझाक हा ईश्वरभक्त व सदाचारी मनुष्य आहे; आणि दुसरी, तो श्रीमंत आहे. आपल्या वडिलांस ती पहिली गोष्ट फार अगत्याची वाटते असें जाणून तिलाही समजलें कीं, त्याची ती धर्मनिष्ठा आपल्यास फार हितावह होईल. धन्य तीं सुज्ञ आईबापें! त्यांनीं द्रव्याच्या आशेनें आपली कन्या दिली नाहीं, व तिनेंही दागिन्यांची वगैरे आशा धरिली नाहीं. असो.

पुढें मार्ग चालतां चालतां त्या नवीन देशाचा सुंदर देखावा पाहून रिबकेला बरेंच करमूं लागलें, इतक्यांत शेवटची मजल संपत

आली आहे, आणि संध्याकाळच्या सुमारास तें सर्व खटलें हेब्रोनाजवळ येऊन पोंचलें, तों दूर मैदानांत कोणी एक मनुष्य फिरत असून



तो ध्यानस्थ आंहे असें रिबकेच्या दृष्टीस पडलें, त्याला पाहतांच हाच कदाचित् माझा पति असेल असें तिला भासलें. मग त्या चाकरास विचारल्यावर समजलें कीं, तो तोच आहे. नंतर आपल्या लोकांच्या रीतीप्रमाणें तिनें लागलींच उंटावरून उतरून बुरखा घेऊन आपलें तोंड झांकलें. इझाक तर बरेच

दिवस रोजरोज मसपटेम्याच्या वाटेवर जाऊन यांचीच मार्गप्रतीक्षा करीत होता, म्हणून उंट व माणसें पाहतांच तो मोठ्या त्वरेनें त्यांस सामोरा गेला. आपणासाठीं आणिलेली रूपवान नवरी पाहून त्याला जो आनंद झाला असेल तो सांगतां येत नाहीं. ही माझ्यासाठीं आपले सर्व आप्त वगैरे सोडून आलेली आहे असें जाणून तिजवर त्याचें फार प्रेम जडलें. तिचाही त्याजवर पूर्ण भरंवसा होता. तेव्हां अर्थातच त्या उभयतांचीं मनें मिळालीं यांत संशय नाहीं.

इझाकाची आई मरण पावल्यापासून त्याला तिची वारंवार आठवण होऊन रडूं येत असे, पण आतां ही सद्गुणी स्त्री मिळाल्यामुळें तो देवाची उपकारस्तुति करून समाधान पावला. या सर्व हकीकतींवरून देवाची योजना कशी दिसून येते हें वाचकांच्या लक्षांत येईल. पाहा, एका दिवशीं रिबका आपली घागर घेऊन सह-

ज विहिरीवर गेली. तेथें तिनें कोणी एका वाट-सराचें योग्य प्रकारें आदर-आतिथ्य मात्र केलें. तेवढ्यावरूनच हा सुपरिणाम घडून आला! त्या वेळीं तो मनुष्य मजकडे न्याहाळून पाहात आहे किंवा मजविषयीं त्याचा असा हेतु आहे हें रिबकेच्या ध्यानींमनीं देखील नव्हतें. केवळ आईबापांनीं शिकविल्याप्रमाणें देवाला भिऊन तिनें आपलें कर्तव्य केलें. त्याबद्दल आपणास कांहीं मिळावें अशी तिला मुळींच आशा नव्हती. पण अशांचें कल्याण देव करील हें वाचणाऱ्या मुलींनीं ध्यानांत ठेवावें. असो.

रिबकेचें लग्न झाल्यावर बरींच वर्षें तिला लेंकरूं झालें नाहीं, आणि इझाकाच्या संतानाविषयीं देवानें आब्राहामास जें अभिवचन दिलें होतें तें पूर्ण होण्याचीं कांहीं लक्षणें दिसलीं नाहींत. तरी त्या वचनावर विश्वास ठेवून इझाक व रिबका हीं देवाची वाट पाहात

होतीं. त्यांनीं आपलें मागणें देवाजवळ कळवून त्याच्याच इच्छेवर ती गोष्ट सोंपिली. रिबेकेनें आपली सासू सारा हिच्या लेंकराच्या गोष्टीची हकीकत ऐकिली असावी, म्हणून तिला वाटलें असेल कीं, आपण तसला उपाय करावा हें उचित नाहीं. देव समर्थ आहे, तो यथाकाळीं आपलें कार्य घडवून आणील. पुढें त्याप्रमाणेंच झालें! त्यांच्या विश्वासाची परीक्षा पुरतेपणीं झाल्यावर देवानें त्यांस एक नाहीं, पण आवळे जावळे असे दोन पुत्र दिले. तेव्हां रिबकेला मोठा आनंद झाला. 'देवानें मजकडे पाहिलें आहे, त्याचें नाम सुवंदित असो.' असें ती गाऊं लागली असेल. तिनें वडिलाचें नांव एसाव व धाकट्याचें याकोब असें ठेविलें. एसाव याचा अर्थ तांबूस. हें नांव त्याच्या वर्णावरून ठेविलें होतें. पण तीं मुलें जसजशीं वाढत गेलीं तसतशीं तीं एक-

मेकांपासून फार भिन्न आहेत असें दिसून आलें, कारण त्यांचें रूप, वर्ण, गुण, स्वभाव हीं सर्व निरनिराळीं होतीं.



एसाव अ-मळ मोठा झाल्या-वर घरीं राहून आईचें साह्य करणें किंवा मेंढरें चारणें हें त्याला कांहीं आवडेना. त्यानें तीरकमठा घेऊन रानावनांत पारध करीत फिरावें.

आणि ती मिळाल्यावर घरीं आणून इच्छेस वाटेल त्याप्रमाणें तिचा पाक करून खावा व बापासही द्यावा. याकोब स्वभावानें गरीब होता. घरांत राहून आईबाप सांगतील तें करण्यांत त्याला विशेष आवड होती. या कारणावरून आईचा त्याजवर फार जीव असे. पण एसाव जें स्वादिष्ट अन्न बापास आणून देत असे त्यावरून त्याचें मन त्याकडे ओढलें गेलें, आणि त्याच्या दुर्गुणांकडे कानाडोळा करून याकोबापेक्षां त्याजवर तो विशेष प्रीति करूं लागला. नवऱ्याचें हें वर्तन पाहून रिबकेला चिंता उत्पन्न झाली; कारण अशानें मुलाचें हित होणार नाहीं असें तिला दिसलें. एसाव वडील असून बापाच्या वतनाचा वारीस होता, आणि मुख्यत्वेंकरून जो आशीर्वाद देवानें आब्राहामास दिला त्याचा तो वारीस व्हावयाचा होता. पण तो चैनी व स्वच्छंदी असल्या का-

रणानें त्याला तो आशीर्वाद इष्ट दिसला नाहीं.

याकोब त्या आशीर्वादाविषयीं वारंवार विचार करीत असे. त्याला असें वाटे कीं, तो जर मला मिळेल तर मी आपल्याला मोठा भाग्यवान मानीन. एके दिवशीं तो स्वयंपाक करून जेवायास बसणार इतक्यांत एसाव रानांतून थकलेला, दमलेला व भुकेला असा घरीं आला. त्या दिवशीं त्याला कांहीं पारध सांपडली नव्हती. तेव्हां तें आपल्या भावानें सिद्ध केलेलें अन्न पाहून त्याच्या तोंडास पाणी सुटलें, आणि फार उतावळा होऊन त्यांतून कांहीं मागूं लागला. याकोब त्याचा भाऊ असल्यामुळें त्यानें त्याला खुशीनें कांहीं दिलें असेल असें कोणास वाटेल; पण वतनाच्या वारशाकडे त्याचें फार लक्ष होतें, तो प्राप्त करून घेण्याची त्याला त्या प्रसंगीं एक विलक्षण युक्ति सुचली. तो एसावास म्हणाला, “तुझें

ज्येष्ठपण मला दे, म्हणजे तुला मी जेवण देतों." एसावास तें ज्येष्ठपण जर फार मोलाचें दिसलें असतें तर आपण होऊन अन्न सिद्ध करीपर्यंत त्यानें तशीच भूक सोसली असती, आणि तें हातांतून कधीं जाऊं दिलें नसतें. पण तो उतावळाच! त्याला कशाविषयींही दम धरवत नसे. कोणतीही गोष्ट एकदां मनांत आली कीं, ती लागलीच असावी असा त्याचा स्वभाव असे. त्या वेळेस तो याकोबास म्हणाला, "मी तर मरायाच्या लागास आलों आहें, मला ह्या ज्येष्ठपणाचा काय उपयोग?" असें बोलून "तो खाऊन पिऊन उठून गेला," असें त्याजविषयीं शास्त्रांत लिहिलें आहे. ज्येष्ठपण गमाविल्याची त्याला कांहीं चिंता वाटली नाहीं, आणि त्यासंबंधी आपल्यास जो आशीर्वाद मिळायाचा होता तोही आपण तुच्छ मानिला, हें त्यानें लक्षांत देखील आ-

णिलें नाहीं. ही गोष्ट त्यावेळीं रिबकेला समजली कीं नाहीं हें सांगवत नाहीं; पण पुढें तिनं जें केलें त्याजवरून तिला ती कळली असावी असें अनुमान होतें.

नंतर थोडक्या काळानें त्या देशांत दुष्काळ पडला. तेव्हां इझाक आपलें कुटुंब व गुरंढोरें यांचे मोठाले कळप घेऊन दक्षिणेकडे पलिष्टी लोकांच्या देशांत राहायास गेला, तेथील राजाचें नांव अबीमलेख होतें. आब्राहामाच्या वेळीं जो राजा तेथें राज्य करीत होता त्याचा हा पुत्र होय. आब्राहामानें अविचारीपणानें सारेला आपली बहीण असें म्हटलें होतें, त्याच पाशांत इझाकही पडला.

रिबका फार रूपवान, दक्ष व मनोहर अशी होती, म्हणून इझाकाच्या मनांत भय उत्पन्न झालें कीं, ही माझी बायको आहे असें जर एथील राजास कळेल तर तो तिला हरण

मराठी ग्रंथ संग्रहालय,
ठाणे.



करून माझाही नाश करील. या कारणा-
मुळें ती माझी बहीण आहे असें तो आव्रा-
हामाप्रमाणें सर्वांस सांगत असे, आणि तिलाही
तसेंच म्हणण्यास शिकविलें होतें. पण अशा
करण्याकडून त्याला पुढें लवकरच पस्तावा
झाला. ती सुंदर स्त्री त्या नवीन आलेल्या
गृहस्थाची बहीण आहे असें जरी राजानें ऐ-
किलें, तरी तिला लागलेंच आपणाकडे घेतलें
नाहीं एवढें फार बरें झालें.

पुढें कांहीं कारणानें राजाच्या मनांत सं-
शय आला, त्यानें इझाकास बोलावून नीट
विचारिलें कीं, जी रूपवान स्त्री तुझ्याजवळ आ-
हे ती तुझी बायको नाहीं काय? तेव्हां इझा-
कास कबूल करणें भाग पडलें. तो लज्जित
होऊन निमित्त सांगूं लागला कीं, मजपासून
तिला कोणी हरण करील आणि माझीही दु-
र्दशा होईल या कारणामुळें मला भय वाटलें.

पण राजानें त्याचा फार निषेध करून म्हटलें कीं, हें तूं फार गैर केलेंस. ती तुझी बायको नाहीं असें जाणून आम्हांतील कोणी तरी तिच्यासाठीं मोठ्या अपराधांत सांपडला असता; देवानेंच मात्र आम्हांस तसें करण्यापासून राखिलें असें मी समजतों. इझाक निरुत्तर होऊन राजासमोरून निघून गेला. राजा उदार मनाचा होता, म्हणून त्यानें त्याला देशांतून घालवून दिलें नाहीं, हा त्याचा मोठा उपकार समजावयाचा.

इझाक तेथें बरींच वर्षें राहिला असता, पण त्याच्या गुरांढोरांचे व मेंढरांचे कळप फार वाढल्यामुळें त्याच्या व राजाच्या गुराख्यामध्यें पाण्याविषयीं वारंवार कुरकुरी व तंटेही होऊं लागले, म्हणून तो खनानदेशाच्या सीमेजवळ बेरशेबा नांवाच्या गांवीं जाऊन राहिला. तेथें त्यानें एक विहीर खणून बरींच

वर्षेपर्यंत वस्ती केली असें दिसतें. त्या ठिकाणीं त्याचा स्वच्छंदी मुलगा जो एसाव त्यानें आपल्या आईबापांचें मन मोडून तेथील मूर्तिपूजक लोकांच्या दोन कन्यांशीं लग्न केलें. ही त्यांस मोठ्या दुःखाची गोष्ट झाली. या बायकांकडून बहकला जाऊन तो खोट्या देवांच्या मार्गास लागेल, आणि त्याचा अति नाशकारक परिणाम होईल अशी त्यांस मोठी चिंता प्राप्त झाली. तरी इझाकाचा त्या मुलावर फार जीव होता. पुढें जेव्हां त्याचें वय सुमारें १३५ वर्षांचें झालें तेव्हां अशक्तपणामुळें व दृष्टि मंद झाल्यामुळें त्याला वाटलें कीं आतां आपण फार दिवस जगणार नाहीं, आणि मरणापूर्वी आपल्या पुत्रास आशीर्वाद द्यावा. म्हणून त्यानें एसावास बोलावून म्हटलें, "मुला, तूं रानांत जाऊन कांहीं पारध करून आण, आणि माझ्या मनाप्रमाणें पाक

सिद्ध करून मला खायास दे म्हणजे मी तुला आशीर्वाद देईन."

असा बापाचा हुकूम होतांच एसाव निघाला. पण त्याची आई रिबका जवळच होती, तिनें तें सर्व ऐकिलें. एसावानें आपलें ज्येष्ठपण याकोबास विकिलें आहे हें तिच्या कानावर गेलें असेल, म्हणून तिला वाटलें कीं जो मोठा पहिला आशीर्वाद तो याला नाहीं तर याकोबास असावा. तिनें एवढा विचार केला नाहीं कीं याकोबास तो आशीर्वाद असावा अशी जर देवाची इच्छा आहे, तर तो त्याप्रमाणें घडून आणीलच, त्याला दुसऱ्याची मदत नको. तिचा फार अल्प विश्वास होता, आणि याकोबालाच तो आशीर्वाद मिळावा अशी तिची मोठी उत्कंठा होती; म्हणून जी युक्ति तिला सुचली ती देवाला पसंत होईल कीं नाहीं हा विचार न करितां

लागलींच याकोबाला बोलावून आपल्या मनांतील गोष्ट त्यास कळविली. तिची योजना सिद्धीस जाण्यास त्याला ज्या कांहीं अडचणी दिसल्या त्या सर्व तिनें दूर केल्या. तेव्हां तिच्या सांगण्याप्रमाणें त्यानें दोन करडें कापिलीं व एसाव जसें करीत असे त्या प्रकारें तिनें रुचिकर पाक सिद्ध केला. नंतर एसावाचीं वस्त्रें याकोबावर घातलीं, आणि तो त्यासारखा केसाळ दिसावा म्हणून त्याच्या हातांस व गळ्यास करडांचीं कातडीं गुंडाळून त्याचा भाऊ रानांतून येण्यापूर्वींच तें अन्न त्याच्या हातीं देऊन त्याला बापाकडे पाठविलें.

इतक्या लवकर अन्न तयार झालें म्हणून इझ्राकास संशय वाटून त्यानें त्याला विचारिलें, "तूं कोण आहेस?" तेव्हां आईच्या शिकवणीप्रमाणें याकोब म्हणाला, "मी तुमचा पुत्र एसाव आहें. तुमच्या सांगण्या-

प्रमाणें हें अन्न सिद्ध करून आणिलें आहे." त्याच्या वाणीवरून बापाच्या मनांत अधिकच संशय उत्पन्न होऊन, त्याला चांगलें ओळखण्याकरितां त्यानें त्याला जवळ बोलावून चांचपून पाहिलें. पण त्या कातड्यांमुळें त्याला ओळखूं आलें नाहीं. तरी त्यानें त्याला पुनः विचारिलें कीं, "तूं खचीत माझा पुत्र एसावच आहेस काय?" एवढी लबाडी करायास याकोब कसा धजला हें न कळे. पण त्यानें पुनः तेंच उत्तर दिलें कीं "होय, तोच मी आहें." तेव्हां इझाक उठून जेवला, व त्यानें आणिलेला द्राक्षारस प्याला. नंतर त्याला आशीर्वाद देण्याकरितां जवळ बोलावून त्याचें चुंबन घेतलें, आणि मग मोठ्या प्रेमळ स्वरानें म्हटलें, " पाहा, ज्या शेताला परमेश्वरानें आशीर्वाद दिला आहे त्याच्या सुवासासारिखा माझ्या पुत्राचा

वास आहे." आणखी त्यानें आपल्या बोलण्यांत असें दर्शविलें कीं, "देव तुझ्या संगतीं होऊन तुझ्या श्रमाचें फळ यथाकाळीं देईल, तूं आपल्या भावांहून वरिष्ठ होशील, आणि तुजवर शत्रूचें बळ चालणार नाहीं."



इतक्यांत एसाव रानांतून आणिलेल्या पारधीचें जेवण तयार करून तेथें घेऊन आला. पण मागें काय घडलें हें त्याला मुळींच समजलें नव्हतें. तो म्हणाला, "बाबा, तुम-

च्या आज्ञेप्रमाणें रुचिकर अन्न तयार करून आणिलें आहे. उठा, खा, आणि मला आशीर्वाद द्या." ही वाणी ऐकतांच बापाचें काळीज धड धड उडूं लागलें, आणि त्याच्यानें अगदीं बोलवेनासें झालें. तो भेदरल्यासारिखा होऊन त्याला हळूच विचारूं लागला कीं, "तूं कोण आहेस?" तो बोलला, "मी तुमचा वडील पुत्र एसाव आहें." बाप म्हणाला, "तुझ्यापूर्वीं ज्यानें मला खावयास आणिलें व मजपासून आशीर्वाद घेतला तो कोण? मीं तर त्याला आशीर्वाद दिला! आणि तो आशीर्वादित होईलच." तेव्हां एसावानें बापापुढें पालथें पडून मोठ्यानें रडून विनंती केली कीं, "बाबा, मलाही आशीर्वाद द्या." बाप अतिशयें खिन्न होऊन म्हणाला, "तूं नसतांना तुझ्या भावानें येऊन दगाबाजीनें तुझा आशीर्वाद घेतला."

हें ऐकून तो बापडा एसाव बोलला कीं, "त्याचें नांव याकोब हें ठीकच आहे कीं नाहीं? (याकोब याचा अर्थ युक्तीनें जागा हिसकून घेणारा.) त्यानें दोनदां मला फसविलें, माझें ज्येष्ठपण घेतलें, आणि आतां माझा आशीर्वाद आपलासा केला आहे. माझ्यासाठीं तुम्हीं आशीर्वाद ठेविला नाहीं काय?" बापानें उत्तर दिलें, "मीं त्याला आशीर्वाद देऊन तुझा धनी करून ठेविलें आहे. तर माझ्या पुत्रा, मी आतां तुझ्यासाठीं काय करूं!

एसाव अधिकच रडून म्हणाला, "बापा, तुम्हांपाशीं एवढाच आशीर्वाद आहे काय? मलाही आशीर्वाद द्या." तेव्हां बापानें त्याला सांगितलें कीं, "तरवारीच्या योगानें तूं जगशील व आपल्या भावाची सेवा करशील; तूं प्रबल झालास म्हणजे असें होईल कीं, तूं आपल्या मानेवरून त्याचें जूं मोडून टाकशील."

यात कांहीं म्हणण्यासारखा आशीर्वाद नाहीं, आणि आतां दुसराही मिळण्याची आशा नाहीं हें पाहून एसावानें त्या दिवसापासून याकोबाशीं वैर धरून असा निश्चय केला कीं, बाप वारल्यावर मी या फसवणुकीबद्दल त्याला जीवें मारीन. हा त्याचा निश्चय रिबकेच्या कानावर आला, तेव्हां ती फार कष्टी झाली असेल यांत संशय नाहीं. तिनें आपल्या धाकट्या मुलास बोलावून सांगितलें कीं, तुझ्या भावानें तुझा जीव घेण्याची प्रतिज्ञा केली आहे तर आतां तुझा मामा लाबान जो पादान आरामांत आहे त्याच्या एथें जाऊन भावाचा राग शमेपर्यंत त्याजवळ राहा. पण ही गोष्ट नवऱ्यानें ऐकिली तर त्याला फार दुःख होईल असें जाणून ती जेव्हां याकोबाच्या जाण्याविषयीं नवऱ्याचें मत घेऊं लागली, तेव्हां तिनें त्याला दुसरेंच का-

रण दर्शविलें. ती म्हणाली कीं, येसावानें या देशांतील कन्यांशीं लग्नसंबंध केल्यामुळें आपणांस फार त्रास झाला आहे, त्याप्रमाणें याकोबानें करूं नये म्हणून मीं त्यास त्याच्या मामाच्या गांवीं जाऊन राहण्यास सांगितलें आहे, तर आतां तुह्मी त्याला आज्ञा द्या.

बापास हें कारण योग्य दिसलें, म्हणून त्यानें याकोबास पुनः आशीर्वाद देऊन पादान आरामास जाण्याची परवानगी दिली. बिचाऱ्या रिबकेनें त्या जिवलग मुलास आपल्यापासून दूर जाऊन राहण्याकरितां वाटेस लाविलें, तेव्हां ती फार दुःखित होऊन रडली असेल. मींच आपल्यावर व आपल्या कुटुंबावर हें मोठें संकट आणिलें असेंही तिच्या मनांत आलें. देवानें आपल्या सूत्राप्रमाणें माझ्या मुलास थोडा बहुत आशीर्वाद दिला असता, लबाडी करून आपल्या बापास फस-

वर्वें हें जें मीं त्यास शिकविलें तें फार वाईट केलें. एसाव तर बहकलेलाच आहे, आणि त्याच्या रागापासून बचाव होण्याकरितां माझा प्रिय याकोब घर सोडून चालला आहे. आतां मीं काय करावें ! आतां माझ्या नवऱ्यानें व मीं शोक करीत उरलेल्या आयुष्याचे दिवस क्रमावे एवढेंच काय तें राहिलें. अशा प्रकारें तिनें खेद केला असेल, आणि त्या दोषाचा खरा पश्चात्तापही तिला घडला असेल असा संभव आहे.

मला असें वाटतें कीं, त्या आईनें आपल्या मुलास या प्रसंगीं जसा बोध केला तसा पूर्वीं कधीं केला नसेल. विशेषेंकरून त्यानें देवावर विश्वास ठेवून केवळ खरेपणानें वागावें हें त्याला फार अगत्यवादानें सांगून तिनें आपलें शेवटचें भाषण संपविलें असेल असें समजण्यास आधार आहे. कारण पुढें प्रवास करितांना याकोबानें एका रात्रीं प्रार्थना करून

देवास अनन्यभावें नवस केला त्यावरून त्याच्या स्थितींत मोठा पालट झाला असें दिसतें. हा पालट त्या आईच्या बोधावरून, व घर सोडून दूर जाण्यानें जो दुःखाचा अनुभव झाला त्याकडून घडून आला असावा.

याकोबाची रवानगी केल्यावर पुढें रिबकेविषयीं शास्त्रांत कांहीं सांगितलें नाहीं; तिची व याकोबाची पुनः भेटही झाली नाहीं असें दिसतें. ती कोणत्या ठिकाणीं व कधीं मरण पावली याचा कांहीं पत्ता लागत नाहीं. पण तिच्या ह्या वृत्तांतावरून स्त्रियांनीं बोध घ्यावा. तिच्या वर्तणुकींतील बहुत गोष्टी कित्ता घेण्यास योग्य आहेत. परंतु तिनें आपल्या पुत्रास देवाचा आशीर्वाद प्राप्त व्हावा म्हणून जी कुयुक्ति योजिली तिचें आपण अनुकरण करूं नये. धर्मकृत्य जरी असलें तरी तें सिद्धीस जाण्याकरितां अधर्म करूं नये.



## ४.

# याकोबेद आणि मिर्याम.

भरतखंडाच्या वायव्येस सुमारें दीडहजार कोसांवर मिसर ह्या नांवाचा एक देश आहे. ख्रीस्ताच्या येण्यापूर्वीं सुमारें २,००० वर्षें तेथील नील नांवाची जी प्रख्यात नदी आहे तिच्या पूर्वकिनाऱ्यावर आमराम म्हणून

कोणी एक मनुष्य कुटुंबासुद्धां राहात होता. ज्या इस्राएल लोकांस त्या काळीं मिसरांतल्या राजांनीं दासपणांत ठेविलें होतें त्यांपैकींच हा एक होय. त्याच्या बायकोचें नांव याकोबेद होतें. तिला देवानें एक कन्या व एक पुत्र अशीं दोन अपत्यें दिलीं होतीं. तिचा नवरा दासाच्या स्थितींत असल्यामुळें त्यांची फार गरिबी होती हें सांगावयास नको. त्यांस अन्नवस्त्र देखील पुरतें मिळत नसे. त्यांचें घरदार वगैरे सर्व कांहीं हलक्या प्रकारचें होतें; मिसरी लोक इस्राएल लोकांस अगदीं तुच्छ मानून त्यांजवर पराकाष्ठेचा जुलूम करीत असत. तरी त्यावरून याकोबेद व तिचा नवरा हीं नेहमीं दुःखित होतीं असें समजूं नये. त्यांचा विश्वास परमेश्वरावर असल्यामुळें त्या स्थितींत असतांही तीं संतोषवृत्तीनें राहात असत. जरी ते मिसरी मूर्तिपूजक होते तरी हे केवळ पर-

मेश्वराची भक्ति करीत व आपल्या मुलांसही तो मार्ग शिकवीत. हें त्या मुलांस सुखी होण्याचें एक मोठें साधन आहे इतकेंच नाहीं, पण भक्तिशीलता अवघ्याविषयीं उपयोगी आहे; ती इहपरलोकीं कल्याणकारक होईल असें त्या आईबापांस माहीत होतें. जगसंबंधी विद्या व कौशल्य यांत तीं आईबापें अज्ञान होतीं, परंतु परमार्थ कसा साधावा याचें त्यांस ज्ञान होतें. हें त्या मुलांस धन द्रव्य मान प्रतिष्ठा या सर्वांपेक्षां फार हिताचें होतें असें समजावें.

त्यांच्या मुलीचें नांव मिर्याम व मुलाचें अहरोन असें होतें. मिर्याम आपल्या भावाहून आठ नऊ वर्षांनीं वडील होती असें दिसतें. ती बारा वर्षांची झाल्यावर देवानें याकोबेदेस आणखी एक पुत्र दिला. हें बाळ फार रूपवान होतें. त्याला नेहमीं जवळ घेऊन खेळविणें,

गाणीं गाऊन निजविणें वगैरे यांतच मिर्यामेची फार करमणूक होत-असे. पण आईला त्या बाळावरून इतका आनंद होत नसे. तिनें त्याकडे पाहून फार चिंतातुर होऊन रडावें, आणि तिच्या नवऱ्यानेंही नेहमीं उदास असावें. त्या बाळास कोणी कधीं बाहेर फिरावयास नेत नसत, किंवा दारापाशीं देखील घेऊन बसत नसत. तर घरांत एका लहानशा खोलींत त्याला रात्रंदिवस ठेवीत. असें करण्याचें कारण हें कीं, फारो ह्मणून त्या देशांतील जुलमी राजा होता, त्यानें हे इस्राएल लोक आतां वाढत चालले आहेत, असें पाहून आणि त्यांची संख्या मोठी झाल्यावर कदाचित् ते दासपणांतून सुटायास पाहतील असें भय धरून त्यानें अशी आज्ञा केली कीं, त्या दासांमध्यें जितकें पुत्रसंतान जन्मेल तितकें नील नदीमध्यें टाकून द्यावें.

आपल्या शेजाऱ्यांपैकीं बहुतेकांचीं बालकें राजाच्या सेवकांनीं त्यांच्या आयांच्या हातून हिसकावून घेऊन नदींत नेऊन टाकिलीं असें याकोबेदेनें पाहिलें होतें, आणि माझ्या घरावरून ते जातात येतात तेव्हां ह्या घरांतही एखादें मूल असेल कीं काय अशी कल्पना करून ते डोकावून पाहत असतात, म्हणून तिनें मिर्यामेला सांगून ठेविलें होतें कीं; मुलाला कधीं खोलीच्या बाहेर आणीत जाऊं नको. कोणी म्हणेल कीं, तें बाळ कधीं रडत नसे काय? आणि त्याचें रडणें ऐकून त्याला धरायास ते शिपाई कसे आंत आले नाहींत? तर त्याचें एक कारण हें होतें कीं, त्याची आई व बहीण त्याला फार जपत असत यांत संशय नाहीं. दुसरें हें असेल कीं, याकोबेद आपणाविषयींही जपत असे, आणि देवाची प्रार्थना करून आपलें मन शांत ठेवीत असे. याशिवाय मला

वाटतें कीं, ती खाण्यापिण्यांत देखील फार नेमस्तपणा राखीत असे, तेणेंकडून त्या लेंकराच्या जीवाला सुख असल्यामुळें तें फारसें रडत नसे.

सर्व शाहण्या व विचारशील आयांस ठाऊक आहे कीं, मुलांची प्रकृति बहुतांशीं आईवर अवलंबून आहे. ह्मणून जें अन्न मुलांस सुखाचें होईल तेंच त्या खात असतात; बाकीचें सर्व वर्ज्य करितात.

हें लेंकरूं तीन महिन्यांचें झाल्यावर त्याच्या आईला दिसलें कीं, आतां याला असेंच घरांत फार दिवस लपवून ठेवितां येणार नाहीं, दुसरा कांहीं तरी उपाय केला पाहिजे, नाहीं तर ते त्याला आह्मांपासून नेतील. एका दिवशीं तिनें नदींतून कांहीं लव्हाळे आणून त्यांची एक लहानशी पेटारी विणिली, आणि तिच्या आंत पाणी येऊं नये ह्मणून बाहेरून डामर

लाविलें. शिवाय आंतली बाजू मऊ होण्याकरितां तिनें कांहीं तरी तजवीज केली असेल. मग त्या प्रिय बालकास त्या चमत्कारिक पाळण्यामध्यें निजवून व मिर्यामिस बरोबर घेऊन ती नदीकडे चालली.तेथें पोहंचल्यावर नदीच्या कांठीं जे लव्हाळे होते त्यांत ती पेटारी नेऊन ठेविली. हें तिचें करणें फार विलक्षण दिसतें, ह्मणून आपण तिजविषयीं अंमळ विचार करूं. देवावर तिचा पूर्ण विश्वास होता हें मागें सांगितलेंच आहे. तरी ती त्याची वाट पाहात उगीच बसली असें नाहीं. लेंकरूं जन्मल्या दिवसापासून तिनें रात्रंदिवस देवाची प्रार्थना करून मागितलें असेल कीं, या दुष्ट शिपायांच्या हातून ह्या बालकाचा बचाव कर. आणि तो कोणत्या रीतीनें होण्यासारिखा आहे याविषयीं तिचा विचार चाललाच असेल. शेवटीं हा उपाय तिला सुचला व तो देवाच्या प्रेरणे-

नेंच सुचला असें परिणामीं दिसून आलें. तिनें असें ह्मटलें असेल कीं, "आतां हें मूल आपल्याजवळ ठेवणें उपयोगी नाहीं, ठेविलें तर व्यर्थ मारिलें जाईल, यास्तव आपणच स्वतः त्याला तजविजीनें नदीच्या तीरीं ठेवून देवाच्या हवालीं करावें हेंच ठीक आहे." आणखी मला वाटतें कीं, तिनें केवळ भलत्याच ठिकाणीं त्याला नेऊन सोडिलें असें नाहीं. राजाची कन्या नदीवर स्नान करायास अमुक ठिकाणीं येत असते हें तिनें पाहिलें असेल, आणि तेथून तिच्या किंवा तिच्या एखाद्या दासीच्या नजरेस सहज ती पेटारी पडेल अशा बेतानें ठेविली असेल. हें तिचें धैर्य व चातुर्य किती वर्णावें !

आतां हें मनांत आणिलें पाहिजे कीं, या कामांत तिच्या नवऱ्यानें फारकरून मदत केली नसेल. कदाचित् त्यानें आपलें मत किंवा उत्तेजन वगैरे देऊन मनोभावें प्रार्थनाही केली

असेल. पण तो दास होता. त्याला घरगुती काम पाहण्यास वेळ कोठून मिळणार? पाहांटेस उठल्यापासून दिवस मावळेपर्यंत त्याला कोठें विटा पाडाव्या लागत, कोठें दगड फोडावे लागत, किंवा दुसऱ्या दासांबरोबर गाडीला जुंपला जाऊन या देशांतील कैद्यांप्रमाणें मोठमोठीं ओझीं वाहावीं लागत, आणि हें करीत असतां तेथील निष्ठुर मुकद्दमांचा पुष्कळ मारही खावा लागे. अशी त्या कंगाल दासाची दुर्दशा होत असे. म्हणून तो घरीं आल्यावर याकोबेद त्याला आपलें कांहीं दुःख न सांगतां व त्रास न देतां स्वतः आपणच कुटुंबसंबंधी कामकाज चालवीत असे असें दिसतें. मिर्याम तिचें फार साह्य करी. ती आज्ञांकित व विश्वासू होती ह्मणूनच त्या मुलास तीन महिने लपवितां आलें. कधीं कधीं बराच वेळपर्यंत तिला तें मूल जवळ

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.



घेऊन खेळवावें लागलें असेल, पण ती कंटाळत नसे. तिनें त्याला खालीं टाकून कधीं रडूं दिलें नसेल. नाहीं तर तें इतके दिवस त्यांच्याजवळ राहिलेंच नसतें. तिच्या आईचा मुलीवर पूर्ण भरंवसा होता असें दिसतें, कारण तिनें ती पेटारी लव्हाळ्यांमध्यें ठेविल्यावर तिचें कसें काय होतें तें पाहायास मिर्यामलाच अमळ दूर बसवून आपण घराकडे गेली.

मिर्याम तेथें बसून बसून कंटाळली असेल काय, किंवा तिनें त्या लव्हाळ्यांतील ठेवीकडे दुर्लक्ष्य केलें असेल काय? मला वाटतें कीं, आपली आई घरीं प्रार्थना करीत आहे असें समजून ती त्या जागेकडे केवळ एकसारखी टक लावून बसली असेल. नील नदीमध्यें सुसरी आहेत हें तिला ठाऊक होतें, ह्मणून तिनें मोठ्या आस्थेनें व हुशारीनें पाहरा केला

असेल यांत संशय नाहीं. तिकडे त्या आईच्या विश्वासयुक्त प्रार्थना वर देवाकडे चढत आहेत तों इकडे मिर्यामेच्या कानावर कोणी बायका बोलल्याप्रमाणें आवाज आला ह्मणून ती पाहूं लागली, तों राजकन्या आपल्या दासींबरोबर नदीवर स्नानास येत आहे असें तिच्या दृष्टीस पडलें. मला वाटतें कीं, अगोदरच तिच्या आईनें तिला बहुतकरून असें घडेल ह्मणून सुचविलें होतें. त्यावरून ह्या आतां येथें येऊन काय काय करितात तें पाहण्यास ती फार उत्सुक झाली.

ती राजकन्या नदीजवळ आल्यावर अमळ थांबून सभोंवतालच्या सुंदर व रमणीय देखाव्याकडे पाहूं लागली. तेव्हां समोर स्फटिकासारखें नितळ पाणी, व हिरव्या गार लव्हाळ्यांनीं आच्छादलेलीं नदीचीं दोन्ही तीरें, पलीकडे शेतें, मैदानें, कुरणें, तशींच गगन-

चुंबित पर्वतांचीं शिखरें इत्यादि अनेकविध शोभा पाहून ती मोठी खुष झाल्यासारखी दिसली. याप्रमाणें पाहतां पाहतां जवळच लव्हाळ्यांमध्यें तो विलक्षण प्रकार तिच्या दृष्टीस पडला. तेव्हां तिनें लागलींच एका दासीला तें आपणाकडे आणायास सांगितलें;



नंतर तिनें वरचें झांकण काढून पाहिलें तों आंत एक फार रूपवान बालक असून तें तिजकडे पाहून रडूं लागलें. तेव्हां ती म्हणाली कीं, हें इस्राएल लोकांतील असावें. आपल्या बापाचा हुकूम कसा आहे हें तिला माहीत होतें, आणि त्यापासून बचाव कर-

ण्यासाठीं या बाळाच्या आईनें ही युक्ति योजिली असेल असें जाणून तिला त्याची फार कींव आली. आतां याचें कसें काय करावें अशा विचारांत ती राजकन्या असतांना मिर्याम तेथें अवचित आल्याप्रमाणें दाखवून तिला विचारिते कीं, याला पाजायास इब्रीलोकांतील एखादी दाई आणूं काय? राजकन्या म्हणाली, होय, आण आण. मिर्यामेनें आपल्या आईला ही सर्व गोष्ट कळविली. ते समयीं याकोबेद फार सद्गदित होऊन देवाची स्तुति गाऊं लागली. मग मिर्यामेबरोबर त्या राजकन्येकडे जात असतां आपल्या प्रिय बाळाचें तोंड केव्हां पाहीन व त्याचा केव्हां मुका घेईन असें तिला झालें. पण तें सर्व पोटांत ठेवून एखाद्या परक्या बायकोप्रमाणें ती तेथें जाऊन उगीच उभी राहिली. तेव्हां राजकन्येनें तिला विचारिलें असेल कीं, बाई, तूं

लेंकुरवाळी आहेस तर मूल कोठें आहे? मग याकोबेदेनें उत्तर दिलें असेल कीं, मूल आतां कांहीं माझ्या जवळ नाहीं. त्यावरून तिला बापाच्या हुकुमाची आठवण होऊन पुढें कांहीं न बोलतां तिनें तिला एवढेंच सांगितलें असेल कीं, तूं ह्या मुलास आपल्या घरीं नेऊन पाजून संभाळशील तर त्याबद्दल तुला वेतन देईन. हें ऐकतांच तिनें केवळ्या आनंदानें ती गोष्ट कबूल केली असेल, आणि त्या मुलास आपणापाशीं घेऊन ती किती हर्षानें घराकडे चालती झाली असेल!

राजकन्येनें त्या बालकाचें नांव मोशे ठेविलें. त्याचा अर्थ "पाण्यांतून काढलेला" असा आहे.

समजा कीं त्या रात्रीं आमराम कामावरून घरीं आला असेल तेव्हां दारापाशीं त्या बालकासुद्धां सर्व कुटुंब बसलेलें त्याच्या दृष्टी-

स पडलें असेल, आणि त्याचे हर्षयुक्त चेहरे पाहून लागलाच त्याच्या मनांतील घोर निघून गेला असेल. पूर्वीं मुलास घेऊन असें दारामध्यें बसणें कोठचें! कधींच नाहीं. त्यावरून त्याला वाटलें कीं कांहींतरी नवल विशेष गोष्ट घडली असावी. जेव्हां त्यानें बायको व मुलगी यांच्या तोंडून तें सर्व वर्तमान ऐकिलें तेव्हां त्याच्या डोळयांत आनंदाश्रु येऊन त्यानें त्या सर्व कुटुंबासुद्धां देवाला नमन करून त्याच्या स्तवनार्थ गीत गाइलें असेल.

त्या दिवसापासून याकोबेद आपल्या प्रिय बालकाविषयीं निर्भय राहिली. जर कोणीं कधीं शिपायानें येऊन विचारिलें कीं तुझ्या घरीं लहान मूल आहेना? तर तिनें म्हणावें, "होय. राजकन्येनें संभाळण्याकरितां मजपाशीं एक मूल ठेविलें आहे; त्याबद्दल मला तिकडून रोजमुराही मिळत असतो." हें ऐकून मग ति-

ला कोणीं कधीं त्रास दिला नाहीं. याप्रमाणें ते निर्भय झाल्यावर तशा गरिबीमध्यें असतांना देखील सुखानें राहूं लागले. हें सर्व होण्यास ती भाविक, विचारशील, शाहाणी व धीर धरणारी आईच मूळ कारण होय असें दिसतें, व तिनें आपल्या मुलीस आज्ञेंत वागवून सुबोध व उत्तम शिक्षा यांकडून सन्मार्गी लाविलें होतें असें दिसून येतें; म्हणूनच तीही त्या बालकाचा निभाव होण्याच्या कामीं इतकी उपयोगीं पडली. आमरामानें अशी सद्भाविक बायको व मुलगी आपणास मिळाली म्हणून आपण फार भाग्यवान असें मानून स्तुति केली असेल यांत संशय नाहीं.

मोशे सुमारें तीन वर्षांचा होईपर्यंत आईपाशींच होता. परंतु मग त्याला राजकन्येच्या स्वाधीन करणें भाग पडलें. हें त्या आईला मोठें दुःखास कारण झालें. पण ज्याप्र-

माणें आम्हांमध्यें पाजणाऱ्या दाईस मुलाच्या घरीं जाऊन भेटण्यास परवानगी असते, त्याप्रमाणें याकोबेदला राजमहालांत जाण्यायेण्यास मुभा असावी असें वाटतें. ही बाई मोशाची आई आहे असें तेथें कोणालाही कळलें नसेल, म्हणून जेव्हां ती मोशाजवळ येऊन बोलत बसे, तेव्हां तिजविषयीं कोणी संशय धरीत नसत व तिला कधीं मनाई करीत नसत. मिर्यामही आपल्या आईबरोबर कधीं कधीं जात असेल, आणि अशा रीतीनें त्या भावाबहिणींची भेट होऊन परस्परांच्या ममतेंत अंतर पडलें नसेल. ह्या भेटीकडून मोशाला आपल्या घरचें व लोकांचें सर्व वर्त्तमान समजत असे. तो तीन वर्षांचा होईपर्यंत आपल्या आईच्या घरीं असतांना त्यानें त्या लोकांची दुर्दशा कांहीं प्रकारें आपल्या डोळ्यांनीं पाहिली होती. पण आम्ही देवाचे निवडलेले लोक आहों, व आम्हांस या

मराठी ग्रंथ संग्रहा… ठाणे.



स्थितींतून सोडवून खनान देशाकडे नेण्याविषयीं देवानें अभिवचन दिलें आहे ही गोष्ट नंतर त्याला आईकडून कळली असेल; आणखी, तिनें त्याला खऱ्या देवाची भक्ति करण्याच्या संबंधानें पुष्कळ बोधही केला असेल. त्याशीं लगटून राहिल्यानें आपलें इहपरलोकीं कल्याण होईल, पण त्याला सोडून ह्या मिसऱ्यांप्रमाणें हातांनीं केलेल्या देवांची सेवा केली तर परमेश्वराचा राग आपणावर होईल, अशा प्रकारें त्याला शिकविलें असेल. कारण कीं पुढें मोशाच्याठायीं जे गुण दिसून आले त्यांवरून हें अनुमान होतें.

राजाच्या एथें मोशाचा अभ्यास फार उत्तम प्रकारें चालला होता. त्या कालच्या सर्व विद्यांमध्यें तो निपुण झाला असें म्हटलें आहे. ज्याप्रमाणें राजपुत्रास मान प्रतिष्ठा इत्यादि सर्व कांहीं असतें त्याचप्रमाणें त्यालाही

होतें. पण तेथें खऱ्या देवाची भक्ति कोणी करीत नसत. तेवढ्यावरून त्याच्या मनास गोड वाटत नसे. या विधर्मी लोकांमध्यें राहून जगीक मान व सुख भोगावें त्यापेक्षां आपले लोक जे देवाचे खरे भक्त त्यांबरोबर गरिबी किंवा कोणतेंही अरिष्ट सोसावें हें फार बरें असें मनांत आणून तो त्याविषयीं नेहमीं विचार करीत असे. तरी चाळीस वर्षांचें वय होईपर्यंत तो तसाच राजाजवळ राहिला. पण पुढें त्याला तेथें राहवेनासें झालें. त्यानें असा निश्चय केला कीं, मी आपल्या लोकांकडे जाऊन त्यांस दासपणांतून सोडविण्याचा यत्न करीन. अशा प्रकारचा निश्चय करण्यास केवढें धैर्य पाहिजे!! यांत त्याची देवावरील केवढी निष्ठा दिसून येते!! एवढा मोठेपणा टाकून त्यानें नीच स्थिति पतकरली हें केवळ देवासाठींच केलें. पण जेव्हां तो आपल्या लोकांकडे जा-

ऊन, मी तुम्हांस मिसऱ्यांच्या जुलमापासून सोडवीन असें दर्शवूं लागला, व अनेक प्रसंगीं त्यांचा पक्ष धरून बोलूं लागला तेव्हां हा आपला खरा कैवारी आहे असें त्यास वाटेना. पुढें मोशाला असें समजलें कीं त्यांनीं मजविषयीं राजाकडे देखील कांहीं गाऱ्हाणें केलें आहे,' म्हणून तो भिऊन दूर पूर्वेकडे मिद्यान नामक देशास पळून गेला.

त्या वेळेस याकोबेद व मिर्याम यांची फार निराशा झाली असेल. त्यांस वाटलें होतें कीं, आमच्या मोशाप्रमाणें विद्वान व सर्वगुणसंपन्न असा दुसरा कोणी नाहीं, म्हणून देवानें त्यालाच आमची दासपणांतून सुटका करण्यास निवडिलें आहे. मोशालाही त्या गोष्टीवरून फार आश्चर्य वाटलें असेल यांत संशय नाहीं, त्यानें ह्याच कामासाठीं जगीक सुखाची आशा सोडून दिली होती, आणि हें

काम सिद्धीस नेण्याकरितां तो फार आवेशी झाला होता. असें असतां हा भलताच परिणाम झाला! तरी त्या सर्वांचा पूर्ण भरंवसा होता कीं, परमेश्वर योग्य काळीं आपल्या लोकांची आठवण करून कोणाकडून तरी सुटका करवील; म्हणून ते देवाची प्रार्थना करितांना व त्याच्या वचनाचें ध्यान करितांना धीर धरून त्या काळाची वाट पाहत होते.

मोशे तर मिद्यान देशांत इथ्रो नामक कोणी याजक होता त्याच्या जवळ मेंढरें चारण्याचें काम पतकरून बहुत वर्षें राहिला. तेथें असतां त्यानें त्याच्या कन्येशीं लग्न केलें, व तिजपासून त्याला दोन पुत्र झाले. तो नेहमीं सीना डोंगराजवळच्या रानांत मेंढरें चारीत फिरत असे. पूर्वीं राजवाड्यांत असतांना सर्व गोष्टींची सुखसोय होती, पण पुढें त्याला रानांत फिरणें वगैरे कसें सोसलें

असेल! तो देवाच्या इच्छेस मान्य झाला म्हणूनच त्याच्यानें तें सोसवलें. वर्षोंवर्षे धीर धरतां धरतां त्याची सहनता व इतर सद्गुण वाढत गेले, आणि शेवटीं जी मोठ्या जोखमाची सेवा परमेश्वर त्याजकडून करवून घेणार होता ती तो करण्यास लायक झाला. हें पाहून देव मोशावर फार संतुष्ट होऊन मोठ्या चमत्कारिक रीतीनें त्याला त्या सेवेविषयीं आपला मनोदय कळविता झाला. एका दिवशीं नित्याप्रमाणें मोशे त्या डोंगराजवळ आपलीं मेंढरें चारीत असतां एक झुडूप जळतांना त्याच्या दृष्टीस पडलें. पण न्याहाळून पाहिल्यावर त्याला असें दिसून आलें कीं तें त्या जाळाकडून अगदीं जळत नाहीं. त्यावरून त्याला फारच नवल वाटलें, आणि तो तेथें कांहीं वेळ उभा राहून पाहात आहे इतक्यांत त्याला देवाची वाणी ऐकू आली. त्या समयीं देवानें आपल्या

प्रिय सेवकाशीं बराच वेळ संभापण केलें. त्यांत असा हेतु दर्शविला कीं, तूं परत मिसर देशाकडे जाऊन इस्राएल लोकांस दास-पणांतून सोडवून खनान देशास न्यावें.

पूर्वी मोशे हें काम करायास फार उत्सुक झालेला होता. पण त्या चाळीस वर्षांमध्यें तो इतका नम्र झाला कीं एवढ्या मोठ्या कामगिरीस मी अगदीं लायक नाहीं, असें त्याला वाटूं लागलें. तथापि देवानें त्याच्या उत्तेजनार्थ त्याला कित्येक चमत्कार करण्याची शक्ति दिली, आणि सांगितलें कीं तुझा भाऊ आहरोन हा तुझें साह्य करील, शिवाय मीही तुझ्याबरोबर राहून तुला यशस्वी करीन. असें अभिवचन मिळाल्यामुळें मोशाला धैर्य येऊन तो देवाचा हुकूम बजावण्याकरतां मिसरदेशास जावयास निघाला.

तिकडे आहरोनालाही सूचना झाल्यावरून तो मोशास भेटण्यास सामोरा आला. उभय-

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.



तांची गांठ पडल्यावर प्रथम ते आपल्या आई-बापांच्या घराकडे गेले असतील. त्यांची आई अगोदरच मरण पावली होती असें दिसतें, कारण तिची व मोशाची पुनः भेट झाली असें सांगितलें नाहीं. पण मिर्याम जीवंत होती. आपला प्रिय भाऊ मोशे यास पाहून तिला फारच आनंद झाला, आणि तो कोणत्या कामाकरितां आला आहे हें जेव्हां तिला समजलें तेव्हां तिनें मनःपूर्वक देवाची स्तुति केली, यांत संशय नाहीं. देव जो आमच्या पूर्वजांचा बाप तो केव्हां तरी आम्हांकडे कोणी सोडविणारा पाठवील असा त्याच्या वचनावरून तिला पूर्ण भरंवसा होता. पण मोशाबद्दल जी तिनें पूर्वी आशा धरली होती ती बहुत वर्षांपासून सोडून देऊन ती देवाचीच वाट पाहात बसली. आतां त्या आशेप्रमाणेंच तिला देवाचें सूत्र दिसून आलें त्यावरून ती मोठा हर्ष करूं लागली.

त्या इस्राएल लोकांस दासपणांतून सोडविणें फार बिकट काम होतें. मिसऱ्यांचा राजा हा मोशे व आहरोन यांच्या विनंतीवरून त्या लोकांस सोडून देण्यास मान्य न होतां उलट त्यांजवर अधिक जुलूमजाच करूं लागला. देवानें मिसऱ्यांवर एकामागून एक अशीं दुःसह विघ्नें आणिलीं. तरी राजा त्यांची सुटका करीना. मिर्याम आपल्या भावांचे प्रयत्न पाहून फार काळजी करीत असेल यांत संशय नाहीं. मला वाटतें कीं, ती वारंवार त्यांस उत्तेजन देई व त्यांसाठीं प्रार्थना करी. अशा प्रकारें तिनें त्यांचें फार साह्य केलें. कारण जेथें आपल्या मनाप्रमाणें देवाची भक्ति करतां येईल असें जें आपल्या पूर्वजांचें ठिकाण म्हणजे खनानदेश, तेथें जाण्यास ती फार उत्सुक झाली होती. शेवटीं त्यांचें काम सिद्धीस गेलें तें असें- एका रात्रीं असें झालें कीं, देवाच्या सूत्रानें त्या

मिसऱ्याच्या प्रत्येक कुटुंबांतील ज्येष्ठ पुत्र मरण पावला. तेव्हां राजा फार घाबरून गेला, आणि लागलींच त्यानें मोशास बोलावून आणून या सर्व लोकांस एथून लवकर घेऊन जावें म्हणून हुकूम केला. ते तर निघण्याची वाटच पाहात होते, आणि राजा आपणांस कदाचित् असेंच एकदम निघून जायास सांगेल हें जाणून त्यांनीं अगोदरच आपली सर्व तयारी करून ठेविली होती, म्हणून हुकूम झाल्याबरोबर ते उठून चालते झाले. मिर्यामही फार आनंदभरित होऊन तशा बिकट वाटेनें त्यांच्याबरोबर जायास निघाली. याविषयीं सर्व हकीकत ह्या लहानशा निबंधांत लिहितां येणार नाहीं. ती आमच्या बहुतेक सुज्ञ वाचकांस माहीत असेलच.

इस्राएल लोक तेथून निघून गेल्यावर दोन दिवसांनीं राजाला मोठा पस्तावा झाला. आ-

पण इस्राएलांस जाऊं दिलें हें शहाणपण केलें नाहीं, ते आमच्या फार उपयोगी होते, आतां आमचें बिगारकाम कोण करील, आणि जरी कोणीं केलें तरी त्यांच्याप्रमाणें थोडक्या खर्चांत होणार नाहीं, असा मनांत विचार करून त्यानें त्यांस परत आणण्याचा निश्चय केला, आणि लागलींच आपलें सैन्य घेऊन तो त्यांच्या पाठीस लागला. मागून त्याच्या सैन्याचा खाड खाड असा मोठा आवाज ऐकतांच इस्राएल लोक फार भयभीत झाले, आणि आतां आपणांस परत नेतील म्हणून मोठ्या चिंतेंत पडले. त्या महासंकटाच्या प्रसंगीं देवानें आपल्या महापराक्रमानें त्यांच्यासमोर पसरलेल्या तांबड्या समुद्रांतून कोरडी वाट करून त्या मोठ्या समुदायास सुरक्षित पार पाडिलें !!!

राजा सैन्यासह मागून लगट करीत आला, आणि पाहतो तों ते समुद्रांतून चालले

आहेत! तेव्हां तोही आपल्या सैन्यासुद्धां त्याच वाटेनें आंत शिरला. त्याचें पायदळ, स्वार, रथ वगैरे मोठी त्वरा करून त्या विलक्षण मार्गानें चालले आहेत इतक्यांत महापुराप्रमाणें पाण्याचे लोट येऊन ते सर्व एकदम बुडून मेले. हा अद्भुत चमत्कार इस्राएलांनीं समुद्राच्या पलीकडच्या तीरावरून पाहिला. तेव्हां परमेश्वर आमचा कैवारी व उद्धारक आहे खरा, अशी त्यांची खातरी झाली; तसेंच देव आम्हांसंगतीं आहे असें मोशे व आहरोन यांच्या विशेष प्रकारें अनुभवास आलें. त्या प्रसंगीं मोशानें देवाच्या स्तुत्यर्थ एक फार उत्कृष्ट गीत रचून त्या सर्व समुदायाबरोबर मोठ्या आनंदानें गाइलें. मिर्यामेस तर त्या वेळेस जो अनुपम आनंद झाला तो सांगतां येत नाहीं. तिनें त्या गोष्टीचें कवितारूप वर्णन करून तें दुसऱ्याही बायकांस शिकविलें, आणि मग त्या

सर्वजणी आपापल्या हातीं डफ घेऊन, ताफ्यानें बाहेर निघून तें गीत गात चहूंकडे मि-



रवत फिरल्या. तें गीत आतां कवितारूपानें नाहीं, पण त्यांतील अर्थ असा दर्शविला आहे कीं, परमेश्वर थोर, सर्वांनीं त्याची स्तुति गावी, त्यानें आपल्या लोकांस उद्धरिलें आहे, त्यांच्या शत्रूंस समुद्रांत बुडवून टाकिलें आहे.

इस्राएल लोकांस मिसऱ्यांच्या हातून सु-

टल्यावरून फार आनंद झाला खरा, पण ते-थून खनानदेशास जाण्याकरितां त्यांस एका विस्तीर्ण अरण्यांतून प्रवास करावा लागला. त्या अरण्यांत त्यांस अनेक कारणांवरून बहुत वर्षें कंठावीं लागलीं. देवानें त्यांस कांहीं विशेष धर्मविधि व नियम शिकविण्याकरितां कित्येक महिनेपर्यंत एकाच ठिकाणीं राहण्याचीं आज्ञा केली. परंतु मुख्यत्वेंकरून तेथें राहण्याचें कारण हें कीं, ते देवाच्या आज्ञांचें उल्लंघन करून आपणांवर कांहीं तरी अरीष्ट आणीत, आणि तें दूर होईपर्यंत त्यांस पुढें जाण्यास आज्ञा होत नसे. त्यांनीं सुमारें एक वर्ष त्या रानांत कंठिल्यावर पुढें मिर्यामेविषयीं एक विलक्षण गोष्ट आढळते. तोंपर्यंत ती सर्वांसमोर फार उत्तम किती अशी होती.

इस्राएलांस मिसरांतून सोडवून खनान देशास न्यावयाकरितां देवानें मोशाला निवडू-

न त्यांचा पुढारी असें नेमून ठेविलें होतें हें मागें सांगितलेंच आहे. ही गोष्ट प्रथम आहरोन व मिर्याम यांस फार योग्य दिसली, आणि तिजवरून ते फार आनंद मानीत होते. पण कांहीं काळानें ते मोशाचा हेवा करूं लागले, असें दिसतें. एके दिवशीं ते त्याच्या बायकोवरून त्याला कांहीं लावून बोलले. कारण ती बाई इस्राएली नव्हती, तर ज्या मिद्यानी लोकांमध्यें मोशे इतकीं वर्षें जाऊन राहिला होता त्यांतली ती होती. पण याविषयीं मोशे कांहीं दोषी नव्हता, कारण त्याच्या लोकांतले तेथें दुसरे कोणी नव्हते, आणि त्याला दुसरा उपायच नव्हता. आतां ती बाई कसल्या गुणांची होती हें फारसें सांगितलें नाहीं. पण जें कांहीं थोडक्यांत सांगितलें आहे त्यावरून तिला इस्राएल लोकांचे धर्मविधि, नियम वगैरे त्रासदायक वाटत असत एवढें कळून येतें.

कसेंही असो, तिचे सर्व गुणदोष मोशे पोटांत ठेवून सहन करीत असे. असें असतां त्या बहीणभावांच्या बोलण्यावरून मोशे फार कष्टी झाला, तरी तो त्यांस कांहीं उलटून बोलला नाहीं. आणखी ते म्हणूं लागले कीं, "परमेश्वर केवळ मोशाकडून बोलला आहे काय? आम्हांकडूनही बोलला नाहीं काय?"

मोशे तर फार लीन स्वभावाचा होता, म्हणून त्या वेळेसही तो निरुत्तरच राहिला. पण देवानें त्या बहीणभावंडांचा निषेध करून म्हटलें कीं, "माझा सेवक मोशे फार विश्वासू आहे; तुम्ही त्याला असें बोलायास कसें भ्यालां नाहीं?" त्यानें मिर्यामेस अधिक दोषी मानिलें असें दिसतें. कारण तिला मोठी शिक्षा झाली. ती अशी कीं, तीं दोघें बहीणभावंडें मंडपासमोर उभीं राहिलीं असतां एकाएकीं मिर्यामेचे हात, पाय, तोंड, हीं सर्व अगदीं

पांढरीं फटफटीत पडलीं. त्यावरून आहरोना-ला समजलें कीं, इच्या आंगावर कोड उठला आहे! ही तिची दशा पाहून तीं दोघें फार नम्र होऊन मोशाजवळ क्षमा मागूं लागलीं. मग मोशानें तिचा कोड दूर व्हावा म्हणून देवापाशीं प्रार्थना केली, आणि देवानें ती मान्य केली. पण त्या लोकांच्या शुद्धीकरणाच्या रीतीप्रमाणें तिला सात दिवसपर्यंत छावणीच्या बाहेर ठेवायास सांगितलें.

मिर्याम ही इस्राएल लोकांत भविष्यवादीण अशी मानलेली होती, म्हणून या गोष्टीवरून बहुतांस खेद झाला असेल; पण तेव्हांपासून तसला प्रकार पुनः घडला नाहीं. मिर्यामेची वर्तणूक पहिल्याप्रमाणें निर्दोष होत चालली असें दिसतें. तथापि जो सुंदर खनान देश पाहण्यास ती उत्कंठित झाली होती तो तिनें ह्या चर्मचक्षूंनीं पाहिलाच नाहीं, विश्वासेंकरून मात्र

पाहिला. त्या अरण्यांतील कादेश नांवाचा एक प्रदेश होता, तेथून देवानें तिला वरील खनानाचें दिव्य सुख भोगायास नेलें.



# ८

# दबोरा

प्राचीनकाळीं ज्याला खनानदेश असें म्हणत असत, तो तुर्कस्थानाच्या दक्षिणभागीं भूमध्यसमुद्राच्या किनाऱ्या-वर असून त्याची पूर्वसीमा यार्देननदी, गालीलसमुद्र व मृतसमुद्र अशी होती. त्या

देशाला हल्लीं पालेस्टैन असें म्हणतात. त्याची लांबी उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत सुमारें ९० कोस आहे आणि रुंदी सरासरी वीस किंवा तीस कोसांहून ज्यास्त नाहीं. तो देश इतका सुपीक होता कीं, त्याला "दूध व मध वाहाणारा देश असें म्हणत." डोंगर, नद्या, हिरवींगार मैदानें व पिकास आलेलीं सोनेरी रंगाचीं शेतें यांकडून तो फार शोभायमान दिसे.

पूर्वकाळीं देवानें आब्राहामास अभिवचन दिलें होतें, कीं संपूर्ण खनानदेश मी तुझ्या संतानास वतन असा करून देईन. त्याप्रमाणें त्याचें संतान म्हणजे इस्राएल लोक हे मिसर देशांत चारशें वर्षें दुःख सोसल्यावर तेथें राहायास गेले. मोशे जो प्रख्यात भविष्यवादी होऊन गेला त्याजकडून व त्याच्यानंतर यहोशवाकडून देवानें त्यांस मिसरांतून सोडवून खनान देशांत आणून घातलें. त्या काळीं जे बहुत

अन्यधर्मी लोक तेथें रहात असत, त्यांशीं देवाच्या आज्ञेप्रमाणें लढाया वगैरे करून इस्राएल लोकांस त्यांना तेथून घालवून द्यावें लागलें. तथापि ते सर्वच तेथून गेले असें नाहीं, त्यांपैकीं बहुतेक तेथें तसेच राहिले, व कित्येकांनीं त्या देशाच्या सीमेपलीकडे वस्ती करून इस्राएलांत कोणी पुढारी दिसला नाहीं अशी संधि पाहून एकाएकीं त्यांजवर घाला घालून कांहीं गांवें, नगरें व कधीं कधीं सर्व देश हस्तगत करून तेथें आपला अंमल बसवावा, व अनेक प्रकारें त्यांजवर जुलूम करावा.

देवानें यहोशवाकडून इस्राएल लोकांस सांगून ठेविलें होतें कीं, जर तुम्ही माझी भक्ति सोडून अन्य देवांच्या मागें लागाल तर मी तुम्हांस शत्रूंच्या स्वाधीन करीन; ते तुम्हांस गांजितील, व तुमचा क्षय करतील, तोंपर्यंत मी तुम्हांस सोडविणार नाहीं. त्याचप्रमाणें

घडत असे. मग एखाद्या संकटांत पडल्यावर त्यांनीं आपलीं पापें पदरीं घेऊन ईश्वराजवळ आरोळी करावी, आणि नम्रतेनें क्षमा मागितल्यावर त्यानें त्यांस सोडविण्याकरितां कोणा शूर पुढाऱ्यास उठवून त्याजकडून त्यांस मुक्त करवावें. असें अनेक वेळां घडून आलें. जो पुढारी त्यांस शत्रूच्या हातून सोडवी तोच त्यांचा अधिकारी होत असे. त्या अधिकाऱ्यास न्यायाधीश असें म्हणत.

यहोशवाच्या मरणानंतर असले तीन न्यायाधीश होऊन गेल्यावर "इस्राएलाच्या वंशानें परमेश्वराच्या दृष्टींत पुनः वाईट केलें," असें सांगितलें आहे. ते आसपासच्या लोकांप्रमाणें मूर्तींची सेवा करूं लागले, म्हणून जेव्हां खनानी लोकांचा राजा याबीन यानें त्या लोकांवर स्वारी केली तेव्हां देवानें त्यास त्याच्या हातीं दिलें. त्या राजानें इस्राएलावर वीस

वर्षेंपर्यंत पराकाष्ठेचा जुलूम केला. त्याजवळ फार मोठें सैन्य असून नऊशें लोखंडी लढाऊ रथ होते, हें त्याचें सामर्थ्य पाहून इस्राएल लोकांचीं मनें फार दिलगीर झालीं. त्यांनीं आपल्या बाराही वंशांमध्यें शोध करून पाहिलें, पण त्यांस कोणी सोडविणारा सांपडला नाहीं. त्यांचा बाराक नामें जो सेनापति होता, त्याला त्या खनानी लोकांचा सेनापति जो सिसरा त्याशीं लढाई मारण्याचें धैर्य होईना. त्या वेळेस इस्राएलांत दबोरा नांवाची एक भविष्यवादीण होती. तिच्या नवऱ्याचें नांव लपिडोथ होतें. ती बाई त्या लोकांत फार प्रख्यात होती असें दिसतें. त्या संकटसमयीं सर्वांचें लक्ष तिजकडे लागलें होतें, आणि ते तिला ह्या गोष्टींविषयीं विचारीत असत व तिचें मत घेत असत. देवाच्या प्रेरणेनें ती त्यांस शहाणपणाची मसलत देई.

ही बाई केवळ एक भविष्यवादीण आहे असें समजून याबीन राजानें तिजकडे फारसें लक्ष पोंचविलें नसेल, म्हणून ती बेथेलाजवळ एका खजूरीच्या झाडाखालीं डेरा देऊन कांहीं प्रकारें लोकांची न्यायाधिशी करीत होती असें दिसतें. तिचें राहणें फार साध्या प्रकारचें असून, कोणापासूनही ती धन व मान मिळविण्याची आशा धरीत नसे. तिचा साध्वीपणा पाहून लोक तिला फार थोर मानीत, आणि ती जें कांहीं बोले, तें ईश्वराकडून आलेल्या निरोपासारिखेंच समजत. ह्या सुज्ञ बाईकडून त्या देशांत बहुत गोष्टींविषयीं सुधारणा झाली. पूर्वींचा न्यायाधीश मृत्यु पावल्यावर देशांत चहूंकडे अव्यवस्था होऊन गेली होती. कोणी अधिकारी नसल्यामुळें प्रत्येकजण मनास वाटेल त्याप्रमाणें वर्त्तत असे, जिकडे तिकडे दंगेधोपे, लुटालूट याकडून लोकांस मोठी धास्ती

पडली होती. रस्त्यानें जाण्यायेण्यास कोणाला धैर्य नसे. अशा प्रकारें अंदाधुंदी चालली असतांना दबोरा आपलें ईश्वरी वचन लोकांस कथन करूं लागली. तें त्यांनीं स्वीकारिलें, आणि त्याच्या योगानें ते हळू हळू देवाचें भय धरून मार्गावर येऊं लागले.

असा त्या बाईच्या वजनाकडून इस्राएल लोकांत बराच पालट झाला. पाहिलें असतां ही गोष्ट फार आश्चर्याची दिसते. कारण ती बाई आपलें घर सोडून गांवोगांवीं लोकांस सांगत फिरत नसे व लोकांच्या मेळ्यांत अथवा सभेंत जाऊन भाषणही करीत नव्हती; तर कांहीं डामडौल न करतां आपल्या नवऱ्याबरोबर त्या खजूरीच्या झाडाखालीं साध्या रीतीनें राहत होती. पण ती जें कांहीं करी तें सर्व देवाकडे पाहून करी. अगोदर तिनें देवाला विचारावें, आणि मग लोकांशीं बोलावें. तिला ठाऊक

होतें कीं, देवावांचून माझें ज्ञान केवळ मूर्खपण असें होईल. म्हणून ती देवाचें मत घेतल्यावांचून कांहींच करीत नसे. यावरूनच लोक तिला पूज्य मानीत असत, आणि ती जें बोले, तें खरोखर ईश्वरी वचनच आहे असें समजून ते तिच्या बोलण्यास मान्य होत.

या प्रकारें त्यांच्यामध्यें पालट होतां होतां त्यांस दिसूं लागलें कीं, इतकीं वर्षें आम्ही ज्या निर्जीव देवांची सेवा करीत आलों ते उपयोगी नाहींत. परमेश्वर साह्य असला तरच आम्ही ह्या राजाच्या हातून सुटूं. मग ते त्याचाच धावा करूं लागले. परमेश्वर तर क्षमाशील व बहुप्रसाद असा आहे. या अनुपकारी व हट्टी लोकांनीं जेव्हां नम्रतेनें त्याची विनवणी केली तेव्हां त्यांचें देखील त्यानें कान देऊन ऐकिलें, व त्यांस सोडविण्याकरितां ह्या दबोरेच्या मनास प्रेरणा केली. तिची सर्व निष्ठा देवा-

वर होती, म्हणून तिनेंही आपलें सैन्य मोठें कीं शत्रूंचें मोठें, हा विचार मनांत आणिला नाहीं; पण देव समर्थ आहे असें जाणून त्याच्या बळावर तें काम करायास कंबर बांधिली.

त्या काळीं इस्राएल लोकांचा सेनापति बाराक नामें होता, त्यास तिनें बोलावून सांगितलें, "परमेश्वराची आज्ञा झाली आहे कीं, तुम्ही उठून व आपलें सैन्य जमा करून खनानी लोकांशीं लढाई करायास सिद्ध असावें." बाराकाला तर तिच्यासारखें धैर्य नव्हतें. त्या खनान्यांचें महासैन्य मनांत आणितांच त्याला कांहीं सुचेनासें झालें. पण दबोरेचा आवेश व उमेद पाहून बाराक म्हणाला कीं, तूं मजबरोबर लढाईस येशील तर मी येईन, नाहीं तर येणार नाहीं. त्याच्या पूर्वीं कोणी स्त्री पुढारी होऊन बरोबर सैन्य घेऊन युद्धास निघाली असें आढळत नाहीं, तथापि प्रस्तुत

काळीं अशा गोष्टी घडण्यांत आल्या आहेत. युरोप खंडांत व या हिंदुस्थानांत देखील कित्येक पराक्रमी स्त्रिया युद्धांत आपलें शौर्य गाजवून प्रख्यातीस आलेल्या आहेत, हें इतिहास वाचणारांस माहीत आहेच. पण त्या काळची स्थिति निराळी होती. तरी त्या कारणामुळें दबोरा युद्धास जाण्यास अमान्य झाली नाहीं. इस्राएल लोकांस त्या परराजाच्या हातून सोडविण्याविषयीं तिला मोठी आस्था लागली होती. तिनें बाराकाला उत्तर दिलें कीं, मी तुजबरोबर येतें, पण त्या लढाईत तुझी कीर्ति होणार नाहीं; त्या राजाचा सेनापति जो सिसरा त्यास परमेश्वर स्त्रीच्याच हातीं देणार आहे.

जाण्याचें ठरल्यावर दबोरा आपली तयारी करून बाराकाबरोबर केदेश प्रांतांत जेथें सैन्य जमणार होतें तेथें गेली. तेथून त्यांनीं

दहा हजार निवडक शूर पुरुष घेऊन ताबोरा डोंगरावर जाऊन तळ दिला, आणि आतां ईश्वर काय घडवील ह्याची ते वाट पहात राहिले.

ते त्या डोंगरावर आहेत ही बातमी सिसऱ्यास समजली. तेव्हां त्यानें आपले नऊशें रथ व सर्व लढाऊ सैन्य एकवट करून त्या डोंगरास वेढा घातला. त्याला वाटलें कीं, तें दहा हजार पायदळ सहज हस्तगत होईल. त्याचा सर्व भरंवसा रथ, घोडे, व योद्धे यांवरच होता. इकडे दबोरा त्या डोंगरावरून त्याच्या सैन्याच्या फळ्या न्यहाळून पहात होती, परंतु मनामध्यें कांहीं डगली नाहीं, कारण परमेश्वरावर तिची पूर्ण आशा होती कीं, तो सुवेळीं आपल्या संकेताप्रमाणें आमच्या मदतीस येईल. त्याप्रमाणेंच घडून आलें. ती ईश्वराकडून प्रेरित होऊन मोठ्या आवेशानें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.



आपल्या सेनापतीला म्हणाली, "बाराका, ऊठ, आज प्रसन्नतेचा काळ आहे. परमेश्वरानें सिसऱ्यास आमच्या हातीं देण्याचा दिवस हाच उगविला आहे. पहा, तो तुझ्या पुढें निघाला आहे."

तेव्हां बाराक आपल्या दहा हजार सैन्यानिशीं तयार होऊन त्या डोंगरावरून खालीं उतरला आणि एकदम त्या सैन्यावर तुटून पडून सिसरा व त्याचे सर्व रथ व सैन्य यांचा तरवारीनें अगदीं मोड करून टाकिला. मग त्यांनीं पळ काढल्यावर बाराक इतक्या झपाट्यानें त्यांच्या मागें लागला कीं, त्यानें सिसऱ्याच्या सर्व सैन्याची कत्तल केली. एक देखील ठेविला नाहीं. हें सर्व झाल्यावर दबोरेनें कवितारूप गायन रचिलें. त्यावरून असें दिसतें कीं, त्या युद्धप्रसंगीं देवानें कांहीं अद्भुत कृत्यें केलीं; म्हणजे अकालीं विजा,

गडगडाट, व गारा यांची वृष्टि होऊन लोक फार घाबरून गेले. आणखी, त्या गायनांत तिनें असेंही दर्शविलें आहे कीं, किशोन नदी-ला पूर येऊन त्याच्या योगानें पुष्कळ लोक वाहून गेले. या सर्व गोष्टी ईश्वरी पराक्रमानेंच घडल्या म्हणूनच इस्राएलांचें लहानसें सैन्य एवढ्या मोठ्या सैन्यावर विजयी झालें. दबोरा तर आरंभापासून देवाचें साहाय्य मागत होती, आणि तो कोणत्या तरी असाधारण रीतीनें आम्हांस यश देईल असा पूर्ण भरंवसा ध-रून होती.

इकडे आपल्या सैन्यानें पळ काढिला, असें पाहून सिसरा रथावरून उतरून पायींपायींच पळत सुटला. परंतु ज्या वाटेनें त्याचें सैन्य गेलें तिकडे न जातां हेबेर म्हणून केनी लो-कांतील कोणी मनुष्य होता त्याच्या राहुट्यां-कडे त्यानें वाट धरली. केनी लोक हे मोशा-

च्या सासऱ्याच्या कुळांतील होते, आणि तें घराणें व याबीन राजा यांमध्यें कांहीं वैरभाव नव्हता, म्हणून तेथें आपणास आश्रय मिळेल असें सिसऱ्यास वाटलें. परंतु हेबेर त्या राजास अनुकूळ नव्हता असें दिसतें. याबीनानें इस्राएलांस कसें जांचिलें व पीडिलें हें हेबेरानें पाहिलें होतें, आणि ते अशा जुलमी राजाच्या हातांतून सुटतील तर बरें होईल असें तो आपल्या कुटुंबांत बोललाही असेल.

ज्या दिवशीं सिसरा तेथें पळून आला त्या दिवशीं हेबेराची बायको याएल ही एकटीच आपल्या डेऱ्यांत होती. मला वाटतें कीं, ती त्या लढाईविषयीं वर्तमान ऐकावयास फार उत्सुक होऊन बाहेर रस्त्यांत आली असेल, कारण सिसरा तेथें येऊन पोंचला नव्हता तोंच तिनें पुढें सामोरें येऊन त्याला आंत बोलाविलें. हा याबीन राजाचा सेनाप-

ति आहे असें समजतांच तिनें निश्चय केला असेल कीं, आतां मी याला आपल्या हातांतून जीवंत जाऊं देणार नाहीं, पण हें त्याला अगदीं समजूं दिलें नाहीं. त्याला आंत नेऊन त्याचा चांगला आदरसत्कार केला. त्यानें पाणी मागितलें तेव्हां तिनें त्याला दूध दिलें, आणि निजण्याकारितां जागाही दाखविली. त्या वेळेस तो तिला म्हणाला कीं, तूं दारीं उभी राहा, आणि जर कोणी येऊन विचारूं लागलें तर एथें कोणी नाहीं म्हणून सांग. मग तो त्या ठिकाणीं जाऊन निजला. त्याला गाढ झोंप लागलीसें पाहून त्या स्त्रीनें हातांत राहुटीची एक मेख घेतली, आणि हळूच त्याच्या जवळ जाऊन ती त्याच्या कानशिलांत इतक्या जोरानें मारली कीं पार भूमीपर्यंत रोंवून टाकिली.

नंतर बाराक सिसऱ्याच्या पाठलाग करीत

करीत तेथें आला. याएलेनें त्याला पाहून आंत बोलाविलें, आणि सांगितलें कीं, हा पहा तुझा शत्रु राहुटींत मरून पडला आहे. याप्रमाणें त्या दिवशीं देवानें इस्त्राएलांच्या हातें त्या खनान्यांच्या राजास पराजित केलें, व दबोरेच्या भविष्याप्रमाणें सिसरा स्त्रीच्या हातानेंच पडला. ह्या लढाईंचा देवाच्या साह्यानें एका स्त्रीच्या शौर्याकडून असा सुपरिणाम झाला. तरी दबोरेनें आपण स्वतः कांहीं विशेष केल्यासारखें न दाखवितां देवालाच स्तविलें. ह्या जयासंबंधी तिनें एक फार उत्कृष्ट गायन रचून तें बाराकाबरोबर गाइलें. त्यांत तिनें अलंकारिक शब्दांकडून अति उत्तम सरणीनें त्या युद्धाचें वर्णन केलें आहे, व त्या प्रसंगीं कोणकोणतीं अद्भुतें घडलीं, सिसरा कसा पडला, व तो विजयी होऊन मोठ्या समारंभानें लढाईतून आतां परत येईल म्हणून त्याची

आई व बायको ह्या कशा वाट पहात बसल्या होत्या या सर्वांचें कथन केलेलें आहे. ह्या गायनाची रचना इब्री भाषेंतील कवितेच्या नियमाप्रमाणें फार उत्तम अशी केलेली आहे; त्यांत सिसऱ्याविषयीं जें वर्णन आहे तें एथें खालीं घातलें आहे. हें त्या कवितेचें मराठींत भाषांतर असल्यामुळें कदाचित् तितकें रसभरित नसेल. तरी वाचकांस तें खरोखर मनोवेधक होईल अशी खातरी आहे. तें वर्णन येणेंप्रमाणें:—

"केनी हेबेर याची बायको याएल बायकांमध्यें आशीर्वादित असो; डेऱ्यांतल्या बायकांमध्यें ती आशीर्वादित असो. त्यानें पाणी मागितलें, तिनें दूध दिलें; श्रीमंतांच्या वाटींत दहीं आणिलें. तिनें आपला हात मेखेला, आपला उजवा हात कारागिरांच्या हातोड्याला लाविला. तेव्हां तिनें सिसऱ्याला मारिलें; त्याचें

ाठी ग्रंथ संग्रहाल
ठाणे.



डोकें हाणिलें, त्याच्या कपाळाजवळ कानसुळांत मारून तो पार केली. तो तिच्या पायांजवळ टेंकला, पडला, निजला, तिच्या पायांजवळ टेंकून पडला; जेथें टेंकला तेथेंच ठार मारलेला पडला. सिसऱ्याच्या आईनें खिडकींतून डोकावलें; जाळींतून हांक मारिली;



येण्यास त्याच्या रथाला उशीर कां लागला? त्याच्या रथाच्या चाकांस खोळंबा कां झाला? तिच्या शहाण्या सरदारिणींनीं उत्तर दिलें, स्वतां तिनें आपणाला उत्तर दिलें; त्यांनीं लूट

करून वांटून घेतली कीं नाहीं? शूरांतल्या प्रत्येकाला एक दोन मुलग्या मिळाल्या, सिसऱ्याला लुटीचीं विचित्र वस्त्रें, दोहींकडून कशिद्याचें विचित्र वस्त्र लूट धरणाऱ्यांच्या मानांसाठीं आहे. हे परमेश्वरा, तसे तुझे सर्व शत्रु नाश पावोत, आणि त्यावर प्रीति करणारे जसा सूर्य आपल्या बळानें निघतो तसे होवोत."

ह्यावरून दबोरा फार वर्णनीय कविता करणारी होती असें दिसतें. शिवाय तिच्याठायीं अद्भुत भविष्यज्ञान व श्रेष्ठ शौर्य होतें हेंही कळून येतें. तथापि ह्या सर्व ईश्वरी देणग्या आहेत असें समजून तिनें आपली फुशारकी मिरविली नाहीं. तिचा एवढाच हेतु होता कीं, आपणाकडून देवाची सेवा घडावी. घर सोडून लढाईस जाणें तिला आवडलें असें मला वाटत नाहीं. पण इस्राएल लोकांस त्या जाचांतून सोडविण्याकरितां दुसरा कोणी पुढारी नाहीं

तर आपणच देवाच्या शक्तीनें पुढें व्हावें असा तिनें विचार केला असेल. त्याप्रमाणें देवानेंही तिचे हात वळविले, आणि तिजकडून हें मोठें काम साधिलें. तिची गोष्ट सांप्रत काळच्या स्त्रियांस फार बोधकारक आहे. ती आपलें घरचें कर्तव्य सोडून देवाचें काम शोधीत फिरली नाहीं, व देवासाठीं मजकडून कांहीं वर्णायाजोगी सेवा घडेल असें अगोदर कदाचित् तिच्या मनांतही आलें नसेल. ती आपल्या घरींच असतांना सर्व प्रकारें असें स्तुत्य वर्तन करीत होती कीं, तिनें लोकांचीं मनें आपणाकडे ओढून घेतलीं असें दिसतें. यामुळें जेव्हां ती त्यांस बोध करून खऱ्या देवाकडे वळविण्यास प्रयत्न करी तेव्हां ते अर्थातच तिचें मान्य करीत, व तिची वाणी देवाच्या वाणीसारखी मानून ते लक्ष देत. आणि जेव्हां ती त्यांची पुढारीण होऊन युद्धास गेली

तेव्हां तिजवर सर्वांचा विश्वास असल्यामुळें ते आपल्या जीवाकडे न पाहतां आनंदानें तिच्या भोंवतीं जमून शत्रूशीं भिडले. जर ती आपल्या घरांतील लहानसहान कामांमध्येंही विश्वासू ठरली नसती तर तिजवर लोकांचीं मनें इतकीं जडलीं नसतीं, आणि देवानेंही तिला त्या लोकांचा कैवार घेण्यास मुळींच निवडिलें नसतें. त्या काळीं इस्राएल लोकांत किती प्रकारची दुष्टाई चालली होती याचा जेव्हां आम्ही विचार करितों, तेव्हां त्या साध्वी बाईची धर्मनिष्ठा पाहून आम्हांस मोठें आश्चर्य वाटतें. ती इतरांकडे न पाहतां केवळ देवाची भक्ति व सेवा करण्यांत अगदीं तल्लीन होत असे. त्या प्राचीनकाळच्या स्त्रियांमध्यें दबोरा ही एक प्रकाशमय ज्योति होऊन गेली. तिचा कित्ता सर्व प्रकारें वर्णनीय व अनुसरण्याजोगा आहे. परमेश्वर करो, आणि ह्या का-

ळांतही बहुत स्त्रिया विश्वासू होऊन देवाच्या सेवेस सिद्ध होवोत.

दबोरेच्या अमलांत त्या देशामध्यें चाळीस वर्षेपर्यंत स्वस्थता होती. यावरून तिनें फार सरळ व उत्तम प्रकारें राज्यकारभार चालविला असें दिसून येतें.



## ६

# रूथ

ज्या स्त्रीचें वर्णन ह्या प्रकरणांत केलेलें आहे ती इस्त्राएल लोकांतील नव्हती, तर जे मवाबी लोक मूर्तिपूजक असून कधीं कधीं इस्त्राएल लोकांस फार त्रास देत असत त्यांतील ती होती. मवाब्यांचा देश तुर्कस्था-

नाच्या दक्षिणभागीं मृतसमुद्राच्या पूर्वेस होता. रूथ जरी इस्राएलांतील नव्हती तरी तिचा नवरा इस्राएली होता. त्याविषयींची हकीकत येणेंप्रमाणें:—

दबोरा भविष्यवादीण उदयास आल्यापूर्वीं कांहीं वर्षें खनान देशांत मोठा दुष्काळ पडला. त्या वेळेस लोकांची फार दशा होऊन अन्न कोठें मिळेल याचा शोध करीत ते जिकडे तिकडे जाऊं लागले. त्यांपैकीं बेथलहेम गांवांतील अलीमलेख ह्या नांवाचा मनुष्य आपलें कुटुंब घेऊन मवाब्यांच्या देशांत पीकपाण्याची आबादानी आहे असें समजून तेथें राहायास गेला. त्याच्या बायकोचें नांव नामी असें होतें व त्याला दोन पुत्र होते. त्या देशांत त्यांनीं बरींच वर्षें वस्ती केली. ते स्वदेशीं लवकर परत का गेले नाहींत याचें कारण कदाचित हें असेल कीं, तेथें पूर्वींप्र-

माणें सुबत्ता झाली नसेल किंवा योग्य प्रकारें राजकीय बंदोबस्त वगैरे नसेल. त्यांस तेथें मवाबी लोकांपासून विशेष त्रास झाला नाहीं असें दिसतें, आणि तेही त्यांच्या खोट्या देवांच्यामागें लागले नाहींत. परमेश्वरावर जो त्यांचा विश्वास होता तो त्यांनीं दृढ राखिला. यावरून तें कुटुंब फार चांगलें व स्तुतीस योग्य असें दिसून येतें. नाहीं तर असल्या लोकांत त्यांचें कधींच शांतीनें राहणें झालें नसतें.

पुढें मुलगे मोठे होत चालल्याबर तीं आईबापें त्यांच्याकरितां सोयरिका पाहूं लागलीं. पण इस्राएल लोकांत असा नियम होता कीं, विधर्मी लोकांशीं सोईरसंबंध करूं नये. तथापि अलीमलेखानें असा विचार केला असेल कीं, आतां बहुतकरून आपलें राहणें एथेंच होईल आणि एथें तर इस्राएलांच्या मुली मिळणार नाहींत, याकरितां ह्या मवाबी लो-

कांपैकीं जे रीतीभातींनें चांगले दिसतात त्यांच्याच मुली आपल्या मुलांस कराव्या हें बरें. आणि त्यानें तसेंच केलें. ज्याप्रमाणें मिद्यानी लोकांमध्यें एखादा चांगला मनुष्य आढळत असे, त्याप्रमाणें मवाब्यांतही कित्येक चांगले असत असें दिसतें. कारण त्यांच्या मुली ज्या अलीमलेखाच्या सुना झाल्या, त्या फार सद्गुणी होत्या; व लहानपणीं त्यांचें योग्य शिक्षण झालें असावें असें त्यांच्या वर्तणुकीवरून अनुमान होतें.

मुलांचीं लग्नें झाल्यावर त्या कुटुंबांत कांहीं वर्षें फार सुखाचीं गेलीं. देश सुपीक असल्यामुळें ते बापलेक मेहनत करून कुटुंबाच्या चरितार्थापुरतें मिळवीत असत. नामी आपल्या सुनांशीं फार ममतेनें वागून घरांतील व्यवस्था मोठ्या दक्षतेनें राखीत असे. त्या सासूबाईनें सुनांस अगदीं लेकींप्रमाणें नांदवावें.

त्या मुली जरी सद्गुणी होत्या तरी त्यांचीं आई-बापें मूर्तिपूजक असल्यामुळें त्यांस खऱ्या देवाचें ज्ञान नव्हतें हें पाहून नामीनें मनांत आणिलें असेल कीं, ह्यांस आपला खरा धर्म शिकवावा हें आपलें कर्तव्य आहे. त्याप्रमाणें ती त्यांस शिकवूंही लागली. पण तें अशा रीतीनें कीं, हें आमच्या हिताकरतांच आहे अशी त्या सुनांची खातरी झाली, म्हणून जरी तिनें त्यांच्या आईबापांच्या धर्माविरुद्ध त्यांस बोध केला, तरी तिजवर जी त्यांची ममता होती तींत अंतर पडलें नाहीं. अशी ती बाई फार साळसूद व शाहाणी असे.

पण पुढें त्या सुखी घराण्यावर एकामागून एक असे दुःखाचे डोंगर कोसळूं लागले. प्रथम नामीचा नवरा अलीमलेख मरण पावला. तो त्या कुटुंबाचा बळकट खांब होता, त्याच्या वियोगानें सर्वांस मोठा धक्का बसल्यासारखा

झाला. नामी तर शोकसमुद्रांत बुडून गेली. तितक्यांत असें झालें कीं, तिचे दोन्ही पुत्र थोडक्या अवकाशाच्या अंतरानें एकामागून एक असे परलोकवासी झाले. तेव्हां त्या सासूसुनांवर दुःखाचा मोठाच गहजब गुदरला. शिवाय अलीमलेखानें जो कांहीं अर्थ संपादन केला होता तोही फडशा झाला.

अशा कठीण प्रसंगीं नामीनें आपल्या व आपल्या सुनांच्या निर्वाहाकरितां पुष्कळ उपाय योजिले. पण कांहीं चालेना. हे लोक आमच्या देशांतील किंवा धर्मांतील नाहींत असें जाणून त्या मवाब्यांनीं त्यांस कांहीं मदत केली नसेल. शेवटीं नामी निराश होऊन परत स्वदेशीं जाण्याचा विचार करूं लागली. पण तिला जाण्याची एक मोठी अडचण दिसली, कारण त्या सुनांवर तिचा फार जीव होता व त्यांचीही तिजवर मोठी ममता होती.

त्यांचे नवरे मेल्यापासून हा वेळपर्यंत त्यांनीं तिला सोडून आपल्या माहेरीं जाण्याची अगदीं इच्छा दर्शविली नाहीं. तरी नामीच्या मनांत आलें कीं, मीं जर आपल्या देशास जाण्याची गोष्ट काढली, तर ह्या मजबरोबर येण्यास कबूल होणार नाहींत व आपल्या आयांस सोडून सासूशीं जडून राहणार नाहींत. काय करावें! त्यांस टाकून एकटें कसें जावें! शेवटीं तिचे सर्व उपाय खुंटल्यावर तिनें निश्चय केला कीं, सुनांस गोडीगुलाबीनें त्यांच्या माहेरीं लावून द्यावें, व आपण आपल्या देशाची वाट धरावी.

मग एका दिवशीं तिनें त्यांस जवळ बोलावून आपला जाण्याचा बेत कळविला, व सर्व अडचणी सांगितल्या. ती म्हणाली, जेव्हां आम्ही ह्या देशांत येऊन राहिलों तेव्हां पहिल्यापहिल्यानें आम्हांस सर्व गोष्टींची ब-

रीच पंचाईत पडली. पण पुढें देवानें आमचा संसार असा वाढविला कीं, आम्हांस कशाचीही वाण नसे. तशांत तुम्ही दोघी आम्हांमध्यें आलां, आणि तुमच्या योगानें आम्हांस एक नवीन आनंदाचें कारण झालें. देवानें मला लेकी दिल्या नव्हत्या, तरी तुम्ही मजशीं लेकींपेक्षांही अधिक ममतेनें वागून मला फार सुख दिलें. पण आतां काय सांगूं! देवाचीच मजवर अवकृपा झाली. माझा नवरा गेला, माझे पुत्र जे तुमचे जीवप्राण तेही गेले, आणि काटकसर करून जी थोडी बहुत जिनगी मिळविली होती तीही रोजच्या खर्चास जाऊन उडाली. तुम्हीं माझ्याजवळ असावें अशी माझी फार इच्छा आहे. पण माझा कांहीं उपाय चालत नाहीं. तर आतां तुम्हांस एवढेंच सांगणें आहे कीं, तुम्ही माझ्या विपत्तीच्या वांटेकरणी होऊं नका, मी आतां

42

आपल्या देशीं जातें, आणि तुम्हीं आपल्या माहेरीं जावें. तुम्हीं आपल्या नवऱ्यांशीं व मजशीं प्रीतीनें वागलां त्याबद्दल परमेश्वर तुमचें कल्याण करो.

इतकें बोलून नामींनें त्यांचा मुका घेतला. ते समयीं त्या रडूं लागल्या आणि म्हणाल्या, "असें कां करता सासूबाई? आम्हीही तुम्हांबरोबर येतों. आम्हांस एथें राहून काय करायाचें आहे!" पण नामीनें त्यांस म्हटलें कीं, "माझ्या मुलींनो, तुम्ही माघारीं जा, मजबरोबर कशाला येतां? मजकडून तुमचें आतां काय बरें होणार आहे? आईबापांच्या एथें सुखानें राहा म्हणजे झालें. मला तुम्हां- मुळें फार दुःख वाटतें. पण परमेश्वराच्या इच्छेस मान्य झालें पाहिजे." हें ऐकून त्या पुनः गळा काढून मोठ्यानें रडूं लागल्या.

नंतर अर्पा नांवाची जी सून होती तीं

सासूच्या गळां पडून रडत रडत आपल्या माहेराकडे चालती झाली. पण रूथ फार कोमल अंतःकरणाची असल्यामुळें तिला त्या दुःखानें व्याकूळ झालेल्या सासूस सोडून जाववेना. तिनें मनांत असा विचार केला कीं, जेव्हांपासून मी हिच्या घरीं आलें तेव्हांपासून हिनें मला लेकीप्रमाणें वागविलें. मजकडून पुष्कळ चुका झाल्या तरी हिनें त्या सर्व पोटांत घातल्या, व माझा नवरा वारल्यापासून आईपेक्षांही अधिक कनवाळूपणें माझ्या दुःखित मनाचें फार समाधान केलें. तर आतां मी हिला अशा संकटाच्या वेळीं कशी सोडून जाऊं!

मग ती सासूशीं मोठ्या प्रेमानें या प्रकारें बोलली;—"मला सोडून माघारें जा, असा आग्रह करूं नका, कां तर जेथें तुम्ही जाल तेथें मी येईन. जेथें तुम्ही उतराल तेथें मी

उतरेन. तुमचे लोक ते माझे लोक, तुमचा देव तो माझा देव, जेथें तुम्ही मराल तेथें मी मरेन आणि पुरली जाईन. मरणावांचून कशानेंही माझा तुमचा वियोग झाला तर परमेश्वर माझें तसेंच व अधिक करो."

हे प्रेमळ शब्द त्या नामीच्या कष्टी मनाला किती गोड लागले असतील. ते खरोखर सुनेच्या अंतःकरणापासून आहेत असें तिला दिसून आलें, म्हणून ती सद्गदित होऊन कांहीं उत्तर न देतां तिला बरोबर घेऊन चालती झाली.

आपण रूथेच्या ह्या वर्तणुकीकडे अमळ लक्ष देऊन पाहिलें तर फार आश्चर्य वाटेल. तिला सासूबरोबर जाण्याकडून काय मिळणार होतें? नामीला तर स्वदेश सोडून बरींच वर्षें झालीं होतीं, आणि तिला नवऱ्याच्या वतनाची कांहीं आशा नव्हती. शिवाय तेथें पूर्वी-

चे कोणी आप्त किंवा इष्टमित्र राहिले नसतील, आणि नवऱ्याच्या वतनाच्या गांवीं घरदार नसून विनआधारी परक्याप्रमाणें मला तेथें निर्वाहासाठीं खपावें लागेल असेंही पूर्वींच तिनें आपल्या सुनांस सांगितलें होतें. त्या मुली तर आपल्या आईबापांच्या घरीं सुखी होत्या असें दिसतें. असें असतांना रूथेला सासूबरोबर जाण्याची इतकी ओढ कां असावी? यास एकच कारण दिसतें, म्हणजे तिनें आपल्या सासूला जें उत्तर दिलें, त्यांत तिनें असें म्हटलें कीं, "जे तुमचे लोक ते माझे लोक, व तुमचा देव तो माझा देव." या शब्दांवरून असें अनुमान होतें कीं, तिचा भाव मूर्तींवरून उडून परमेश्वरावर बसला होता, आणि त्याच्या लोकांत जर आपण राहिलें तर आपलें निश्चयें कल्याण होईल अशी तिची खातरी झाली होती.

तिनें रोज रोज आपल्या सासरीं ख्रिस्त्या देवाची भक्ति कशी करितात हें पहावें, आणि घरांतील लोकांची वर्त्तणूक आपल्या लोकांच्या वर्त्तणुकीहून फार निराळी आहे असेंही तिला दिसून आलें. आणखी, जेव्हां त्यांच्या सासूसासऱ्यांनीं किंवा नवऱ्यांनीं त्यांस धर्मसंबंधी गोष्टी सांगितल्या असतील तेव्हां ते आमचीं मनें न दुखवितां फार प्रीतीनें आम्हाशीं बोलतात असें जाणून त्यांनीं त्यांचा बोध ग्रहण केला असेल, आणि त्यांच्याठायीं विचार उत्पन्न झाला असावा. अर्पाही सर्व सोडून सासूबरोबर जाण्यास आरंभीं तयार होती. पण रुथेचा तर पक्का निश्चयच झाला. त्या वेळेस दोघींच्या आईबापांनीं व इतर नातलगांनीं त्यांस न जाण्याविषयीं पुष्कळ आग्रह केला असेल, हें पाहून नार्मीनें जेव्हां त्यांस म्हटलें कीं, तुम्ही आपल्या माघारीं जा, मजबरोबर

त्या दुःखांत येऊं नका; तेव्हां अर्पेचा निश्चय ढळला. तिच्या ठायीं रूथेप्रमाणें देवाविषयीं फारशी आस्था नव्हती म्हणून ती परत गेली. पण रूथेला वाटलें कीं, देवाकरितां सर्व सोडावें, मग इहलोकीं दुःख होवो कीं कांहींही होवो, पण परलोकीं कल्याण होईल.

हा तिचा विचार योग्यच होता. पण त्या वेळेस तिच्या लक्ष्यांत हें आलें नाहीं कीं, आपल्या सुनिश्चयाकडून इहलोकीं देखील मोठें सुख व मोठी प्रतिष्ठा प्राप्त होणार आहे! जरी तिला पुढें केवळ दारिद्र्य व अडचणी दिसल्या तरी तिनें त्या पतकरून आब्राहामासारखा देवावर पूर्ण विश्वास ठेविला; परंतु ही माझी हकीकत ऐकून पुढील काळांतील पिढ्या मला धन्य म्हणतील असें तिच्या स्वप्नींदेखील आलें नसेल. देवानें तिची खरी योग्यता पाहिली. त्याला आपलें कार्य सि-

डीस नेण्यास अशाच स्वनाकार करणाऱ्या स्त्रियांची गरज आहे. अंतीं तो त्यांस उंच स्थानीं बसवील यांत संशय नाहीं.

नामी आपल्या नातलगांचा व इष्टमित्रांचा निरोप घेऊन सुनेसहित खनान देशाकडे चालती झाली. त्यांचा रस्ता मवाब्यांच्या ज्या प्रदेशांतून चालला होता तो प्रदेश हिरवींगार वनें, खोरे, पर्वत, नद्या व पिकास आलेलीं शेतें यांहींकडून फार सुशोभित दिसत होता. पण हा सुंदर देखावा पाहण्यास त्यांस मध्यें कोठें थांबावयाचें नव्हतें. याप्रमाणें त्या दोघी मजल दरमजल करीत यार्देन नदी उतरून शेवटीं मोठ्या कष्टानें बेथलहेमास कशातरी येऊन पोहंचल्या.

ते दिवस सातू कापण्याचे होते, आणि चहूंकडे शेतकरी लोक आपापल्या भरपूर पिकाची कापणी करतांना आनंदानें गात आहेत,

व गरीबगुरिबें त्याच्यामागें वेचींत चाललीं आहेत असें वाटेनें त्यांच्या दृष्टीस पडलें.

पुढें त्या आल्याची बातमी गांवांत पसरल्यावर ज्या बायका नामीच्या ओळखीच्या होत्या त्या येऊन विचारूं लागल्या कीं "तु-



म्ही नामीबाई आहां काय?" तेव्हां ती म्हणाली, "मला आतां नामी म्हणूं नका, मारा असें म्हणा, कारण परमेश्वर मजशीं फार

कडूपणानें वागला आहे. मी एथून भरलेली अशी गेलें, पण देवानें मला रिकामें माघारीं आणिलें आहे, तर आतां मला नामी कशाला म्हणतां? देवानें मला ग्वालीं केलें आहे." (त्या लोकांच्या भाषेंत 'मारा' ह्या शब्दाचा अर्थ कडू असा होतो.)

अशा प्रकारें त्या बाईचें मन फार कष्टी झालेलें असतां तिनें तें सर्व दुःख मनांतल्या मनांत ठेविलें, आणि आतां आपल्या व सुनेच्या निर्वाहाकरतां कसें काय करावें म्हणून ती मोठ्या विचारांत पडली. हें पाहून रूथ म्हणाली कीं, "मला शेतांत कणसें वेंचायास जाऊं द्या. कोणी तरी मजवर दया करील." मुलगी चांगल्या स्वभावाची व फार मर्यादशील आहे असें जाणून सासूनें तिला जाण्याची परवानगी दिली.

रूथ गांवाबाहेर आली तेव्हां रस्त्यानें

कोणी सवंगणारे चालले होते त्यांस पाहून तीही त्यांच्या मागोमाग गेली व एका शेतांत शिरून तेथें वेंचूं लागली. त्या गांवांत आ-लीमलेखाच्या कुळांतील बवाज ह्या नांवाचा एक श्रीमान गृहस्थ राहत होता, त्याचेंच तें शेत होतें, पण रूथेला तें कोणाचें हें कांहींच माहीत नव्हतें. कांहीं वेळानें बवाज आपल्या शेताकडे आला, तों ही मुलगी वेंचीत आहे असें पाहून त्यानें एका चाकरास विचारिलें कीं, "ही मुलगी कोणाची?" त्यानें उत्तर दिलें, "मवाब देशाहून नामीबरोबर जी आ-ली तीच ही. कृपा करून मला थोडेंसें एथें वेंचूं द्या असें तिनें म्हटल्यावरून आम्हीं तिला वेंचायास सांगितलें."* हें ऐकून बवाजानेंही तिला म्हटलें कीं, "मुली, तूं एथेंच वेंचीत जा बरें? दुसऱ्यांच्या शेतांत जाऊं नको. समज-

* गरीबांस व परक्यांस शेतांत कापणी झाल्यावर वेंचूं द्यावें अशी मोशेच्या नेमशास्त्राची आज्ञा आहे (लेवी २३.२२.)

लैंना? एथें माझ्या चाकरणी आहेत, त्यांच्या बरोबर असत जा, ताहान लागली तर एथें पाण्याची सोय आहे, आणि तुला कोणीं बोलूं नये म्हणून मीं चाकरांस सांगून ठेविलें आहे.”

हें त्याचें ममतेचें भाषण ऐकून स्त्रियेनें मर्यादेनें त्याला नमन केलें, व मीं परकी असतांना आपण मजवर एवढी मेहेरबानी केली असें बोलून तिनें त्याचे आभार मानिले. बवाज पुनः तिला म्हणाला, “तुझा नवरा वारल्यापासून तूं आपल्या सासूशीं कशी वागलीस हें सर्व आम्हीं ऐकिलें आहे. तूं आपले आईबाप व जन्मभूमि सोडून परदेशांत व अनोळखी लोकांत राहायास आली आहेस, तर परमेश्वर तुला आशीर्वाद देवो, आणि ज्याच्या पंखांचा तूं आश्रय धरिला आहेस त्या इस्राएलांच्या देवापासून तुला फल प्राप्त होवो.”

तेव्हां रूथेनें उत्तर केलें, "महाराज आपली मजवर कृपादृष्टि असावी. मी आपल्या एखाद्या दासी सारखीही नसतां आपण केवढ्या कनवाळूपणानें मजशीं बोललां, आणि मजवर केवढी दया केली!" हें तिचें नम्रतेचें व मर्यादेचें भाषण व वर्तन पाहून बवाज आपल्या मनामध्यें फार खुप झाला. कारण दुपारच्या वेळीं त्याचीं चाकरमाणसें जेवायास बसलीं तेव्हां त्यानें तिलाही हांक मारून त्यांच्या बरोबर बसविलें, आणि घराकडे जाते वेळीं त्यांस सांगितलें कीं, ह्या मुलीला वेंचायास मागें कांहीं मुठी टाकीत जा, व तिला कोणी हरकत करूं नका.

त्या दिवशीं रूथेनें तेथें संध्याकाळपर्यंत वेंचलें, आणि तें कांडल्यावर सुमारें पांच पायली सातू निघाले. ते तिनें मोठ्या आनंदानें सासूजवळ आणून देऊन, अमुक गृहस्थ मला

त्या शेतांत भेटला व मजशीं अमुक अमुक बोलला हें सर्व तिला कळविलें. तें ऐकून नामीलाही फार हर्ष झाला. ती रूथेला म्हणाली कीं, तो मनुष्य आमच्या कुळांतला जवळचा नातलग आहे. तो तुजवर आणखी दया करील. तूं दुसऱ्यांच्या शेतांत न जातां त्याच्याच शेतांत जात जा, व त्याचें ऐकत जा. परमेश्वर त्यास आशीर्वाद देवो. सासूच्या ह्या सांगण्याप्रमाणें रूथ त्या शेतांतील सातूची व गव्हांची कापणी संपे तोंपर्यंत तेथेंच वेंचीत गेली.

बवाज फार थोर व उदार मनाचा गृहस्थ होता. त्याला अनाथ व निराश्रित लोकांचें साह्य करण्याची फार आवड असे. जेव्हां जेव्हां तो शेतांत येई तेव्हां रूथेकडे लक्ष्य देऊन तिला कांहीं देण्याविषयीं आपल्या चाकरांस सांगत असे. यामुळें तिच्या व सासूच्या निर्वाहास भरपूर मिळूं लागलें. परंतु

रूथ गरीब व निराश्रित होती एवढ्यावरून त्यानें तिचें इतकें साह्य केलें असें दिसत नाहीं, तर तिची वर्तणूक सर्व प्रकारें अगदीं निर्दोष व मर्यादेची आहे असें त्यानें वारंवार ऐकिलें व स्वतांही पाहिलें, हेंही साह्य करण्याचें एक विशेष कारण होतें.

रूथ देवाला भिऊन चालणारी होती, म्हणूनच सासूशीं, बवाजाशीं, त्या चाकरमाणसांशीं व सर्वांशीं बोलण्याचालण्यांत तिचे उत्तम गुण दिसून आले आणि ती आज्ञांकित, सौम्य, सहनशील कष्टाळू व धार्मिक अशी असल्यामुळें सर्वांस फार आवडूं लागली.

इस्राएल लोकांत असा नियम होता कीं, जर कोणी संतान नसतां मरण पावला, तर त्याचें नांव बुडूं नये म्हणून जवळच्या नातलगानें त्याच्या विधवेशीं लग्न करावें. नामी तर आपल्या सुनेविषयीं काळजी करीतच

होती. तिच्या मनांत आलें कीं, बवाज हा एक जवळचा नातलग असून चांगला नीतिमान आहे, आणि ज्यापेक्षां रूथेवर त्याची कृपादृष्टि आहे त्यापेक्षां तो तिजविषयीं आस्था वाळगून आपणाहून दुसरा कोणी जवळचा संबंधी आहे कीं काय ह्याचा शोध करील. हा विचार तिनें रूथेला कळवून म्हटलें, मी सांगेन त्याप्रमाणें तूं बवाजाकडे जाऊन सर्व हकीकत त्याच्या कानावर घाल. रूथेची खातरी होती कीं, माझी सासू माझें कल्याणच पाहील, मला कांहीं अयोग्य मसलत देणार नाहीं, म्हणून तिनेंही सासूचें सांगणें मान्य केलें.

मग नामीनें तिला बवाजाकडे जाऊन काय काय करायाचें व कसकसें बोलायाचें तें सर्व सांगितलें, आणि त्याचप्रमाणें रूथेनें केलें. तिची सर्व हकीकत ऐकून बवाज म्हणाला, "ठीक आहे, भिऊं नको, परमेश्वर तुला आ-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.



शीर्वाद देवो. जें तूं मागतेस तें अवश्यें मी करीन. कारण तूं सद्गुणी आहेस. मी जवळचा नातलग आहें खरा, परंतु मजपेक्षां दुसरा एकजण अधिक जवळचा आहे, त्यानें कबूल केलें तर बरें, नाहीं तर मी तुझें कार्य करीन." इतकें बोलून त्यानें तिला जातेवेळीं तीन पायली सातू दिले. ते घेऊन रूथ आपल्या सासूकडे आली, आणि जें कांहीं बोलणें झालें तें सर्व तिला सांगितलें. तें ऐकून नामीला फार आनंद झाला, आणि बवाज ही गोष्ट सिद्धीस नेईल असें तिला दिसून आलें व पुढें त्याचप्रमाणें घडलें. त्यानें त्या दुसऱ्या नातलगास बोलावून आणून ह्या गोष्टीविषयीं विचारपूस केली. तेव्हां तो म्हणाला, " माझ्यानें ही गोष्ट पतकरवत नाहीं."! मग बवाजानें सर्व गांवकऱ्यांस साक्षी ठेवून सर्वांसमक्ष असें म्हटलें कीं, "पाहा, या मनुष्यानें रूथेशीं लग्न करण्याचें नाका-

रिलें, म्हणून मी इजशीं लग्न करितों. कारण अलीमलेखाचा वंश बुडूं नये."

पुढें थोड्याच दिवसांनीं रूथेचें बवाजाशीं लग्न झालें आणि देवाच्या कृपेनें तिला असा अनुभव आला कीं, जे परमेश्वराचें भय वाळगून त्याचीच सेवा करणें निवडून घेतात त्यांचा जीव तो उत्तम पदार्थांनीं तृप्त करितो. दावीद जो प्रख्यात गीतकर्ता व सद्भक्त होऊन गेला त्याच्या म्हणण्याप्रमाणें रूथ व नामी यांची गोष्ट झाली, म्हणजे परमेश्वर असल्यांस "नाशांतून उद्धारितो, व त्यांजवर दयेचा व करुणेचा मुगूट घालितो."

पहा, त्या स्त्रियांच्या स्थितीमध्यें केवढें अंतर पडलें! त्यांचे कष्टाचे दिवस संपले, जिवाला सबळ आधार मिळाला, आणि गरिबीमुळें जगांत त्या हलक्या मानिलेल्या असतांना देवानें त्यांस उंच ठिकाणीं बसविलें. असा

मुदिन उगवण्यास देवाच्या सूत्रानें मुख्यत्वेंक-
रून तीं रुथच कारण झालीं. ज्या दावीद
राजाविषयीं वर लिहिलें आहे तो व तारणा-
रा प्रभु येशू ख्रीस्त हे त्यांच्याच कुळांत ज-
न्मले; ह्या कारणामुळें खरोखर त्या बाईला
धन्य म्हटलें पाहिजे.



## ७

# हान्ना

इस्राएल लोकांमध्यें मुख्य याजकपण वंशपरंपरेनें चालू असे. कधीं कधीं कोणी भविष्यवादी उदयास येऊन न्यायाधीशास व मुख्य याजकासही देवाची इच्छा कळवून लोकांस उपदेश करीत असे. ते

मराठी ग्रंथ संग्रहालय



लोक खनान देशांत येऊन राहिल्यावर सुमारें चारशें वर्षांच्या समामीस एली नांवाचा एक फार धार्मिक न्यायाधीश झाला. त्या वेळेस इस्राएल लोकांचें भजनस्थान शिलो नांवाच्या गांवीं होतें. तेथें त्यांनीं जो मंडप सीना डोंगराजवळ तयार केला होता तो उभारून त्यांत ते ईश्वरभजन करीत असत. त्या स्थळीं एली याजकपण करीत असतांना मंडपांत येणाऱ्या जाणाऱ्या लोकांकडेही लक्ष्य देई, आणि प्रसंगानुरूप त्यांचें साह्य व समाधान करी, किंवा त्यांच्या दोषांबद्दल त्यांचा निषेधही करी.

एका दिवशीं नित्याप्रमाणें तो मंडपांत बसलेला असतां कोणी एक बाई आंत येऊन फार वेळपर्यंत प्रार्थना करीत राहिली. तिचें नांव हान्ना होतें, व तिच्या नवऱ्याचें नांव एलकाना होतें; तो एफ्राईम डोंगरांतील राहणारा असून त्याला दोन बायका होत्या. हान्नाला मूलबाळ

कांहीं झालें नव्हतें. पण तिच्या सवतीला लेंकरें होतीं. त्यामुळें ती हान्नाला वारंवार हिणावून त्रास देत असे. हान्ना स्वभावानें फार गरीब होती, म्हणून ती कधीं उलटून न बोलतां मनांतल्या मनांत खिन्न होऊन रडत बसे. ती मोठी सद्गुणी असल्यामुळें तिच्या नवऱ्याचा तिजवर फार जीव होता, म्हणून तिला रडतांना पाहून तो तिचें समाधान करायासाठीं असें म्हणे कीं, "तूं कां रडतेस? खाणें पिणें सोडून इतकें दुःख करण्याचें कारण काय? मी तुला दहा पुत्रापेक्षां अधिक नाहीं काय?" त्याच्या ह्या बोलण्यावरून तिला समाधान वाटलें असेल. नाहीं तर एखाद्या अविचारी व असमंजस मनुष्याप्रमाणें जर तो तिला रागें भरता तर तिचें दुःख अधिक वाढलें असतें. पण हान्नाचें लक्ष्य विशेषेंकरून देवाकडे होतें. लेंकरें ही देवाची देणगी आहे हें तिला

टाऊक होतें. तीं जर त्यानें कृपा करून दिलीं तर उपकार मानावा, नाहीं दिलीं तर त्याच्या इच्छेस मान्य असावें, कुरकुर करून देवाला व्यर्थ दोष लावूं नये. ती जेव्हां घराहून शिलोकडे जाण्यास निघाली तेव्हां तिनें असा विचार केला असेल कीं, भजनस्थानीं देवाला आपलें गाऱ्हाणें सांगावें, आणि त्याची विनंती करावी, मग तो कदाचित् मज दासीचें ऐकेल.

याप्रमाणें देवळांत गेल्यावर तेथें ती बहुत वेळ प्रार्थना करीत राहिली. त्या प्रार्थनेंत तिनें असा नवस केला कीं, "हे सैन्यांच्या परमेश्वरा, जर तूं आपल्या दासीचें दुःख पाहशील व आपल्या दासीला पुत्रसंतान देशील तर मी त्याला त्याच्या आयुष्यभर तुझ्या सेवेस अर्पण करीन, आणि त्याच्या डोक्यावर वस्त्रा फिरूं देणार नाहीं." हें सर्व तिनें आपल्या तोंडांतल्या तोंडांत म्हटलें; लोकांसमोर बोलून

दाखविलें नाहीं. ही बाई फार वेळ एथेंच राहिली आहे, आणि हिच्या तोंडांतून कांहीं शब्द न निघतां ओंठ मात्र हालत आहेत असें पाहून एलीला वाटलें कीं, ही मद्यप्राशन करून गुंग झाली असेल; म्हणून तो तिचा निषेध करूं लागला. त्यावरून हान्नाबाई आपल्या मनांत फार कष्टी होऊन म्हणते, "तें कांहीं नाहीं महाराज, मी दारू प्यालें नाहीं. मी केवळ दुःखित मनाची बायको असून आपला मनोदय परमेश्वराजवळ कळवीत आहें."

तेव्हां एली समजला कीं, हिचें देवापाशीं कांहीं विशेष मागणें आहे आणि देवावर हिची फार निष्ठा आहे यामुळें तो तिची विनंती मान्य करील. मग तो म्हणाला, "बाई, आतां सुखरूप जा. प्रभु तुझ्या मागण्याप्रमाणें तुला देवो." असें आश्वासनदायक वचन बोलून

त्यानें तिला निरोप दिला. हान्नालाही त्याचें भाषण ऐकून परमानंद झाला, आणि 'आपल्या दासीवर आपली कृपादृष्टि असावी,' इतकें त्याशीं बोलून ती घराकडे चालती झाली. देवानें माझ्या प्रार्थना ऐकल्या आहेत असा तिनें पूर्ण विश्वास ठेविला, आणि तिच्या मनांतील दुःख व उदासीनता नाहींशी झाली.

हान्ना घरीं आल्यावर तिच्या सवतीनें तिचा टवटवीत व हर्षित चेहरा पाहून मोठें नवल केलें असेल, आणि असें म्हटलें असेल कीं, आज ही इतकी आनंदित दिसते याचें कारण काय? देवळांत जाऊन हिला काय मिळालें कोण जाणे! पण हान्नानें तिच्या बोलण्याकडे लक्ष्यच दिलें नसेल. तिच्या मनांत दुसऱ्याच गोष्टी भरल्या होत्या, तिला जी आशा लागली होती तिजवरून तिची सर्व तळमळ जाऊन ती समाधान पावली. अशी तिची संतुष्ट

वृत्ति पाहून घरच्या मनुष्यांस केवळ नव्हे, परंतु शेजाऱ्यापाजाऱ्यांसही आश्चर्य वाटलें यांत संशय नाहीं. पण तिच्या आशेला जो आधार मिळाला होता तो त्यांस काय ठाऊक? केवढी ही बाई सुज्ञ दिसते! तिनें आपल्या संकटांत देवाचा धांवा केला, आणि तो माझें साह्य करायास व दुःख निवारायास समर्थ आहे इतकेंच नव्हे पण सिद्धही आहे असा पूर्ण विश्वास ठेविला. आपल्या पूर्वजांनीं बहुत वेळां संकटाच्या प्रसंगीं देवाजवळ विनवण्या केल्या, आणि त्यानें त्यांचे मनोरथ पूर्ण केले, हें तिला माहीत होतें म्हणून तिलाही तसें करायास सुचलें. सांप्रतकालच्या स्त्रिया जर हान्नाचें अनुकरण करून आपलीं गाऱ्हाणीं देवाला कळवीत जातील तर फार बरें होईल. पण तसें न करितां कित्येक स्त्रिया आपलें दुःख निवारण्यास किंवा दुसरें

कांहीं कार्य साधण्यास अनुचितउपाय करून अनेक प्रकारें आपली हानि मात्र करून घेतात.

हान्नानें जो देवावर भरंवसा ठेविला तो व्यर्थ झाला नाहीं. यथाकाळीं तिच्या मागण्याप्रमाणें तिला पुत्ररत्न प्राप्त झालें. त्याचें नांव तिनें शमुवेल ठेविलें. ह्या नांवाचा अर्थ 'मागून घेतलेला' असा आहे. कारण, ती म्हणाली, मीं हें परमेश्वरापासून मागून घेतलें आहे. ह्या प्रिय बालकास पाहून तिला आपल्या नवसाची आठवण होत असेल, पण आपल्या नवसाप्रमाणें मुलाला त्याचे आयुष्यभर देवळांत ठेवावें लागेल, हें मनांत आणून ती कष्टी झाली असेल, असें नाहीं. जेव्हां त्यांचा वार्षिक सण आला, व तो पाळायास लोक शिलोकडे जाऊं लागले, तेव्हां तिनें नवऱ्यास म्हटलें कीं, आतांच मी तुम्हांबरोबर

येत नाहीं, पण मूल थोडें अन्न सेवन करूं लागला, म्हणजे मग मी बरोबर येऊन आपल्या नवसाप्रमाणें त्याला देवाची सेवा करायास शिकण्यासाठीं एली याजकाच्या स्वाधीन करीन. हा तिचा बेत तिच्या नवऱ्यानें पसंत केला.

पुढें हान्ना दोन तीन वर्षेंपर्यंत सण पाळायास शिलोस गेली नाहीं. त्या काळांत तिला आपल्या नवसाविषयीं विचार करायास पुष्कळ अवकाश मिळाला, आणि एलीच्या एथें कशी अव्यवस्था होती हेंही तिच्या कानावर आलेंच असेल. तो अशक्त व म्हातारा असून आपल्या पुत्रांस कह्यात ठेवण्यास असमर्थ होता. त्या मुलांची आई मरून बरेच दिवस झाले होते असें दिसतें, यामुळें तिचा बोध व शिक्षण वगैरे जें तिजकडून मिळायाचें त्याचा लाभ त्यांस झाला नाहीं म्हणून तीं मोकार

फिरून इच्छेस वाटेल त्याप्रमाणें वर्तत असत. हें सर्व हान्नाला समजलें असेल, कारण त्या गोष्टी प्रसिद्धच होत्या. 'जर मी आपल्या शमुवेलास तेथें ठेवीन तर त्या दुराचारी मुलांच्या सहवासानें तोही बिघडणार नाहीं काय? त्यापेक्षां घरींच ठेवणें बेहत्तर, आणि आम्हीं आईबापांनींच आपल्या शक्तीप्रमाणें त्याला देवावर प्रीति करायास व त्याचें भय बाळगायास शिकवावें हेंच बरें कीं नाहीं? मुलांस तर वारंवार बोध पाहिजे, शिक्षण पाहिजे. एलीच्या घरांत कोण याकडे इतकें बारीक लक्ष्य पुरवितो!' अशा प्रकारचे विचार कधीं कधीं तिच्या मनांत आले असतील. परंतु त्यांस तिनें जागा दिली नाहीं. मीं देवाला नवस केला आहे, तो मला फेडला पाहिजे, त्याला सर्व अडचणी माहीत असून त्या निवारण्यास तोच समर्थ आहे, मीं

मुलाला त्याच्या सेवेस अर्पिलें तर तो त्याला संभाळील, असा तिनें दृढ निश्चय करून देवावर भरंवसा ठेविला. यामुळें तिचें मन शांत झालें, व तिनें आपल्या नवसाप्रमाणें मुलास नेमल्या वेळीं तेथें नेऊन घालण्याची तयारी केली.


पण यावरून कोणीं असें समजूं नये कीं, ती गोष्ट सहज झाली असेल. जी लेंकरांची आई आहे तिला कांहीं प्रकारें त्या बाईचा कळवळा येईल. तरी ती साधारण आयांसारखी होती असें नाहीं. तिला बहुत वर्षेंपर्यंत लेंकरूं बाळ झालें नव्हतें, आणि हें जें एक झालें तें देवानें दिलेलें दान असें ती मानीत होती. तें जन्मल्यापासून तिला केवढी करमणूक व केवढें समाधान व किती हर्ष होत असेल हें तिचें तिलाच कळून आलें असेल. आतां ह्या सर्व सुखास मुकून मायलेंकरांची

नाडातोड करण्याची वेळ आली हें तिला मोठें दुःसह झालें खरें, तथापि देवाच्या साह्यानेंच तिला तें करतां आलें. तें साह्य तर बहुत विश्वासयुक्त प्रार्थनांचेंच फळ होतें असें समजलें पाहिजे.

हान्नानें हें सर्व दुःख पतकरिलें, आणि प्रभूनें, जी शांति तो आपल्या प्रिय भक्तांस देतो, ती तिच्या अंतःकरणांत भरली. तेणेंकरून ती जेव्हां मुलास नेऊन घालण्याकरितां आपल्या पतीबरोबर शिलोस गेली, तेव्हां ही दुःखित मनाची बायको आहे किंवा आतां ह्या मायलेकांचा वियोग होणार आहे, असें तिच्या तोंडाकडे पाहून कोणालाही वाटलें नसेल. तिचें चित्त देवाकडे इतकें लागलें होतें कीं, लोक काय करतात व काय बोलतात याची तिनें परवा केली नाहीं. शिलोस पोंचल्यावर होम, अर्पण, नवस यांकरितां जें कांहीं लागावयाचें

तें सर्व त्या मुलाच्या आईबापांनीं आणिलें होतें तें याजकाच्या स्वाधीन केलें. मग हान्ना स्वतः त्याकडे जाऊन मुलाविषयीं आपला मनोदय त्यास कळवून ह्मणाली, "जी बायको मागें एकदां फार वेळपर्यंत परमेश्वराची प्रार्थना करीत तुह्मांजवळ उभी राहिली होती ती मीच आहें. मी लेंकरासाठीं प्रार्थना केली होती, आणि ती परमेश्वरानें ऐकिली, ह्मणून त्या वेळीं मीं जो नवस केला त्याप्रमाणें त्याला आयुष्यभर परमेश्वराच्या सेवेस सादर करायास आणिलें आहे." असें बोलून तिनें व सर्वांनीं अनन्यभावें देवाचें भजन केलें.

मुलास सोडून परत जातांना हान्नाबाईनें त्याला जीव लावण्याविषयीं एलीची फार फार विनवणी केली असेल. पण विशेषेंकरून तिनें त्याला देवाच्या हवालीं करून त्याचा आशीर्वाद मागितला. शमुवेल गुणांनीं आईसा-



रखा असून स्वभावानें शांत व आज्ञांकित होता, म्हणून आई जाऊं लागली तेव्हां तिला सोडून एकटा राहण्यास तो मान्य झाला. आतां बहुत आया म्हणतील कीं, तें केवळ तीन वर्षांचें बाळ, त्याला आज्ञेंत वागणें म्हणजे काय हें काय ठाऊक असायाचें! पण ज्या बाया असें

म्हणतात त्यांस असमंजस ह्मटलें पाहिजे. मूल बोलूं चालूं लागलें ह्मणजे तेव्हांपासून त्याला आईच्या आज्ञेंत राहण्याची संवय लावितां येते. हें सर्व सुज्ञ आयांस माहीत आहे. तें वरचेवर आईच्या तोंडाकडे पहात असतें, आणि तिच्या चेहऱ्यावरून ती आपल्यावर संतुष्ट किंवा असंतुष्ट आहे हें सर्व त्याला लवकर समजूं लागतें; न ऐकल्यानें कांहींना कांहीं तरी दुःख असतेंच, ऐकिलें म्हणजे परिणाम गोड होतो असें ज-नावरांस देखील अनुभवानें समजतें. मुलांची बुद्धि तर त्यांहून फार चपळ आहे, आणि तीं लवकर शिकतात. शमुवेल शांतीनें एली-जवळ राहिला, आणि हान्ना समाधान पावून आपल्या घरीं गेली.

जेव्हां ती घरीं आली, तेव्हां घरांत को-णतीही वस्तु दृष्टीस पडली कीं तिला त्या प्रिय मुलाची आठवण व्हावी. एथें मी त्याला घेऊन

त्रमें, ह्या पाळण्यांत त्याला गाणीं गाऊन निजवीं, तेथें कोनाड्यांत त्याचे खेळ तसेच पडले आहेत, त्या खांबापासून त्यानें मजकडे येण्यास प्रथमच पाऊल टाकिलें. अशा प्रकारें तिला वरचेवर स्मरण होत असेल. ती आपल्या खोलींत जाई तेव्हां, एथें मीं त्याला पहिल्यानेंच प्रार्थना करायास शिकविलें, मग त्यानें कसें गंभीर मुद्रेनें परमेश्वराचें नाम उच्चारिलें, हेंही तिच्या मनांत येई. या सर्व गोष्टींवरून तिच्या नेत्रांस वरचेवर पाणी येतच असेल. पण जें तिनें केलें त्याचा तिला पस्तावा न वाटतां अधिकाधिक आनंद होत गेला असें दिसतें. कारण तिनें देवाची कृपा व चांगुलपण यांच्या स्तवनार्थ एक फार उत्तम प्रकारचें गीत रचिलें. त्यांत तिनें दर्शविलें आहे कीं "परमेश्वर दीनांची प्रार्थना ऐकतो; तो गरीब व नीच यांकडे देखील पाहतो, तो

भुकेल्यास तृप्त करितो, तो आपल्या भक्तांस संभाळील, परंतु दुष्टांचा मोड करील." यावरून तिच्या मनाची स्थिति फार शांत व हर्षित होती हें कळून येतें. दुसरा समाधानकारक विचार तिच्या मनांत असा आला असेल कीं आपला मूल आतां चांगल्या ठिकाणीं असून देवाची सेवा करायास शिकण्याच्या मार्गास लागला आहे. तो थोर झाल्यावर फार नामांकित होऊन आपल्या देशाच्या उपयोगीं पडेल, अशीही आशा तिनें बाळगिली असेल. ज्यांस देवाचा आशीर्वाद प्राप्त झाला आहे ते खरोखर धन्य आहेत. ते दुःखांत देखील आनंद करितात.

त्या पुरातन काळीं सांप्रत काळाप्रमाणें लोकांमध्यें फारकरून पत्रव्यवहार नव्हता. एखादे वेळेस येणाराजाणाराकडून बातमी कळली तर कळे. त्या पहिल्या वर्षांत आईला शमुवेलाचें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.



काहीं वर्तमान समजलें कीं नाहीं हें माहीत नाहीं. जर समजलें नसेल तर तिनें ते दिवस कसे कंठिले असतील हें कोणा आईला सांगायास नको. पण तिनें तें कांहीं बाह्यात्कारीं दाखविलें नाहीं. तिजविषयीं असें सांगितलें आहे कीं, दरवर्षी ती आपल्या नवऱ्याबरोबर सण पाळायास शिलोकडे जाई, आणि मोठ्या आनंदानें शमुवेलाची भेट घेऊन त्यास एक नवा आंगरखा देई. हे आंगरखे तिनें आपल्याच हातांनीं शिवलेले असावे, आणि त्यांकडून तिची बरीच करमणूक होत असावी. कारण याजकाच्या झग्यांप्रमाणें ते सुंदर नकशी काढून फार सुशोभित केलेले असत.

सणामध्यें त्या मायलेकांची भेट होऊन त्यांस एकमेकांशीं बोलायास पुष्कळ प्रसंग मिळत असत. मुलानें मन मोकळें करून वर्षाची हकीकत आईला सांगावी. रोज मला

काय काय करावें लागतें; एली मला कर्मे शिकवितो; त्याचे दुराचारी पुत्र कसे वागतात; मी अमुक वेळेस अजारी होतों; तुझी मला फार खंत वाटत असे; तूं मला जो बोध केलास त्याप्रमाणें करायास मी फार काळजी बाळगली, परंतु कधीं कधीं चुकाही केल्या; त्यांवरून एली माझा निषेध करी, आणि मी त्याची लवकरच क्षमा मागून त्याला प्रसन्न ठेवीं; अशा प्रकारें तो आपल्या आईला इत्थंभूत वर्तमान कळवीत असे. आणि आईनें तर प्रत्येक गोष्ट लक्ष लावून ऐकून घेऊन मग मोठ्या शहाणपणानें व ममतेनें त्याला धैर्य व उत्तेजन द्यावें. कधीं कधीं ती त्याच्या चुका दाखवी, कधीं त्याचें समाधान करी; शेवटीं त्याच्याबरोबर प्रार्थना करून त्याला दयावंत परमेश्वराच्या कृपेस निरवी. शास्त्रांत शमुवेलाविषयीं "तो वाढत गेला, आणि परमे-

भगाशीं व मनुष्यांशीं चांगला होता" असें जें ह्मटलें आहे त्यावरून ह्या सर्व कल्पनांस चांगला आधार मिळतो.

हान्नाची आपल्या मुलावर जी ममता होती ती त्याच्या खऱ्या कल्याणाची असून तींत स्वार्थाचा लवलेश नव्हता. मुलाला कधीं दुःख होऊं नये, किंवा त्यानें रडूं नये याकडे ती विशेष पहात नसे, तर त्यानें सदाचरणी व्हावें, व देवाची सेवा करायास शिकून तींत आपलें आयुष्य घालवावें हें तिचें मुख्य पाहणें होतें. आणि त्याप्रमाणें घडावें म्हणून ती त्याचा व आपला वियोग देखील सोसायास मान्य झाली. हा आईचा हेतु शमुवेलास दिसून आला म्हणून तोही त्याच धोरणानें चालला.

आपला मुलगा उत्तरोत्तर सद्गुणांत वाढत आहे, व त्यावर विशेष प्रकारें देवाची कृपा असून तो त्याला सर्व पापमोहांपासून रा-

खीत आहे असें जेव्हां हान्नाबाईनें पाहिलें असेल तेव्हां तिला केवढा आनंद झाला असावा! शमुवेल प्रौढ वयांत आल्यावर तो प्रख्यात भविष्यवादी व इस्राएल लोकांचा प्रामाणिक न्यायाधीश असा झाला. हें देवाच्या आशीर्वादानें व त्या धार्मिक व निस्पृही आईच्या योगानें झालें असें समजलें पाहिजे. ते दिवस पाहण्यास ती वांचली कीं नाहीं हें कांहीं सांगितलें नाहीं. जरी ती वांचली नसली तरी वरून त्या आकाशीय वस्तींतून तिनें आपल्या मुलाचें शुद्ध, निर्दोष व विश्वासू वर्त्तन पाहून देवाचें स्तवन केलें असेल यांत संशय नाहीं.

हान्नानें आपल्या एकुलत्या पुत्राला देवाच्या सेवेस अर्पिलें, तेव्हां मला आणखी एखादें लेंकरूं होईल असें तिला वाटलें नसेल. पण देवानें तिजवर केवढी कृपा केली ती पाहा! तिला आणखी तीन पुत्र व दोन कन्या अशीं

पांच अपत्यें दिलीं. त्यांची हकीकत शास्त्रांत लिहिली नाहीं. पण त्या मुलांकडून तिचें बरेंच समाधान झालें असेल हें सांगायास नको. तथापि तिची शमुवेलावरील ममता कांहीं कमी झाली नाहीं. तो तिचा पहिलाच पुत्र, व त्याच्या नांवाच्या अर्थाप्रमाणें तो देवापासून मागून घेतलेला, शिवाय देवास अर्पिलेला; या सर्व गोष्टींवरून तिला विशेष प्रिय असा होता.

शास्त्रांत जी हान्नाची हकीकत आढळते ती शमुवेलानेंच लिहिली असावी असें समजलें पाहिजे. तिजवरून त्याची आपल्या आईवर केवढी ममता होती हें दिसून येतें. त्यानें तिचें थोडक्यांत व अगदीं साध्या रीतीनें वर्णन केलें आहे खरें, पण त्यांत तिचे गुण किती उत्तम प्रकारें दर्शविले आहेत! तिची नम्रता, सहनता, सत्यता, त्याचप्रमाणें तिची सभ्यता, तिची निस्पृह प्रीति, आणि तिचा देवावरील विश्वास

यांहींकडून त्यानें तिला केवढी शोभा आणिली आहे ! मुलांनीं अशा प्रकारें आपल्या आईची स्तुति करणें याहून दुसरी कोणती स्तुति मोठी आहे! खरोखर हान्नाला उत्तम स्त्रियांच्या वर्गांत जागा दिली पाहिजे.

तिजविषयीं एक मोठी गोष्ट सांगायाची राहिली ती ही कीं, तिनें जें गीत रचिलें त्यांतील एक कडवें असें आहे, " तो आपल्या राजाला शक्ति देईल, व आपल्या अभिषिक्ताचें शृंग उंच करील." हें भविष्य निःसंशय तारणारा ख्रीस्त याविषयींच असावें. कारण त्यालाच देवाचा अभिषिक्त असें ह्मटलें आहे, आणि प्रथम हान्नानेंच त्याला हें नाम दिलें. यावरून देवाच्या प्रेरणेनें तिनें हें भविष्य सांगितलें असावें यांत संशय नाहीं. केवढें तिचें महत्त्व हें! पुरातनकाळच्या एका ज्ञानी मनुष्याचें म्हणणें खरें आहे कीं,

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे.



"जी स्त्री परमेश्वराचें भय धरिते तिची प्र-
शंसा होईल."





## ८

## अबिगईल.

शास्त्रांत त्या स्त्रीचें वर्णन फार थोडक्यांत केलें आहे. तथापि त्या संक्षिप्त लेखावरून देखील तिचे गुणस्वभाव अशा प्रकारें दिसून येतात कीं, त्या

काळांतील श्रेष्ठ प्रतीच्या स्त्रियांमध्यें तिची गणना करणें अवश्य आहे.

नाबाल ह्या नांवाचा एक मनुष्य गुरें ढोरें यांकडून मोठा संपत्तिमान होता, त्याची ती बायको होती. त्या स्त्रीपुरुषांच्या गुणलक्षणांमध्यें जमीनअस्मानचें अंतर असे. तो अतिलोभिष्ट व स्वार्थबुद्धीचा असून स्वभावानें फार तुसडा असे. त्याला गरीब, अनाथ, परके, प्रवासी यांची अगदीं कींव येत नसे, व त्यांचें तो कधीं साह्य करीत नसे. पण अबिगईल फार सौम्य, विचारी, ममताळू व सर्व गोष्टींत दक्ष अशी एक साध्वीच होती. हें पुढील वृत्तांतावरून दिसून येईल.

दावीद जो उत्कृष्ट गीतकर्ता व प्रख्यात राजा होऊन गेला, त्याचीं जीं चरित्रें शास्त्रांत वर्णिलीं आहेत त्यांत अबिगईलेची हकीकत आढळते. ती बरोबर ध्यानांत येण्याकरितां

प्रथम दावीदाच्या त्या वेळच्या स्थितीकडे अमळ लक्ष्य दिलें पाहिजे.

इस्राएलांचा पहिला राजा शौल ह्यानें देवाची आज्ञा मोडल्यावरून देवानें त्यास गादीवरून काढण्याचा निश्चय केला, आणि शमुवेल भविष्यवाद्याकडून दावीदास राज्याभिषेक करविला. हें जरी शौलास समजलें नाहीं, तरी दावीदावर देवाची कृपा आहे व आपल्यावर नाहीं असें अनेक प्रसंगीं त्याला दिसून आलें. त्यावरून त्यानें दावीदाशीं हेवा आरंभिला. त्याला असें वाटलें कीं, कोण जाणे माझ्या पुत्राच्या ठिकाणीं दावीदानें गादीवर बसावें असा देवाचा संकेत असेल तर माझ्या पुत्राचें केवढें अनहित व अपमान होईल. म्हणून तो दावीदाचा जीव घेण्याचाही विचार करूं लागला. ही गोष्ट योनाथान नामक शौलाच्या पुत्रास समजली. हा दावीदाचा परम स्नेही होता, त्यानें ती

दावीदास कळविल्यावरून तो एका दूरच्या गुहेंत जाऊन लपून राहिला, तेव्हां शौल आपल्याबरोबर कांहीं सैन्य घेऊन त्याच्या पाठीस लागला, ते समयीं दावीदाच्या मदतीकरितां त्याच्या पक्षाचे बहुत लोक त्यास जाऊन मिळाले, आणि त्याच्याही सैन्याचा बराच जमाव झाला.

पुढें शौलास त्यांचा शोध लागल्यामुळें त्यांस ती गुहा सोडून दुसरीकडे जाणें प्राप्त झालें. याप्रमाणें शौलाच्या मरणापर्यंत दावीद आपला जीव बचाविण्याकरतां रानोरान व मुलखोमुलख फिरत राहिला. जेथें कोठें त्यांचा मुकाम पडे तेथले लोक बहुधा त्यांच्या खाण्यापिण्याचा बंदोबस्त राखीत. तथापि बहुत प्रसंगीं त्यांस फार अडचणीही सोसाव्या लागल्या. एका वेळेस ते पारान नांवाच्या एका फार ओसाड रानामध्यें तळ देऊन

राहिले असतां तेथें अन्नपाण्याची कांहींच सोय नसल्यामुळें त्यांचे फार हाल होऊं लागले. त्यावरून दावीद मोठ्या फिकिरींत पडला.

याप्रमाणें दावीद आपणाशीं विचार करीत आहे इतक्यांत त्याला कोणी येऊन कळविलें कीं, नाबाल म्हणून कोणी एका श्रीमान मनुष्याच्या मेंढरांची कातरणी कार्मेल प्रांतामध्यें चालू आहे. त्या देशांतील मातबर लोकांमध्यें हे कातरणीचे दिवस मोठ्या उत्साहाचे असत, म्हणून दावीदास वाटलें कीं, नाबालाकडे जाऊन आपल्या टोळीकरितां मदत मागण्याचा हा चांगला प्रसंग आहे. मग त्यानें आपणावर आलेलें संकट व अडचण हीं कळविण्यास दहा तरुणांस निवडून नाबालाकडे पाठविलें, आणि त्याशीं अदबीनें कसें बोलावें व कसें वागावें हेंही त्यांस नीट समजून सांगितलें. तो म्हणाला, तुम्ही त्या-

शीं अशा प्रकारें बोला कीं, “आपण आपल्या लोकांमध्यें थोर मानलेले आहां असें आम्हीं ऐकिलें आहे. यास्तव आपल्या पुत्राप्रमाणें जो दावीद त्याची आपणाजवळ एक विनंती आहे. एथें आपण कातरणींचा मोटा उत्साह करीत आहां, पण तिकडे आम्ही त्या ओसाड रानामध्यें फार हलाकींत आहों. खाण्यावांचून आमचीं माणसें कासावीस झालीं आहेत. आपलें नांव ऐकून आम्हांस मोटी आशा लागली आहे. तर मेहेरबानी करून ह्या दासांची विनंती ऐका, आणि आम्हांस परत रिकामें लावूं नका. त्या रानांत आम्हांस कोठें कोठें आपलीं गुरेंढोरें आढळलीं, तेव्हां आम्हांतील कोणींही त्यांस हात न लावितां उलटें आम्हीं त्यांस लुटाऱ्यांपासून संभाळिलें हें आपल्या कानावर आलेंच असेल.”

तेव्हां जासुदांनीं येऊन मोठ्या नम्रतेनें ना-

बालाची भेट घेतली व त्यास आपल्या धन्याचा निरोप कळविला. तेव्हां नाबाल त्यांस म्हणाला कीं, "दावीद कोण? आणि तुम्ही कोण? हें मी कांहीं जाणत नाहीं. ह्या दिवसांत असे बहुत चाकर लोक आपल्या धन्यांस सोडून पळून निघतात. मीं कातरणीच्या उत्साहाकरितां तयार केलेली अन्नसामुग्री अशा अनोळखीच्यांस देऊं काय?"

हें नाबालाचें बोलणें केवळ निमित्त असें होतें. कारण दावीद कोण, व तो कशाकरितां असा रानोमाळ फिरत आहे हें त्यानें ऐकिलें असेलच. आणखी, त्याच्या टोळीनें आपल्या कळपांचें कधीं नुकसान न करितां बहुत प्रसंगीं संरक्षण केलें हेंही त्याच्या गुराख्यांकडून त्याला कळलें असावें यांत संशय नाहीं. पण त्याला असें वाटलें असेल कीं, दावीद हा कधीं राजा होणार नाहीं, आ-

मराठी ग्रंथ संग्रहालय



णि तो केव्हां तरी शौलाच्या हातीं सांपडलेच, म्हणून आपण त्याजविषयीं इतकी काळजी कशाला घ्यावी, आणि व्यर्थ खर्चांत कां पडावें? ते उपाशी मरत असले तर खुशाल मरोत.

त्या दहा जासुदांनीं दावीदाकडे येऊन त्यास सर्व वर्तमान सांगितलें. तें ऐकतांच दावीदानें एकदम आपल्या लोकांस हुकूम दिला कीं, सर्वांनीं हत्यारबंद होऊन तयार असावें. कारण नाबालावर घाला घालून आपणास ज्या ज्या वस्तूंची गरज आहे त्या त्याजपासून जबरदस्तीनें घेतल्यावांचून दुसरा उपाय नाहीं. त्याप्रमाणें चारशें हत्यारबंद लोक दावीदाबरोबर जाण्यास सिद्ध झाले. इतक्यांत नाबालाकडील एक तरणा मनुष्य अबिगईलेकडे जाऊन तिला ही सर्व हकीकत कळवून म्हणाला, "ते लोक फार चांगले आहे-

त, त्यांनीं आम्हांस किंवा आमच्या कळपांस कांहींच उपद्रव दिला नाहीं, पण उलटें आम्हांस साह्य केलें. असें असतां त्यांनीं फार नम्रपणें आमच्या धन्यापाशीं कांहीं मदत मागितली, तेव्हां त्यांस असलें उत्तर मिळालें! त्यावरून आम्हांस मोठी चिंता प्राप्त झाली आहे. जर तें सैन्य आपल्या लोकांवर चालून आलें तर सर्वांचा संहार केल्यावांचून राहणार नाहीं. आमचा धनी तर किती दुराग्रही व हेंकड स्वभावाचा आहे हें आपणास माहितच आहे. त्याच्या पुढें कोणीं बोलावें! या वेळीं आपण कांहीं उपाय कराल तरच हा अनर्थ टळेल."

हें त्या मनुष्याचें भाषण अबिगईलेच्या अंतःकरणास केवळ बाणाप्रमाणें टोंचलें. कारण नाबाल तशाच प्रकारचा मनुष्य होता, आणि तिच्याशींही त्याची तशीच वागणूक असे. म्हणून अबिगईलेच्यानें त्या मनुष्यापुढें

कांहीं एक बोलवेना. तीं मनांत म्हणाली कीं, हा जें बोलतो तें सर्व खरें आहे; माझ्या नवऱ्याचा स्वभावच तसा आहे यांत संशय नाहीं.

अबिगईल फार विचारशील व सुज्ञ बायको होती. ती त्या प्रसंगीं नवऱ्याविरुद्ध उगीच बोलत न बसतां व वेळ व्यर्थ न घालवितां, नवऱ्यास व त्याच्या बरोबरच्या सर्व मनुष्यांस ह्या संकटापासून सोडविण्याचा निश्चय करून तो सिद्धीस नेण्याचा उपायही तिनें योजिला, तो असा:—तिनें दोनशें भाकरी, द्राक्षरसाचे दोन बुधले, पांच तयार केलेलीं मेंढरें, पांच पायली हुरडा, द्राक्षांचे शंभर घड आणि अंजिरांच्या दोनशें खापा असें गाढवांवर लादून चाकरांस सांगितलें कीं, 'हें त्या रानांत दाविदाकडे घेऊन चला.' आणि आपणही दुसऱ्या एका गाढवावर बसून त्यांच्या मागें निघाली.

तिकडून दावीदही आपल्या हत्यारबंद सैन्यानिशीं नाबालावर घाला घालण्यास निघाला होता. मार्गांत त्यांची व ह्यांची गांठ पडली. तेव्हां ही स्त्री जी गाढवावर बसून येत आहे ती नाबालाची बायको आहे असें कोणीं दाविदास कळविल्यावरून त्यानें तिला म्हटलें कीं, "आम्ही नाबालावर स्वारी करण्यास निघालों आहों. आम्हीं त्याचें केवळ वरें करीत असतांना, व त्याचे कळप शत्रूंपासून राखिले असतांना त्याबद्दल त्यानें आमचें कांहीं साह्य केलें नाहीं व आमच्या मनुष्यांस रिकामें परत लाविलें. यास्तव उद्यांपर्यंत त्याचा एकही मनुष्य जीवंत ठेऊं नये असा आम्हीं निश्चय केला आहे." हें ऐकून अबिगईल आपल्या गाढवावरून खालीं उतरून त्याच्या पायां पडून म्हणाली, "महाराज, तो सर्व माझा अन्याय समजावा;

मी आपल्या जामुद्यांस पाहिलें मुद्दां नाहीं, आतां क्षमा करा; जें झालें तें झालें."

याप्रमाणें तिनें फार नम्रतेनें आपल्या नवऱ्याचा अपराध पदरांत घेऊन क्षमा मागितली, आणि आतां कोणाचेंही रक्त पाडूं नये अशी विनंती केली. मग तिनें बरोबर जी भेट नेली होती तिचा स्वीकार करण्याविषयीं फार आग्रह करून त्यास ह्मटलें कीं, "परमेश्वरानें सांगितल्याप्रमाणें महाराजांचें घराणें स्थिर राहील, कारण आपल्याठायीं वाईट ह्मणून कांहीं सांपडलें नाहीं. जरी शत्रु आपल्या पाठीस लागले आहेत, तरी परमेश्वर आपलें संरक्षण करील, आणि शेवटीं शत्रूंचा क्षय होऊन आपणालाच अधिकार मिळेल, तेव्हां विनाकारण आपण रक्त पाडून सूड घेतला नाहीं ह्मणून महाराजांस आनंद वाटेल. परमेश्वर महाराजांस वैभव देईल, तेव्हां कृपा

करून ह्या दासीची आठवण व्हावी."

हें अबिगइलेचें सूज्ञपणाचें भाषण ऐकून दाविदाचा राग शांत झाला, आणि त्यानें तिला आशीर्वाद देऊन देवाची स्तुति केली. तो ह्मणाला, "खचीत आज तुझ्याच बोधानें मला रक्त पाडण्यापासून राखिलें आहे. तुला परमेश्वरानेंच मजकडे पाठवून तुझी व माझी भेट होऊं दिली." नंतर तिनें आणलेली भेट त्यानें मोठ्या आनंदानें स्वीकारून ह्मटलें कीं, "आतां शांतीनें आपल्या घरीं जा, मीं तुझें सर्व बोलणें मान्य केलें आहे." याप्रमाणें त्या शाहण्या स्त्रीकडून तो मोठा अनर्थ टळला.

जेव्हां अबिगइलेनें दाविदाच्या सैन्यास परत जातांना पाहिलें, तेव्हां देवानें तिच्या प्रयत्नास यश दिल्याबद्दल तिनें त्याची अत्यंत स्तुति केली असेल यांत संशय नाहीं. तो प्रसंग तिला केवढा भयंकर होता हें मनांत आणिलें

असतां, तिच्या धैर्याविषयीं आह्मांस आश्चर्य वाटतें इतकेंच नव्हे, पण ती मोटी गुणसंपन्न व धोरणी बायको होती असें दिसून येतें. तिनें पूर्वीं दाविदाविषयीं ऐकिलें होतें असें दिसतें. त्याच्यासमोर त्याचे शत्रु टिकणार नाहींत, व देव त्यालाच यश देऊन पुढें राज्यपदावर बसवी-ल, असें जाणून तिनें लागलींच त्याकडे जाऊन समेट केला. जेव्हां ती आपली भेट घेऊन दावि-दासमोर उभी राहिली, तेव्हां तो व त्याचें सैन्य फार संतापलेलें व आपल्या नवऱ्याचा व सर्व घ-राण्याचा संहार करून टाकायास अगदीं तयार झालेलें असें तिला दिसलें. हे लोक कदाचित् मलाही ठार मारतील, आणि मी मरायास मान्य आहें, पण देवाच्या साह्यानें मजकडून जितकें होईल तितकें मी करीन, असा पक्का निश्चय करून तिनें नवऱ्याचा अपराध आप-णावर घेऊन फार नम्रतेनें क्षमा मागितली,

आणि त्याला जें पाहिजे होतें तें त्याजपुढें सादर केलें.

पाहा, अबिगइलेची नम्रता व सौम्यता यांकडून ते चालून आलेले महावीर कसे जिंकले गेले, आणि तिनें आपल्या नवऱ्याविषयीं कारणापुरतें थोडक्यांत बोलून त्याचे दोष पदरांत घेतले हें तिला केवढें भूषणदायक झालें! नवरा कसाही असो, बायकोनें नवऱ्याचे दोष किंवा दुर्गुण दुसऱ्यांपाशीं सांगत बसणें हें तिला शोभत नाहीं, आणि ह्या गोष्टीकडे पुष्कळ स्त्रिया लक्ष देत नाहींत. "सद्गुणी बायको जशी सोन्याची लगड, दुबळेपणाला नाहीं करीत उघड," हें त्या विसरतात.

अबिगईल निर्दोष असतांना, तिनें आपणावर आपल्या नवऱ्याचा दोष घेतला. तिला माहीत होतें कीं, शेवटीं ज्याच्या त्याच्या करण्याप्रमाणें देव फळ देणार आहे. आपण आपल्या

कर्तव्यामध्यें उणें पडूं देऊं नये ह्याची जी तिला विशेष काळजी होती ती योग्यच होती, आणि पुढें जें कांहीं घडलें, त्यावरून निःसंशय दिसून येतें कीं, देव न्याय करणारा आहे.

दावीद व त्याचें सैन्य परत गेल्यावर अ-



बिगईल आपल्या नवऱ्याकडे त्या उत्साहाच्या ठिकाणीं गेली. त्या दिवशीं त्यानें एक मोटी

मेजवानी केली होती, आणि तो दारू पिऊन अगदीं मस्त होऊन पडला होता. हें पाहून ती त्या वेळेस कांहीं बोलली नाहीं. परंतु दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्याचा कैफ उतरल्यावर तिनें त्याला सविस्तर हकीगत सांगितली. तो तर आदल्या रात्रीच्या दंगलांतून नुकताच शुद्धीवर येऊन अगदीं शक्तिहीन होऊन बसला होता. तशांत ती हकीगत ऐकिल्याबराबर त्याच्या जीवाला मोठाच धक्का बसून तो पुनः निश्चेष्ट होऊन पडला. ते समयीं त्याला सावध करायास लोकांनीं पुष्कळ उपाय केले असतील. पण तो कांहींच न सुधारतां शेवटीं दहा दिवसांनीं त्या स्थितींत असतां त्याचा प्राण गेला. त्याच्यासाठीं कोणीं शोक केला वगैरे कांहीं सांगितलें नाहीं. तो मोठा अहंकारी व अपस्वार्थी असून कोणाचीही परवा बाळगीत नसे. त्याच्या नांवाप्रमाणेंच त्याची

कृति आहे असें अबिगईलही दाविदाशीं बोलतांना ह्मणाली होती. (नाबाल याचा अर्थ मूर्खपणा असा आहे.)

जे कोणी आपल्याच हिताकडे मात्र पाहून वागतात ते खरोखरच मूर्ख समजावयाचे. शास्त्रांत म्हटलें आहे कीं, "त्यांचें आयुष्य नाशांत संपेल." त्याप्रमाणेंच नाबालाचा परिणाम झाला. जेव्हां दाविदानें ही भयंकर गोष्ट ऐकिली तेव्हां तो म्हणाला असेल कीं, मीं अबिगइलेचें बोलणें मान्य करून कोणाचें रक्त पाडिलें नाहीं, व देवानेंच त्याला परस्परें शिक्षा दिली हें फार चांगलें झालें.

पुढें दाविदानें जसजसें त्या बाईचें शहाणपण व इतर श्रेष्ठ गुण मनांत आणिले, तसतशी ती त्याला फार संभावित व वर्णनीय अशी दिसूं लागली. तो मनांत असा विचार करूं लागला कीं, ती माझ्यासमोर व माझ्या सर्व

सैन्यासमोर जेव्हां उभी राहिली, तेव्हां तिनें मोठ्या नम्रतेनें व मर्यादेनें भाषण केलें, आणि नवऱ्याचे दुर्गुण थोडक्यांत दर्शवून त्यांबद्दल क्षमाही मागितली. लग्न झाल्यापासून त्या तुसड्या व रागीट मनुष्याकडून आपण किती दुःख व जाच सोसला याविषयीं तिनें तोंडांतून चकार शब्दही काढिला नाहीं. अशी गुणवान स्त्री राजघराण्यास देखील शोभा आणील. ईश्वरकृपेनें मी सिंहासनारूढ झालों ह्मणजे मला तिच्यासारखी सुज्ञ व साध्वी स्त्री असणें अवश्य आहे.

ह्या विचाराप्रमाणें दावीदानें तिचे शोकाचे दिवस संपल्यावर योग्य प्रसंग पाहून तिजकडे एक जासूद पाठवून आपली इच्छा दर्शविली. अबिगइलेनें ती मान्य करून भूमीपर्यंत लवून ह्मटलें, "मीं तर केवळ महाराजांच्या चाकरांचे पाय धुणारी दासी असें असावें." पहा,

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.



तिच्याठायीं केवढी लीनता होती! जी गोष्ट तिच्या स्वप्नींदेखील नव्हती, ती देवानें घडवून आणून तिला उंच पदावर बसविलें. शास्त्रांत सांगितलें आहे कीं, "जे नम्र ते धन्य, कारण कीं ते पृथ्वीचें वतन भोगतील." त्याचप्रमाणें अबिगइलेची गोष्ट झाली. ती दावीदाच्या राजवाड्यांत असतांना मागील सर्व दुःखाचे दिवस विसरून गेली असेल. देवानें तिला श्रेष्ठ करून सुखांत ठेविलें, हा तिचा परिणाम पाहून वाचकांस खरोखर आनंद वाटेल यांत संशय नाहीं.

आतां अबिगइलेनें नाबालाच्या सहवासांत इतकीं वर्षें जो जाच काढिला त्याबद्दल जबाबदार कोण, असें जर विचारिलें तर फारकरून तिचीं आईबापेंच होत. त्या देशांतील लोकांतही इकडील सांप्रदायाप्रमाणें आईबापेंच आपल्या मुलांच्या लग्नांची व्यव-

स्था करीत असत. तथापि अबिगइलेच्या लग्नाविषयीं टीका करायास कांहीं आधार नाहीं. कारण आम्हांस त्याबद्दल बरोबर माहिती नाहीं. पण हल्लीं या देशांत बहुत आईबापांचें पाहणें कशाकडे असतें हें वारंवार दिसण्यांत येतें. धार्मिकपण किंवा गुण यांकडे फारसें न पाहतां प्राप्ति किंवा पदवी यांचीच मोठ्या काळजीनें ते विचारपूस करितात. यामुळें लग्नाच्या संबंधावरून जें कल्याण व्हावयाचें तें न होतां कोठें कोठें वरील दंपत्याप्रमाणें विसंगतपणा दिसण्यांत येतो, आणि असें कां झालें असें जर विचारिलें, तर पैसा, वतन किंवा पदवी यांच्या भरंवशावर आईबापांनीं केलें हेंच उत्तर मिळणार आहे. तर ही मोठी चूक आहे. लग्नाचा संबंध जन्मभर तुटत नाहीं, म्हणून तो फार विचारपूर्वक केला पाहिजे. भक्तिशील, सद्गुणी,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.



प्रकृतीनें सदृढ असे जे आहेत त्यांच्याशींच शरीरसंबंध केल्यानें आपल्या कन्यापुत्रांस खरें सुख होईल हें मनांत आणून आईबापें वागतील तर फार चांगलें होईल. सुज्ञ वाचकांनीं याविषयीं चांगला विचार करावा.





१

# शूनेम गांवांतील स्त्री.

प्राचीनकाळीं देवानें आपल्या पवित्र आत्म्याकडून कित्येक विश्वासू भक्तांस उपदेश करण्याचें व भविष्य सांगण्याचें ज्ञान दिलें होतें. अशा भक्तांस भविष्यवादी म्हणत. ते गांवोंगांवीं फिरून मनुष्यांविषयीं

देवाचा मनोदय काय, त्याला संतोषवावें कसें, इत्यादि गोष्टी लोकांस सांगत, व त्यांच्या पापांबद्दल त्यांचा निषेध करीत. कधीं कधीं पुढें होणाऱ्या गोष्टीही त्यांस कळवीत. ज्यांचें लक्ष्य देवाकडे असे, त्यांस आपल्या गांवीं देवाचा भविष्यवादी आला आहे हें ऐकून फार आनंद वाटे, आणि ते त्याच्या बोधाकडे चित्त देऊन त्याप्रमाणें करायास झटत. अशा लोकांपैकींच शूनेम गांवांत एक स्त्री होती.

त्या काळांत जो भविष्यवादी प्रसिद्ध होता, त्याचें नांव अलीशा. तो जेथें जेथें जाई तेथें लोकांशीं प्रीतीनें बोलून चालून वागत असे. त्याला देवानें मोठीं अद्भुत कृत्यें करण्याची शक्ति दिली होती. पण त्यानें ती स्वतःसाठीं खर्चिली असें नाहीं; तर विधवा, अनाथ, दुःखित, दरिद्री यांच्यासाठीं. तो अशांचा मोठा वाली होता.

शूनेमगांव यरूशलेम शहराच्या उत्तरेस सुमारें सव्वीस कोसांवर होतें. त्यांतील ज्या स्त्रीचा वृत्तांत एथें लिहिला आहे, तिचें नांव शास्त्रांत सांगितलें नाहीं. तिला "शूनेमांतील स्त्री" इतकेंच म्हटलें आहे. यावरून ती त्या गांवांत प्रसिद्ध होती असें दिसतें. ती थोर लोकांतील असून मातबर व वजनदार अशी होती; शिवाय देवावर तिची मोठी निष्ठा असे. हें सर्व तिच्या हकीकतीवरून कळून येतें.

अलीशा भविष्यवादी तिच्या गांवाकडे येई, तेव्हां ती त्यास आपल्या घरीं बोलावून आणून त्याचें आगतस्वागत करी, व आनंदानें त्याचा बोध ऐके. शिवाय, त्यानें येतां जातां नेहमीं आपल्याच एथें उतरत जावें म्हणून तिनें अशी योजना केली कीं, आपल्या घरालगत एक खोली बांधून तींत बैठक, समई, अंथरूण वगैरे सर्व व्यवस्था करून

ठेवावी, म्हणजे त्याची चांगली सोय होईल. ही गोष्ट तिनें आपल्या नवऱ्याच्या कानावर घातली, आणि त्यालाही ती पसंत पडली, कारण तो तिच्यासारखाच उदार मनाचा होता.

खोली तयार झाल्यावर त्यांनीं ती अलीशाला सादर करून म्हटलें, "ही आपणास उतरावयासाठीं केली आहे. आपण आलां म्हणजे एथेंच विश्रांति करीत जावी." त्या दिवसापासून अलीशा तेथें येऊन उतरूं लागला. हें त्या बाईचें करणें किती स्तुत्य होतें हें लक्ष्यांत आणा. आतां कोणी म्हणेल कीं, 'ती श्रीमान होती म्हणून तिला हें करणें कांहीं अवघड पडलें नसेल.' ठीक आहे. परंतु या काळांत अशा एखाद्या श्रीमान स्त्रीनें कोणा पाळकाकरितां, किंवा येणाऱ्याजाणाऱ्या धर्मोपदेशाकाकरितां, एवढा खर्च करून अशी व्यवस्था केली आहे असें क्वचित आढळेल.

त्या बाईनें तरी आपल्या शक्तीप्रमाणें सर्व कांहीं करून आपली धर्मनिष्ठा दर्शविली! हें किती चांगलें म्हणावयाचें! जरी बहुत स्त्रिया धनवान नाहींत, तरी त्या देवाच्या सेवेकरितां व त्याच्या भक्तांच्या साह्याकरितां शक्त्यनुसार श्रम व खर्च करतील, मग थोडेंच कां होईना, तर त्यांचीही तीच धर्मबुद्धि दिसून येईल, व त्यांस देवाचा आशीर्वाद मिळेल यांत संशय नाहीं. आणखी, त्या बाईचें घरांत केवढें वजन होतें तें पहा! तिच्या नवऱ्यानें लागलींच तिचें म्हणणें मान्य केलें, यावरून तिची वर्तणूक कशी व तिचें लक्ष्य कोणत्या गोष्टीकडे होतें हें कळून येतें. त्याप्रमाणें जर या काळांतील स्त्रिया सर्वांहून जें उत्तम, त्याकडे चित्त देतील व तें प्राप्त करून घेण्यास झटतील तर फार बरें होईल. असो; ख्रिस्ती देशांत अशा पुष्कळ परोपकारी

बाया व पुरुष आहेत त्याप्रमाणें एथील ख्रिस्ती लोकांत पुष्कळ व्हाव्या अशी आमची इच्छा आहे.

अलीशा त्या गांवीं आला म्हणजे त्याच खोलींत उतरत असे. हा तिचा उपकार जाणून आपणही तिचें कांहीं काम असल्यास करावें असें मनांत आणून त्यानें एके दिवशीं तिला बोलावून विचारिलें कीं, "बाई, तुम्ही एवढी मेहनत व काळजी घेऊन माझी अशी उत्तम प्रकारें सोय केली आहे, तर तुम्हांसाठीं मीं काय करावें म्हणून तुमची इच्छा आहे? राजाजवळ किंवा सेनापतीजवळ तुमचें कांहीं काम आहे काय? त्यांच्या कानावर कांहीं घालायाचें आहे कीं काय?"

तेव्हां ती म्हणाली, "मजकरितां कांहीं करणें नको, माझें कांहीं मागणें नाहीं." परंतु अलीशाची खातरी होईना. त्यानें आपल्या

चाकरास हांक मारून पुसलें कीं, "अरे गेहजी, या बाईनें आपणाकरितां पुष्कळ खटपट केली आहे, तर आपण हिच्याकरितां काय करावें म्हणून तुला वाटतें?" गेहजी म्हणाला, "तिला मूलबाळ कांहीं नाहीं, तिचा नवरा तर म्हातारा झाला आहे. एवढें मात्र मला दिसतें."

मग अलीशानें पुनः तिला बोलावून आणून निश्चयपूर्वक वचन दिलें कीं, "बाई, नेमलेली मुदत भरली म्हणजे तुम्हांस पुत्र होईल." तेव्हां तिला तें खरें वाटेना. ती अलीशाला म्हणाली, "महाराज, आपल्या दासीशीं खोटें बोलूं नका." यावरून तिनें मूल होण्याची आशा सोडिली होती असें दिसतें. परंतु देवानें तिची निराशा होऊं दिली नाहीं. त्यानें अलीशाच्या वचनाप्रमाणें तिला पुत्रसंतान दिलें. पाहा, त्या बाईचें लक्ष्य मुख्यत्वें परमार्थाकडे

होतें, तो तिला प्राप्त होऊन शिवाय संसार-संबंधी जें सुख तिच्या ध्यानीं मनीं देखील नव्हतें, तेंही तिला प्राप्त झालें.

पहिल्यानें तुम्ही देवाचें राज्य व त्याचें न्यायीपण यांचा शोध करा; म्हणजे ज्या इतर गोष्टींची तुम्हांस गरज आहे त्या सर्व मिळतील असें जें एका विशेष प्रसंगीं प्रभु येशू ख्रिस्तानें आपल्या शिष्यांस म्हटलें होतें, त्याला अनुसरूनच या बाईचें वर्त्तन होतें. त्या म्हणण्याची प्रचीति निरनिराळ्या काळीं देवाच्या अनेक भक्तांनीं घेऊन पाहिली आहे.

त्या आईबापास त्या नूतन बालकावरून जो आनंद झाला, तो सांगतांच येत नाहीं. त्यांची गोष्ट बहुत प्रकारें आब्राहाम व सारा यांच्यासारखीच होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. घरामध्यें बालक असणें हा एक हर्षाचा झराच आहे असें एका कवीनें म्हटलें आहे,

तें खरें आहे. विशेषेंकरून धार्मिक आई-बापांस लेंकरूं फार मोलवान असतें. देवानें हा एक जीवात्मा आमच्या स्वाधीन केला आहे, हा व्यर्थ जाऊं नये, परंतु पुढें त्याच्या मुगुटांतील एक शोभायमान रत्न असा व्हावा, म्हणून तीं आईबापें त्याच्या सुशिक्षणाकडे जीव लावून मोठ्या आस्थेनें लक्ष्य पुरवितात, त्याप्रमाणें ह्या आईबापांनींही केलें असेल यांत संशय नाहीं. परंतु हा मुलगा मोठा झाला नाहीं तोंच एक मोठी दुःखाची गोष्ट घडली, ती अशी—

त्या मुलाच्या बापाच्या शेतांत कापणी चालली असतां एके दिवशीं मुलाला वाटलें कीं, आपणही तिकडे जाऊन मजा पाहावी, म्हणून तो तेथें जाऊन कापणाऱ्यांबरोबर आनंदानें इकडे तिकडे फिरत आहे, इतक्यांत त्याला उन्हाचा चटका लागून एकाएकीं मस्त-

कांत इतकी तिडीक उठली कीं, तो मोठ्यानें रडूं लागला. बापाला वाटलें कीं, उन्हानें डोकें दुखत असेल, म्हणून त्याला चाकराबरोबर आईकडे पाठविलें. घरीं आल्यावर आईनें पुष्कळ उपाय केले असतील. परंतु कांहीं न होतां त्याच दिवशीं दुपारीं मुलगा आईच्या मांडीवर असतांनाच मरण पावला.

आतां ती या दुःखसागरांत असतांना मोठ्यानें रडली असेल, तिनें नवऱ्याला बोलावणें पाठवून आणिलें असेल, आणि तें घर आकातानें अगदीं भरून गेलें असेल असें कोणास वाटेल, पण तसें कांहीं झालें नाहीं. मुलाचा प्राण गेला हें चाकरांस देखील कळूं नये म्हणून तिनें आपलें दुःख तसेंच दाबून ठेवून, त्याला अलीशाच्या खोलींत नेऊन त्याच्या अंथरुणावर ठेविलें, आणि दार लावून घेतल्यावर नवऱ्याकडे निरोप कळविला कीं,

'एक गडी व एक गाढव पाठवून द्या, मला अलीशा भविष्यवाद्याकडे जाऊन यायाचें आहे.' हें ऐकून नवऱ्याला आश्चर्य वाटलें. तथापि त्यानें गड्याच्या हातीं असें विचारलें कीं, 'आज अमावास्या नाहीं, शाब्बाथही नाहीं, मग कशाला जातेस?' पण ती जास्ती कांहीं न बोलतां तशीच निघाली.

शूनेमगांवापासून कारमेल डोंगर सुमारें नऊ कोस असून तेथें अलीशा राहात असे. तथापि ती बाई मोठी त्वरा करून तेथें जाऊन पोहोंचली. ती बरीच दूर होती तोंच अलीशानें आपल्या चाकरास म्हटलें, "अरे, ती पाहा, शूनेमकरीणबाई इकडे येत आहे. तिला सामोरा जाऊन विचार कीं, 'तुमचें व नवऱ्याचें व मुलाचें कुशल आहेना?' 'त्याप्रमाणें' त्यानें विचारल्यावर बाई म्हणाली, आहे. परंतु अलीशाजवळ येऊन पोहोंचताच तिनें खालीं

उतरून त्याचे पाय धरिले. तेव्हां चाकर तिला दूर करूं लागला. अलीशानें त्याला सांगितलें, 'तिला असूं दे, तिचा जीव खिन्न आहे आणि तिला काय झालें हें अजून मला देवानें कळविलें नाहीं.'

मला वाटतें कीं, अलीशाच्या त्या कुशलप्रश्नावरून तिला इतकें रडें कोसळलें कीं, तिच्या तोंडांतून शब्दच निघेना. अलीशा तर तिची शांत होण्याची वाट पाहत तसाच उभा होता. शेवटीं त्या बाईच्या मुखांतून हे शोकरूप शब्द निघाले कीं, 'महाराज, मी आपणाजवळ पुत्र मागितला होता काय? आपल्या दासीशीं खोटें बोलूं नका, असें मीं म्हटलें होतेंना? मी सुखी आहें, माझें कांहीं मागणें नाहीं, असें मी आपल्यापाशीं बोललें कीं नाहीं?' हें ऐकिल्याबरोबर अलीशानें मनांत सर्व जाणिलें, आणि लागलींच

आपली काठी त्या चाकराजवळ देऊन सांगितलें कीं, 'शूनेमास जाऊन ही त्या मुलाच्या तोंडावर ठेव. आटप, जलदी कर. वाटेनें कोणाशीं बोलत उभा राहूं नको.'

मग तो चाकर लागलींच निघाला. पण ती बाई तेथून जाईना. ती तशीच अलीशाचे पाय धरून राहिली. तेव्हां अलीशाही तिजबरोबर जायास निघाला. दोघें शूनेमाजवळ येत आहेत तों मध्येंच चाकर परत येतांना त्यांस भेटला, आणि सांगूं लागला कीं, आपल्या आज्ञेप्रमाणें मुलाच्या तोंडावर काठी ठेविली, पण तो कांहीं उठला नाहीं! अलीशा गांवांत येतांच थेट आपल्या खोलींत गेला, आणि पाहतो तों मुलगा तसाच अंथरुणावर निश्चेष्ट पडला आहे! तेव्हां त्यानें दार लावून घेऊन त्या एकांतस्थळीं केवढ्या आग्रहानें देवाची प्रार्थना केली असेल, व त्या मुलाचा

जीव पुनः आणण्याविषयीं किती विनवण्या केल्या असतील हें सांगावयास नकोच.

तो आंत होता तोंपर्यंत ती बाई बाहेर उगीच बसली असेल काय? नाहीं, तिच्याही एकाग्रतेच्या विनवण्या चाललयाच असतील यांत संशय नाहीं. परमेश्वर आपल्या भक्तांच्या प्रार्थनांकडे कान देतो, व तो त्यांच्या मागण्याप्रमाणें करायास सिद्ध आहे, असें बहुत वेळां ह्या भविष्यवाद्यानें मला सांगितलें आहे हें मनांत आणून तिला शांति प्राप्त झाली, व आशाही उत्पन्न होऊं लागली.

थोड्या वेळानें तिला कळलें कीं, अलीशा मला बोलावीत आहे. तेंव्हां ती केवढ्या उत्सुकतेनें उठून त्याजकडे गेली! परंतु मनांत कांहीं आशा व कांहीं भय अशा रीतीनें ती कांपत कांपतच गेली असेल. खोलीच्या दारांत येतांच अलीशाचे हे शब्द कानीं प-

डले—"बाई, हा आपला मुलगा घेऊन जा." तेव्हां तिच्या आनंदास काय विचारावें! तो जिवलग मुलगा जणू काय माझी वाट पहातच उभा आहे असा तिला दिसला. त्याशीं कांहीं बोलणार, तों तिचा कंठ दाटून येऊन तोंडांतून शब्द निघेना, तिनें मुलास कवटाळून मात्र धरिलें. मग तिनें अलीशाच्या पायां पडून, त्याचे व देवाचे मनःपूर्वक आभार मानून स्तुति केली.

हें सर्व होई तोंपर्यंत दुसरा दिवस उगवला असेल. पण त्या पूर्वींच तिनें नवऱ्याला भेटून ही सर्व हकीकत सांगितली असेल. ती ऐकून तो मनामध्यें फार विस्मय पावून म्हणाला असेल कीं, 'माझें मन दुःखित होऊं नये, म्हणून इनें हें एवढें दुःख आपल्या अंतःकरणांत कसें दाबून ठेविलें! आणखी देवाच्या वचनावर पूर्ण विश्वास ठेवून इनें अलीशाला

किती त्वरेनें एथें आणिलें, आणि त्याकडून केवढी ही अद्भुत गोष्ट झाली! ह्या माझ्या स्त्रीसारखी शाहणी, सद्गुणी व धार्मिक स्त्री जगांत नसेल.' पुढें सुमारें तीन वर्षेंपर्यंत या कुटुंबाविषयीं कांहीं उल्लेख आढळत नाहीं. मुलगा तर दिवसेंदिवस वाढत गेला, व तिघेंही सुखानें दिवस घालवूं लागलीं.

याप्रमाणें सर्व सुरळीतपणें चाललें असतां पुनः एकवार त्यांच्या सुखास धक्का बसला. अलीशानें त्यांस कळविलें कीं, "या देशांत सात वर्षें दुष्काळ पडणार आहे, यास्तव तुम्हीं कोठें तरी दुसऱ्या मुलखांत जाऊन वस्ती कराल तर बरें होईल." तेव्हां त्यांस आपलें घर, शेतें, मळे, व दुसरी बहुत मालमत्ता सोडून जावें लागलें. त्या वेळीं पलिष्टी लोकांच्या देशांत आबादानी होती म्हणून हेही तिकडेच गेले. परंतु तेथें तरी त्यांस तीं सात

वर्षें दुःखाचींच गेलीं असतील. कारण तेथें हे नवीनच गेल्यामुळें राहण्याची वगैरे चांगली सोय जमली नसेल, आणि पलिष्टी लोक मूर्तिपूजक असून त्यांच्या रीतिभाती त्यांस त्रासदायक झाल्या असतील. शिवाय, त्या बाईचा नवराही तेथें मरण पावला असें दिसतें. याबद्दल असा लेख आढळतो कीं, तीं व तिचा मुलगा अशीं दोघेंच स्वदेशीं परत आलीं.

तीं दोघें मायलेंकरें जेव्हां स्वदेशाकडे येण्यास निघालीं, तेव्हां त्यांनीं वाटेनें आपलें घर, मळे, शेतें वगैरे यांविषयीं गोष्टी काढिल्या असतील, व आनंदानें बोलत बोलत मार्ग क्रमिला असेल. पण तेथें पोहोंचल्यावर त्यांना कळलें कीं, आपल्या घरांत कोणी बिन-ओळखीचे लोक येऊन राहिले असून आपले सर्व मळे, शेतें वापरीत आहेत. तेव्हां ती बाई त्यांस म्हणूं लागली कीं, "हें सर्व

आमचें आहे, आम्ही दुष्काळामध्यें सोडून गेलों होतों, आतां परत आलों, तर आमचें आम्हांस द्या.” परंतु ते कांहीं ऐकेनात. कदाचित् तिचें म्हणणें त्या लोकांस खरें वाटलें नसेल. पण ज्यापेक्षां त्यांनीं याबद्दल कांहीं पूसतपास केली नाहीं, त्यापेक्षां ती खरी मालकीण असतां तिला कांहीं देऊं नये असा त्यांचा इरादा होता असें दिसतें. ‘आतां काय करावें! आपणास या कामांत कोण साह्य करील, व हें सर्व आपल्या हातीं कसें येईल!’ असें म्हणून ती मोठ्या पेंचांत पडल्यासारखी झाली. तरी तिनें आपला सर्व भरंवसा देवावर टाकून उद्योग चालविला.

इकडे राजाचें मन तिची विनंती मान्य करण्याविषयीं कशा प्रकारें सिद्ध होत चाललें होतें, हें तर तिला ठाऊकच नव्हतें. देवानेंच हा प्रसंग घडवून आणिला असें समजलें पाहिजे.

त्या राजानें अलीशाचीं कांहीं कांहीं चरित्रें ऐकिलीं होतीं. परंतु तीं खरीं किंवा कशीं, याचा संशय आल्यामुळें त्यानें अलीशाचा चाकर जो गेहजी, याला बोलावून विचारिलें कीं, तुझ्या धन्यानें कोणकोणते चमत्कार केले आहेत ते आम्हांस सांग पाहूं. गेहजी ते सांगूं लागला, आणि शेवटीं त्या शूनेमगांवांतील मुलगा उठविल्याचें सविस्तर वर्तमान सांगत आहे, इतक्यांत ती बाईही मुलासुद्धां राजासमोर येऊन उभी राहिली. तिला पाहतांच गेहजी म्हणतो, "महाराज, हीच ती बाई, आणि जो मुलगा जीवंत केला तो हाच." बाईनें राजाच्या पायां पडून आपलें सर्व गाऱ्हाणें सांगितलें. राजानें तिला आणखी कांहीं विचारपूस केल्यावर तिच्या हक्कांविषयीं त्याची खातरी झाली.

मग त्यानें आपल्या एका कामदारास आज्ञा केली कीं, या बाईचीं शेतें, मळे वगैरे जें कांहीं असेल तें सर्व तिला परत मिळालें पाहिजे. शिवाय, इतकीं वर्षें जें त्याचें उत्पन्न झालें असेल तेंही तिला भरून देवविलें पाहिजे. याप्रमाणें देवानें त्या बाईवर दया करून तिची विनंती ऐकिली, आणि तिचें वतन तिला पुनः प्राप्त करून दिलें. हें तिच्या पूर्ण विश्वासाचें फळ असें जाणावें.

तेव्हां ती बाई आपल्या मुलास घेऊन मोठ्या आनंदानें घरीं गेली असेल, आणि या खोलींतून त्या खोलींत तीं मायलेंकरें एकमेकाशीं बोलतचालत फिरलीं असतील. "ज्या वेळेस तुला शेतांतून घरीं आणिलें, त्या वेळेस मी तुला याच खोलींत घेऊन बसलें होतें. तुझा प्राण निघून गेल्यावर तूं अगदीं गार पडूं लागलास, तेव्हां मीं तुला त्या भविष्यवाद्याच्या


खोलींतल्या अंथरुणावर नेऊन ठेविलें. पुढें कांहीं वेळानें तेथेंच तुझ्या लहानशा शरीरास ऊब येऊन हातापायांत रक्त खेळूं लागलें, आणि तूं मला जीवंत उभा राहिलेला असा भेटलास." याप्रमाणें कदाचित् तिनें त्याला आठवण दिली असेल. तें सर्व ऐकून त्या मुलासही वाटलें असेल कीं, खरोखर मी विशेष प्रकारें देवाचा आहें, आणि मीं आयुष्यभर त्याची सेवा करावी हें योग्य आहे.

त्या बाईला तिचें वतन मिळाल्यानंतर पुढें त्या मायलेंकरांचें कसें काय झालें, याविषयीं शास्त्रांत कांहीं आढळत नाहीं. तथापि जिनें त्या मुलासाठीं इतके श्रम व कष्ट केले, तिचा उतराई होण्यास तो फार झटला असेल, आणि तिच्या उतारवयामध्यें त्यानें तिचें योग्य रीतीनें पालनपोषण केलें असेल यात संशय नाहीं. शास्त्रांत एका स्त्रीविषयीं

असें म्हटलें आहे कीं, "तिनें चांगला वांटा निवडिला, आणि तो तिच्यापासून घेतला जाणार नाहीं." त्याचप्रमाणें ह्या बाईनें केलें. ती श्रीमान होती तरी तिचें चित्त धनद्रव्यावर नव्हतें. हें क्षणभंगुर आहे असें जाणून तिनें त्याचा पुष्कळ अंश देवाच्या सेवेस लाविला. ती आपल्या संसाराकडे दुर्लक्ष्य होऊं न देतां नियमित काळीं देवाची भक्ति करी, व त्याच्या सेवकांचा बोध ऐके. शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या उखाळ्या पाखाळ्या काढीत बसण्यास तिला फुरसतच नसे, तर आपल्याकडून कांहीं तरी उपयोगी काम व्हावें ह्याच हेतूनें ती नेहमीं वागत असे.

या सर्व कारणांवरून तिच्या नवऱ्यानें तिजवर पूर्ण विश्वास ठेविला, आणि देवानें तिला आशीर्वाद देऊन तिचे श्रम सफळ केले. आणखी तिनें जो वांटा निवडिला तो सदा

सर्वकाळ टिकणारा व सुखाचा वांटा होता असें तिच्या अनुभवास आलें.



१०

# एस्तेर राणी.

हिंदुस्थानाच्या वायव्येस काबूल व तुर्कस्थान यांच्यामध्यें इराण म्हणून एक मोठा विस्तीर्ण देश आहे. प्राचीन काळीं त्यांतील लोक फार लढाऊ असत, असें इतिहासावरून

कळतें. जगामध्यें जे प्रख्यात योद्धे होऊन गेले त्यांत कित्येक इराण देशांतील राजे होते, व त्यांनीं ज्या मोठमोठ्या लढाया केल्या त्या जगप्रसिद्ध आहेत. परंतु त्या राजांची हकीकत वाचली म्हणजे ते फार स्वार्थी व जुलमी होते असें दिसून येतें. इतर राजांना जिंकून त्यांचे देश हस्तगत करावे, व तेणेंकरून आपली कीर्ति वाढवावी हाच त्यांचा मुख्य उद्देश होता. आपल्या प्रजेची आबादानी असावी, तिची समृद्धि होऊन ती सुखी व्हावी याकडे त्या जुलमी राजांचें लक्ष्य मुळींच नसे. ते केवळ आपल्याच इच्छेप्रमाणें वर्तत असत. कोणाला चढविणें, कोणाला खालीं करणें, व कोणाचा प्राण घेणें, इत्यादि सर्व कांहीं ते आपल्या खुशीप्रमाणें करीत.

त्या काळांत सर्वांहून कीर्तिमान असे जे राजे इराण देशांत झाले, त्यांत अहश्वेरोश

ह्या नांवाचा एक महाप्रतापी व जगप्रसिद्ध राजा होता. तो इसवी सनापूर्वी सुमारें सवापांचशें वर्षें उदयास आला. त्याचीं युद्धसंबंधी चरित्रें प्राचीनकाळचे इतिहास वाचणारांस ठाऊकच आहेत. पण तोही किती जुलमी होता हें पुढील एका गोष्टीवरून दिसून येईल.

ह्या राजानें आपल्या वैभवाच्या ऐन भरभराटींत असतां एकेसमयीं आपल्या राजवाड्यांत प्रधान, मुत्सदी, दर्बारी वगैरे लोकांस, व राजवाड्यांतील सर्व सेवकांस एक मोठी मेजवानी केली. त्या मेजवानीचा थाट एकसारखा सात दिवस चालू होता. त्याच वेळेस त्याच्या राणीनेंही राजमंदिरांतील सर्व स्त्रियांस मेजवानी केली. ती त्या महोत्सवांत असतांना तिला एकाएकी राजाकडून त्या पुरुषसमाजांत येण्याचा हुकूम आला. अशा

समाजांत येण्याविषयीं तिला पूर्वी कधीं बोलावणें झालें नव्हतें, आणि हें अगदीं त्या देशाच्या चालीविरुद्ध होतें. कारण तेथील श्रेष्ठ प्रतीच्या स्त्रिया कधीं पडद्याच्या बाहेर निघत नसत, म्हणून हा हुकूम फार अविचाराचा आहे, किंवा कदाचित् ही निरोप सांगणाराची चूक असेल, असें समजून तिनें तो मान्य केला नाहीं. त्यावरून राजानें फार संतापून तिला राजवाड्यांतून घालवून दिलें. त्याला ठाऊक होतें कीं, अशा मंडळींत तिला आणूं नये. आणि ती आली नाहीं हें तिनें बाजवी केलें. तथापि जो कोणी राजाचा हुकूम मोडील त्याला शिक्षा व्हावयाचीच. मग तो हुकूम कितीही जुलमाचा कां असेना, त्याप्रमाणें केलेंच पाहिजे असा त्याचा नेम होता.

पुढें कांहीं वर्षांनीं राजा एक मोठी लढाई मारून आल्यावर नवी राणी करण्याचा विचार

करूं लागला. तेव्हां त्याच्या सेवकांनीं सुस्वरूप, सुरेख, व राणी होण्यास योग्य अशा कुलीन कन्या जमा करून त्या देशाच्या सांप्रदायाप्रमाणें कांहीं महिनेपर्यंत त्यांच्या शुद्धीकरणाचे विधि झाल्यावर एकएकीस राजासमोर आणिलें. त्यांमध्यें एस्तेर म्हणून एक अति रूपवान व मनोहर अशी कुमारी होती. तिला पाहून राजा फार खुप झाला, व तीच राणी करावयाची म्हणून त्यानें निश्चय केला. जर राजानें तिचें कूळ कीं वंश याबद्दल विचारपूस केली असती, तर कदाचित् त्यानें ती मुलगी पसंत केली नसती, कारण ती पारशी लोकांतली नसून यहूदीण होती. पण त्यानें या गोष्टीविषयीं कांहींच विचारिलें नाहीं, व कोणीं त्याला कळविलेंही नाहीं असें दिसतें.

सुमारें नव्वद वर्षांअगोदर बाबिल देशाच्या राजानें यहूदी लोकांशीं लढाई करून त्यांची

राजधानी जें यरूशलेम शहर व त्यांतील सुंदर देऊळ यांचा अगदीं विध्वंस करून टाकिला, व बहुत लोकांस पाडाव करून आपल्या देशास नेलें. ते लोक तेथें सत्तर वर्षेंपर्यंत दासपणांत राहिल्यावर त्या राजाच्या अमलांतून सुटले. त्या वेळेस बहुतेक आपल्या देशास गेले. परंतु कांहीं लोक मुलखोंमुलखीं पांगून आपापल्या सोईप्रमाणें तेथेंच वस्ती करून राहिले.

त्याप्रमाणें इराण देशांतही त्या लोकांच्या बऱ्याच वसाहती झाल्या. तथापि ते त्या देशच्या लोकांशीं फारसा व्यवहार न ठेवितां आपल्याच धर्माचे विधि पाळून वेगळे राहत असत. व्यापारधंद्यापुरता मात्र त्यांशीं संबंध ठेवीत. परंतु हे परदेशीय असून यांच्या चालीरीति आपल्याहून भिन्न आहेत असें समजून परशियन लोक त्यांस नीच व हलके मानीत असत.

एस्तेर ही ह्या लोकांतील होती. लहानपणींच तिचे आईबाप मरण पावले. तेव्हांपासून तिच्या चुलतभावानें तिला आपल्याजवळ ठेवून आपल्या मुलीप्रमाणें तिचें पालनपोषण केलें, व मोठ्या काळजीनें तिला ज्ञान शिकविलें, आणि देवाचें भय धरून चालण्याविषयीं तिच्या कोमल अंतःकरणांत अशा प्रकारें बिंबविलें कीं, तें ती कधीं विसरली नाहीं. हें तिच्या पुढील हकीकतीवरून दिसून येतें.

तिच्या चुलतभावाचें नांव मर्दखय असें होतें. त्याला राजवाड्यांत कांहीं तरी नौकरी होती असें दिसतें, कारण राजाच्या इतर सेवकांप्रमाणेंच तो तेथें येत जात होता. कित्येक गोष्टींवरून तर असें अनुमान होतें कीं, तो द्वारपाळाच्याच कामावर होता. जेव्हां राजाकरितां मुली जमविल्या, तेव्हा एस्तेरही त्यांच्या बरोबर गेली. हें तिचें जाणें मर्दखया-

कडूनच झालें असावें यांत संशय नाहीं. आणि आपण कोणत्या लोकांतील आहों हें कोणास कळूं देऊं नको, असें त्यानें तिला निक्षून सांगितलें होतें. त्यानें मनांत असा विचार केला असेल कीं, आम्हां नीच मानलेल्या लोकांपैकीं ही जर राणी झाली, तर आमचें मोठें कल्याण होण्याचा संभव असून, हल्लीं आम्हांवर जो जुलूम चालला आहे तो नाहींसा होण्यासारखा आहे.

पुढें एस्तेर हीच राजाची राणी झाली. त्यावरून मर्दखयास परमानंद झाला. हिच्या योगानें मला मोठी जागा मिळेल किंवा मी मोठा प्रतिष्ठित होईन म्हणून नव्हे, तर देवाचें लक्ष्य आपल्या लोकांकडे असून कोणत्या तरी उपायानें तो त्यांचें कल्याण करील याचा हा एक विसारच आहे असें जाणून तो फार हर्ष पावला.

एस्तेरेस राणी करतेवेळीं राजानें मोठा

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे.



समारंभ केला. जेव्हां तो रत्नखचित मुगुट त्यानें तिच्या मस्तकावर घातला असेल, तेव्हां ती किती शोभायमान दिसली असेल हें सांगायास नको. त्या महोत्सवांत सर्व लोक फार आनंदित झाले. जरी एस्तेरेला एवढें वैभव प्राप्त झालें, तरी ती आपल्या राजमंदिराचा केवळ द्वारपाळ असा जो आपला चुलत भाऊ मर्दखय त्याला विसरली नाहीं, व तिनें त्याच्या बोधाकडे दुर्लक्ष्य केलें नाहीं. लहानपणीं जशी ती लेंकराप्रमाणें त्याच्या जवळ राहून त्याचें ऐकत होती, तशी या वेळींही त्याच्या इच्छेस अनुसरूनच वागत होती असें शास्त्रांत सांगितलें आहे. खरोखर ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. यावरून ती किती थोर मनाची होती हें दिसून येतें. तिच्या ह्या नम्रतेनें तिला त्या रत्नखचित मुगुटापेक्षां अधिक शोभा आणिली असें म्हटलें पाहिजे.

एस्तेर राणी झाल्यावर थोडक्याच काळानें

असें झालें कीं, राजाचा जीव घेण्याविषयीं त्याच्या दोघां हुजऱ्यांनीं कट केला. ही बातमी मर्दखयाच्या कानावर आली, तेव्हां त्यानें ती लागलींच एस्तेरेला कळविली. तिनें राजास कळविल्यावर त्यानें त्या राजद्रोही मनुष्यांस फांशीं देऊन ती सर्व हकीकत मर्दखयाच्या नांवासह आपल्या स्मरणलेखांत लिहून ठेविली. त्याबद्दल राजानें मर्दखयाचा कसा बहुमान केला तो पुढें समजण्यांत येईल.

मर्दखय तर नित्य राजवाड्याचें द्वार राखीत बसे. तो आपल्या एस्तेर राणीचा संबंधी आहे हें राजाच्या ध्यानीं देखील नव्हतें. पण पुढें कांहीं दिवसांनीं तें कळून आलें. राजाच्या अष्टप्रधानांमध्यें हामान म्हणून जो एक होता, त्यावर राजाचा विशेष लोभ असल्यामुळें त्यानें त्यास सर्वांमध्यें श्रेष्ठ करून असा हुकूम फरमाविला कीं, सर्वांनीं

त्यास नमन करीत जावें. त्या वेळापासून सर्व लोक हामानाला मोठ्या अदबीनें नमून मान देऊं लागले. एकजण मात्र त्याला मान देत नसे. हामान मोठ्या डौलानें जवळून जाई येई, तरी हा मनुष्य उठत नसे, व त्याला नमत नसे. तो कोण म्हणाल तर मर्दखय होय.

मर्दखय हा यहूदी असल्यामुळें जसा देवाला मान देतात तसा मनुष्यांला नमून देणें हें त्याच्या धर्माविरुद्ध होतें हें त्याचें हामानाला न नमण्याचें एक कारण असेल. पण हामान मोठा धूर्त, कपटी, विश्वासघातकी असा मनुष्य असून सन्मानास योग्य नाहीं असेंही त्याला समजून आलें असेल, आणि हेंच मुख्य कारण असावें असें वाटतें. आणखी, मर्दखयानें असा विचार केला असेल कीं, ज्यास आपण मानास पात्र समजत नाहीं, अशा मनुष्यापुढें नमून वरवर ढोंग दाखविणें व्यर्थ आहे.

मर्दखय तर सात्विक मनुष्य होता. त्याला व्यर्थ ढोंग अगदीं आवडत नसे. परंतु हा आपली मानमान्यता ठेवीत नाहीं हें पाहून हामानास अतिशय संताप येई. त्या संतापामध्यें त्यानें अशी भयंकर योजना केली कीं, मर्दखयास केवळ नव्हे, तर या देशांत राहणाऱ्या अवघ्या इस्राएलांस ठार मारून नाहींसें करावें. ही योजना सिद्धीस नेण्याकरितां राजाचा हुकूम मात्र पाहिजे होता, तोही त्यास सहज मिळाला. त्यानें राजाच्या मनांत असें भरविलें कीं, 'आपल्या राज्यांत कांहीं विलक्षण प्रकारचे परदेशीय लोक येऊन सर्वत्र पांगून राहिले आहेत. ते राजाच्या कायद्याप्रमाणें चालत नाहींत, तर आपलेच धर्मविधि पाळून देशांतील लोकांशीं फारसा संबंध न ठेवितां तुटक राहतात. तेणेंकरून देशाला कांहीं फायदा न होतां उलटी हानि होत आहे असें दिसण्यांत

येतें. यास्तव महाराजांनीं हुकूम मात्र द्यावा, म्हणजे मी त्यांस समूळ नाहींसें करून टाकितों. जर हुकूम मिळेल, तर त्याबद्दल मी स्वतः राजाच्या भांडारांत ३,७५,००,००० रुपयांची रक्कम टाकीन असें वचनही देतों.'

राजाला तर त्या लोकांविषयीं कांहीं काळजी नव्हतीच. मग ती गोष्ट खरी कीं खोटी याबद्दल तपास करण्याचा कोण त्रास घेतो! त्यानें लागलींच हामानाला आपल्या खुशीप्रमाणें करण्याची आज्ञा दिली, आणि त्यासंबंधी सर्व लेखी जाहिराती मुद्रित करण्याकरितां शिक्कामोर्तबही त्याच्या स्वाधीन केलें. तेव्हां त्या घातकी हामानास मोठाच आनंद झाला, व तें अघोर कर्म सिद्धीस नेण्यासाठीं त्यानें ताबडतोब जाहिराती तयार करविल्या. त्या येणेंप्रमाणें:—

"राजाच्या सर्व अमलदारांस असा हुकूम

केला जातो कीं, अमुक महिन्याच्या अमुक तारखेस प्रत्येक तालुक्यांत व तालुक्याच्या प्रत्येक गांवांत जेथें कोठें यहूद्यांची वस्ती असेल, तेथील अमलदारांनीं त्यांस आबालवृद्धांस, बायकांपोरांस ठार मारून टाकावें; आणि त्यांची मालमत्ता हरून घ्यावी. ह्या राजाज्ञेवर खुद्द राजाचा शिक्कामोर्तब आहे. सर्वांस कळावें."

याप्रमाणें जाहिराती तयार करून जासुदांबरोबर गांवोगांव रवाना केल्या. त्यांतील मजकूर पाहतांच त्या राजधानींतील व चोहोंकडील यहूदी लोकांमध्यें एकच आकांत होऊन गेला. ते आपल्या रीतीप्रमाणें आंगास राख फांसून व तरट नेसून उपास करूं लागले, व आपला कामधंदा सोडून प्रार्थनेंत व रडण्यांत सर्व दिवस घालवूं लागले. मर्दखय यास हें वर्तमान समजतांच तोही

राख व तरट आंगावर घेऊन राजवाड्यावाहेर जाऊन वसला, व तेथें धाय मोकलून मोठ्यानें रडूं लागला. ही गोष्ट एस्तेर राणीच्या कानावर गेल्यावर तिनें मर्दखयास नेसावयासाठीं वस्त्रें पाठविलीं, परंतु तो तीं घेईना. तेव्हां याचें कारण समजावें म्हणून राणीनें आपला एक विश्वासू चाकर त्याकडे पाठविला, तेव्हां हामानानें राजापासून अशा प्रकारचा हुकूम घेऊन आपल्या लोकांचा नाश करून टाकावा म्हणून जाहिराती प्रसिद्ध केल्या आहेत, व याबद्दल त्यानें भांडारांत पुष्कळ पैसेही भरले आहेत हें सर्व मर्दखयानें सांगितलें. आणि त्या जाहिरातीची एक नकलही एस्तेर राणीकडे पाठवून हात जोडून तिला अशी विनंती केली कीं, या प्रसंगीं तुलाच राजापाशीं जाऊन आम्हांकरितां रदबदली केली पाहिजे, त्याशिवाय दुसरा उपाय नाहीं.

मग एस्तेरनें त्या चाकराच्या हातीं मर्दखयाकडे असें सांगून पाठविलें कीं, "राजा आपल्या आंतल्या बैठकींत बसला असतांना, जो कोणी बोलावल्यावांचून त्यासमोर जाईल तो मारला जावा असा सर्वांसाठीं एकच नियम आहे. जर कदाचित् राजानें आपला राजदंड त्याजपुढें केला, तर मात्र तो वांचेल असें समजावयाचें. हा कडक नियम राजवाड्यांतील सर्व अमलदारांस व सेवकांस माहीत आहे. मला तर तीस दिवसांपासून राजानें जवळ बोलाविलें नाहीं, तर मी तशी कशी जाऊं?"

मर्दखय म्हणाला, "सर्व यहुद्यांचा नाश होत असतां 'मी सुटेन' असें तूं समजूं नको. जर आतां उगीच राहिलीस, तर कोणीकडून तरी यहुद्यांची सुटका होईल. पण तुझा व तुझ्या बापाच्या घराण्याचा क्षय करण्यांत

येईल असें जाण. अशा अणीबाणीच्या प्रसंगीं तूं लोकांच्या उपयोगीं पडावें म्हणूनच तुला राणीचें पद प्राप्त झालें नसेल काय?"

यावर एस्तेरेनें असें उत्तर पाठविलें कीं, "जर असें आहे तर तुम्ही शहरांतील सर्व यहूदी लोकांकडे जाऊन त्यांस तीन दिवस उपास करायास सांगा. इकडे मीही उपास करितें व माझ्या दासीही करतील. नंतर राजाची आज्ञा नसतांही मी तशीच आंत जाईन. मग माझा नाश झाला तर होवो." तिचें हें धैर्याचें बोलणें वाचकांस आश्चर्यकारक वाटेल. पण हें धैर्य केवळ स्वाभाविक होतें असें नाहीं. यहूदी लोकांमध्यें उपास म्हटला म्हणजे त्यासह देवाजवळ प्रार्थना असायाचीच, म्हणून एस्तेरेला भरंवसा होता कीं, परमेश्वर आपल्या लोकांच्या प्रार्थना ऐकून मजवर कृपा करील, व माझे मनोदय

सिद्धीस नेईल. तथापि तो प्रसंग तिला फारच भयाचा होता. कां कीं, राजा मोठा स्वच्छंदी असल्यामुळें एखादे वेळेस रागाच्या झपाट्यांत काय करील याचा नेमच नाहीं हें तिला माहीत होतें.

इतिहासांत ह्या राजाविषयीं अशी एक गोष्ट सांगितली आहे कीं, तो एकदां लढाईस चालला असतां एका ठिकाणीं उतरला. त्या ठिकाणच्या एका गृहस्थानें त्याला आपल्या घरीं नेऊन त्याच्या वैभवास शोभेल असा त्याचा आदरसत्कार केला. शिवाय त्या लढाईच्या खर्चाबद्दल कित्येक लाख रुपयेही दिले. परंतु निघते समयीं राजा त्या गृहस्थाचे सहाही मुलगे लढाईस घेऊन चालला, तेव्हां त्यानें विनंती केली कीं, महाराज, पांच जणांस मात्र न्या, आणि एक तरी मला म्हातारपणीं आधार होण्यास राहूं द्या. एवढी

माझी विनंती महाराजांनीं मान्य करावी. तेव्हां त्या निष्ठुर राजानें फारच संतापून ज्याविषयीं विनंती केली होती त्या पुत्राला त्याच्या बापासमक्ष मारवून, त्याचे दोन तुकडे करून रस्त्याच्या दोहों बाजूंस टाकावयास सांगितले, आणि त्या तुकड्यांमधून आपलें सैन्य चालवीत नेलें!

हें अघोर कृत्य कदाचित् एस्तेरेच्या कानावर आलें नसेल. परंतु त्याचा हा दुष्ट स्वभाव कायमच होता, आणि तो केव्हां केव्हां त्या राजमहालांतही दिसण्यांत आला असेल यांत संशय नाहीं. म्हणूनच एस्तेरेला वाटलें कीं, जर मी राजाचा हा हुकूम मोडीन, तर त्या पहिल्या राणीप्रमाणें राजा मला नुसतें घालवून देणार नाहीं तर माझा प्राणही घेईल. तथापि असल्या राजांचीं मनें देखील देवाच्या स्वाधीन आहेत हें तिला माहीत होतें. “भिऊं

नको, मी तुझ्या संगतीं आहें" असें जें देवानें अनेक भयांच्या प्रसंगीं आपल्या भक्तांस म्हटलें आहे, तें मलाही लागूं नाहीं काय? मींही त्या वचनावर भरंवसा ठेवून धैर्य धरूं नये काय? अशा प्रकारें तिनें आपल्या मनांत विचार केले असतील. हे तिचे विचार योग्यच होते. त्या वचनाचें मनन करून तिच्या जीवास आधार मिळाला, व ती राजाकडे जाण्याची तयारी करूं लागली.

ते समयीं तिनें केवढ्या काळजीनें राजास आवडण्यासारखा राजकीय पोषाक व अलंकार निवडून काढिले असतील! अमुक प्रसंगीं माझा देखावा पाहून राजा फार खुष झाला होता, तेव्हां मीं कोणता पोषाक व कोणकोणते अलंकार घातले होते, याचें स्मरण करून तिनें तशा प्रकारें आपलें शरीर सुशोभित करण्याचा प्रयत्न केला असेल. स्वतः

तिला तर शरीर शृंगारण्याची हौस नव्हतीच. कारण उंच उंच पोपाकांत व सोनें, रुपें, हिरे, मोतीं, यांचे दागीने लेण्यांत कांहीं थोरपणा नाहीं हें ती जाणत असे. तिच्या समोर जो त्यांचा ढीग पडला होता, त्याकडे पाहून ती इतर वहुत स्त्रियांप्रमाणें गर्वानें भुलून गेली नाहीं. परंतु या प्रसंगीं राजाला खुप करायाचें होतें, म्हणून त्याच्या मनास येईल तसें करणें भाग होतें. त्याची प्रसन्नता झाली, तर माझें कार्य शेवटास जाईल या आशेनें तिला हें सर्व करावें लागलें.

याप्रमाणें सर्व सिद्धता करून, व मस्तकावर मुगुट घालून, बोलावण्याची वाट न पाहतां मोठ्या धैर्यानें व मर्यादेनें ती राजासमोर जाऊन उभी राहिली. राजा तर एकांत स्थळीं बसला होता, ते समयीं एकाएकीं एस्तेर राणी दृष्टीस पडताच त्याला फार नवल वाटलें असेल,



ही बोलाविल्यावांचून आंत
कशी आली, माझा नेम
हिला कळला नव्हता कीं
काय, असें त्यानें मनांत
म्हटलें असेल. परंतु तिचें
तें मनोहर रूप पाहतांच

त्याचें मन प्रसन्न झालें, व लागलींच त्यानें आपला राजदंड तिच्या पुढें केला. तिनें चालीप्रमाणें जवळ येऊन त्याच्या टोंकास स्पर्श केला. नंतर राजा तिला म्हणतो, "एस्तेर राणी तुला काय पाहिजे? काय तुझें मागणें आहे? अर्ध राज्य मागितलेंस तरी देईन."


हे त्याच्या मुखांतले शब्द ऐकतांच एस्तेरेनें अंतःकरणांत देवाची स्तुति केली असेल यांत संशय नाहीं. खरोखर देवानें या प्रसंगीं राजाच्या मनांत सत्प्रेरणा घातल्या आहेत, आणि तो आतां माझ्या लोकांस ह्या संकटांतून सोडवील अशी तिची खातरी झाली. परंतु त्या वेळेस तिनें एवढेंच मागितलें कीं, "आपण हामानासह माझ्या मंदिरीं मेजवानीस येण्याची कृपा करावी. मीं सर्व सिद्धता केलेली आहे." हें तिचें मागणें मान्य करून राजा नेमलेल्या वेळीं त्या आपल्या कृपेंतल्या प्रधानासह भोजनास गेला.

आतां एस्तेरेचें एवढेंच मागणें नसेल, तिच्या मनांत याहून कांहीं विशेष असेल, असें जाणून राजानें भोजनाच्या वेळेस तिला पुनः विचारलें कीं, "आणखी तुझें काय मागणें आहे? अर्धे राज्य देखील देण्यास मी सिद्ध आहें." तेव्हां एस्तेर म्हणाली, "माझी विनंती ही आहे कीं, उद्यां जी मेजवानी मी करणार आहें, तिलाही महाराजांनीं कृपा करून हामानास बरोबर घेऊन यावें, म्हणजे त्या वेळेस मी आपणांस सर्व कळवीन." तेंही म्हणणें राजानें मान्य केलें.

या दोन्ही आमंत्रणांवरून हामानास जो आनंद झाला तो गगनांत मावेना! तथापि मर्दखय त्याला नमन करीत नसे ही एक गोष्ट त्याच्या आनंदांत उणी होती. त्या दिवशीं हामानानें आपल्या घरीं जाऊन राणीकडील दोन्ही भोजनांविषयीं व तिच्या

आमंत्रणावरून आपणास जो आनंद झाला त्याविषयीं घरच्या मनुष्यांस सांगितलें. तरी तो म्हणाला कीं, "अद्यापि तो मर्दखय मला नमत नाहीं यामुळें हें अवघें मला सुखावह नाहीं." तेव्हां त्याची बायको व इष्टमित्र त्याच्या समाधानार्थ त्याला म्हणाले," आतां असें करा कीं, पन्नास हात उंच असा एक खांब तयार करून उद्यां सकाळीं राजाचा हुकूम घेऊन त्या मनुष्यास फांशीं देऊन टाका म्हणजे झालें."

ही मसलत बरी वाटून हामानानें तसा एक खांब तयार करविला. पण सकाळीं एक विलक्षणच प्रकार घडून आला, तो असा कीं, रात्रीं राजाला चांगली झोंप येईना म्हणून त्यानें करमणुकीकरितां आपल्या कारकिर्दीसंबंधीं कालवृत्तांताचें स्मरणपुस्तक आणून वाचायास सांगितलें. वाचतां वाचतां




मर्देखयानें राजाचा जीव कसा वांचविला, याविषयींचा लेख त्याच्या कानीं पडला. परंतु त्याबद्दल आपणाकडून त्याचा कांहींच बहुमान करण्यांत आला नाहीं असें जाणून त्यानें तत्क्षणीं असा निश्चय केला कीं, उद्यां सकाळींच मर्देखयाची सरफराजी केली पाहिजे.

दिवस उगवतांच राजानें हामान प्रधानास बोलावून विचारिलें कीं, राजास जर कोणाचा बहुमान करावयाचा असला, तर काय काय करावें लागतें? हामान आपल्या मनांत समजला कीं, राजा माझ्या करतांच कांहीं समारंभ करणार असेल, म्हणून त्यानें राजास सांगितलें कीं, त्याला राजकीय वस्त्रें घालून व राजाच्या खासगी घोड्यावर बसवून, त्याच्या बरोबर एक मोठा अमलदार देऊन शहरभर त्याला मोठ्या समारंभानें मिरवावें; आणि ह्या मिरवणुकीपुढें एका हुजऱ्यानें असें पुकारीत चालावें कीं, "ज्याचा मान करावा म्हणून राजाला आवडतें, त्याचें असें करतील."

तेव्हां राजा म्हणाला, "हा समारंभ मर्दखयासाठीं करायाचा आहे, तर तुम्हीं सांगितल्याप्रमाणें सर्व करावें." हे शब्द ऐकतांच हामान मनामध्यें फारच कष्टी झाला. पण

करतो काय! राजाज्ञेप्रमाणें सर्व केलें पाहिजे.

तें सर्व झाल्यावर हामान फार उदास व खिन्न मनानें राजाबरोबर राणीकडे भोजनास गेला. कांहीं वेळ तो तेथें बसला असतांना राजानें एस्तेरेला पुनः विचारिलें, आणि तिला निश्चयपूर्वक सांगितलें कीं, "तुझ्या मागण्याप्रमाणें मी तुला निःसंशय देईन." तेव्हां एस्तेर म्हणाली, "महाराजांनीं कृपा करून माझा व माझ्या लोकांचा जीव वांचवावा, हेंच माझें मागणें आहे. कारण आमचा वध व्हावा, व आमचा समूळ नाश केला जावा, म्हणून मी व माझे लोक असे आम्ही विकलेले आहों." हें ऐकून राजास फार आश्चर्य वाटलें, आणि हें काय आहे व असा दुष्ट शत्रु कोण असावा, याबद्दल तो तिला विचारूं लागला. तेव्हां एस्तेरेनें मन मोकळें करून आपले लोक कोण, मर्दखय आपला कोण, व हामानानें त्याशीं

कसें वैर धरिलें, आणि त्याचा व सर्व यहूदी लोकांचा समूळ नाश करून टाकण्याचा कसा बेत केला, व तो सिद्धीस नेण्यास कोणत्या युक्तीनें राजापासून हुकूम मिळविला हे सविस्तर त्यास सांगितलें.

अशी हकीकत समजतांच राजा फार क्रोधायमान झाला; आणि तसाच तेथून उठून



गामध्यें जाऊन इकडे तिकडे फिरूं लागला. हें पाहून हामान फार घाबरला, व आपल्या जीवाकरितां एस्तेर राणीजवळ विनवण्या करूं लागला. तो राणीच्या पलंगावर पडून जीवदान मागत आहे असें राजानें पाहिलें, तेव्हां तर तो अधिकच कोपला. तशामध्यें एका हुजऱ्यानें, हामानाच्या वाड्यांत मर्दखयास फांशीं देण्याकरितां जो खांब उभा केला होता, त्याविषयीं राजाच्या कानावर घातलें. तेव्हां राजानें लागलींच आज्ञा केली कीं, त्याच खांबावर हामानास फांशीं द्यावें. याप्रमाणें त्या दुष्ट हामानाचा परिणाम झाला.

नंतर एस्तेर राणी आपल्या लोकांस त्या मरणाच्या संकटांतून सोडविण्याविषयीं राजाजवळ फार रडून विनंती करूं लागली. तेव्हां राजा मोठ्या फिकिरींत पडला. कारण हामानानें चहूंकडे पाठविलेल्या हुकमांवर राजाचें

मोर्तब झालेलें होतें, यामुळें तें फिरण्यासा
नव्हतें. तरी राणीची विनंती मान्य कर ्या-
विषयीं फार उत्सुक होऊन ... एक ...
योजिला. त्या हुकमांची मुदत ... तर
केवळ एक महिना राहिला होता असें दिसतें.
तेव्हां राजानें आपला शिक्का मोर्तब मर्दखया-
जवळ देऊन त्यास नवा जाहिरनामा प्रसिद्ध
करायास सांगितलें. त्यांतील सारांश असा:—

"सर्व इस्राएल लोकांस कळावें कीं, जेव्हां लोक तुम्हांस मारावयास उठतील, तेव्हां तुम्हींही तयार होऊन त्यांशीं लढावें, व आपला बचाव करावा, असा राजाचा हुकूम आहे." ह्या जाहिरना ... शिक्केमोर्तब झाल्यावर राजानें आज्ञा केली कीं, घोडेस्वार व सांडणी स्वार यांबरोबर हा जाहिरनामा ताबडतोब गांवोंगांवीं रवाना करावा."

हे जाहिरनामे जिकडे तिकडे पोहोंचतांच

त्यांस मोठा हर्ष झाला; त्यांनीं आंगावरील ... व तरट टाकून देऊन मोठा आनंदोत्सव के... ... मर्दखयास उंच पदवीस चढवि...; ...तें ... लोक त्यास मान देऊं लागले. राजवाड्यां... ... शहरांत जे कोणी इस्राएलांचे शत्रु सांपडले त्यांस व हामानाच्या दहा पुत्रांस राजाच्या हुकुमानें ठार मारिलें.

यहूदी लोकांचा वध करण्याचा जो दिवस ठेमला होता त्या दिवशीं जे जे त्यांजवर उठले त्यांशीं लढून ते प्रबळ झाले, व त्यांनीं बहुतांस मारिलें. त्यावरून त्या देशांतील लोक त्यांस फार भिऊं लागले, आणि पुष्कळ लोक त्यांचा धर्म स्वीकारून यहूदी झाले.

ज्या दिवशीं देवानें या प्रकारें आपल्या लोकांची सुटका केली, व त्याचें संकट नाहींसें करून त्यांस आनंदित केलें, त्या दिवसाची आठवण राहावी व तो उत्साहाचा दिवस

असा पाळला जावा , ह्मणून मर्दखयानें एस्तेर राणीच्या हुकुमानें एक सण स्थापिला. यहूदी लोक आजपर्यंत जो "पुरीम" नांवाचा पाळीत आले आहेत तो हाच आहे. त्या सणामध्यें दोन दिवस उत्साह करून एकमेकांस कांहीं देणग्या द्याव्या व विशेषेंकरून गरिबांस धर्म करावा असा नेम आहे. त्या दिवशीं ते एस्तेर राणीचें नांव स्मरू[illegible] तिची फार स्तुति गातात.

इस्राएल लोक हे आब्राहामाच्या वंशांतले व देवाचे निवडलेले लोक होते, पण ते कधीं कधीं खऱ्या देवाला [illegible]न बहकल्यामुळें संकटांत पडत असत. तेव्हां त्याच्या प्रार्थना ऐकून तो कोणा एखाद्या महावीराकडून किंवा दबोरेसारख्या स्त्रीकडून त्यांस सोडवीत असे. एस्तेर राणी तर लढाईस कधीं [illegible] नव्हती. परंतु तिनें देवावर भरंवसा

आपल्या शहाणपणानें व मर्यादशीलतेनें त्या दुष्ट व निष्ठूर राजाला अशा प्रकारें ताळ्यावर आणिलें कीं, एखाद्या मोठ्या सैन्याकडून जें कार्य झालें नसतें, तें तिजकडून सिद्धीस गेलें. खरोखर तिची वाखाणणूक केली पाहिजे. सर्व स्त्रिया तिच्या सद्गुणाचा व शहाणपणाचा कित्ता घेऊन वागतील तर त्यांच्या हातून बहुत लोकांचें कल्याण होईल, आणि लोक त्यांची प्रशंसा करितील.

यावरून

[illegible] AT THE EDUCATION SOCIETY'S PRESS, BYCULLA.